राष्ट्र सह्याद्री
आवाज जनतेचा, प्रयत्न जनहिताचा
YouTube चॅनल
अल्पावधीतच लोकप्रिय झालेल्या
राष्ट्र सह्याद्री यु-ट्युब चॅनल साठी
राज्यभर-जिल्हानिहाय पत्रकार प्रतिनिधी
नेमणे आहे. तरी इच्छुकांनी संपर्क साधावा.
अनुभवी पत्रकार प्रतिनिधींना प्राधान्य राहील.
: संपर्क :
77740 01818, 9922109598

दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक १५९ ● सोमवार, २४ मार्च २०२५ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

## झापुक | zupuk

पूर्वी मैलोनमैल
मुलं पायपीट
करीत शाळेत जायचे
जीवनात काहीतरी
करियर करून मोठं
व्हायच्या जिद्दीने शिकायचे
आता पायी सोडाच
सायकलवरही मुलं
शाळेत जाईना
बाईक, मोबाईल,
कॅन्टीन खर्च घेतल्याशिवाय
शिक्षण घेईना
बाईक, पार्टी, मोबाईल चॅटींग
फ्रेण्डशिप, व्हॅलेंटाईन
हेच झालंय मिशन
शिक्षण, गुणवत्ता, शिस्त
करियर, संस्कृती सारंच
वास्तव झालंय भिषण

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

# नाशिक कुंभमेळ्यासाठी योगी पॅटर्न, ११०० कोटींचा निधी

फडणवीसांचा मेगाप्लॅन : नाशिक येथे घेतली आढावा बैठक



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** त्र्यंबकेश्वर येते जाऊन मी आज पाहणी केली. त्र्यंबकेश्वरसाठी एक विकास आराखडा तयार करण्यात आले आहे. मी त्या संदर्भात बैठक देखील घेतली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी आम्ही जसा नाशिकचा विकास करणार आहे तसा त्र्यंबकेश्वरचा देखील विकास करणार आहे. ही कामे दोन टप्प्यात करणार आहे. तसे कुंडाचे आणि मंदिरांचा देखील विकास करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी सुमारे १,१०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा विचार आहे. त्र्यंबकेश्वर परिसरातील विकासकामांच्या पहिल्या टप्प्यासाठी मंजुरी मिळवण्याचे निर्देश दिले असून आवश्यक निधी उपलब्ध करून देईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

२०२७ मध्ये होणाऱ्या नाशिकच्या कुंभमेळ्याची तयारी सुरु झाली आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नाशिक दौरा केला. यावेळी त्यांनी त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचाही आढावा घेतला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी कुंभमेळ्याच्या तयारीबाबत महत्त्वाची माहितीही दिली.

तसेच, कुंभमेळ्यात वेगवेगळ्या प्रकारच्या सोयी देखील देण्याचा विचार आहे. लवकरच या आराखड्याला मान्यता देणार आहे. नाशिकमध्ये ११ पुल आम्ही तयार करणार आहे. मोठ्या प्रमाणात रस्ते देखील तयार करण्याचा मानस आहे. उत्तरप्रदेश सरकारने ज्या प्रकारे कायदा केला त्याप्रकारे आपण देखील कायदा करणार आहोत. मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे प्राधिकरणाच्या माध्यमातून आम्ही सर्व प्लॅन करणार आहोत, असेही फडणवीस म्हणाले.

कुंभमेळा हा सगळ्या टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून करू. हा आस्थेचा महाकुंभ होईल, टेक्निकली महाकुंभ होईल. येथील प्रशासकीय टीम सक्षम आहे. सर्व लोक काम करतात. प्रयागराजचा अनुभव पाहता मी तिथे पोलीस कर्मचाऱ्यांसोबत पण संवाद साधला, त्या ठिकाणी **(पान ४ वर)**



# न्यायमूर्तींच्या निवासस्थानी मोठी रोकड!

- सर्वोच्च न्यायालयानेच शेअर केले फोटो, व्हिडिओ
- सविस्तर चौकशी करण्याचे दिले आदेश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणावर रोकड सापडल्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची गरज सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी न्यायमूर्ती वर्मा यांच्याकडून स्पष्टीकरण मागितल्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना सविस्तर अहवाल पाठवण्यास सांगितले आहे. कॉल डिटेल्स रेकॉर्ड तपासण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. शनिवारी रात्री उशिरा सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाचे विद्यमान न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या अधिकृत निवासस्थानी बेहिशेबी रोकड सापडल्याच्या आरोपांशी संबंधित अहवाल, फोटो आणि व्हिडिओ शेअर केले. अशा प्रकारची ही पहिली आणि दुर्मिळ घटना आहे.

यापूर्वी, दिल्लीचे पोलिस आयुक्त संजय अरोरा यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डीके उपाध्याय यांच्यासोबत एक व्हिडिओ शेअर केला होता. यामध्ये १४ मार्च रोजी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरी रोख रक्कम जळाल्याचे समोर आले होते. दिल्ली उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधीशांविरुद्ध सखोल चौकशी केली जाणार आहे. यापूर्वी न्यायमूर्ती वर्मा यांनी फोटो पुरावे असतानाही स्वत:ला निर्दोष घोषित केले होते. स्वत:ला गोवण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला होता.

सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवलेल्या त्यांच्या अहवालात न्यायमूर्ती उपाध्याय म्हणाले की, दिल्ली पोलिस प्रमुख अरोरा यांनी १४ मार्चच्या रात्री न्यायमूर्ती वर्मा यांच्या निवासस्थानी लागलेल्या कथित आगीच्या घटनेचा व्हिडिओ शेअर केला होता आणि रोख रक्कम सापडली होती. ते पुढे म्हणाले की, जेव्हा व्हिडिओ दाखवला आणि **(पान ४ वर)**

## महत्वाचे...

### वाघ्या कुत्र्याची समाधी रायगडवरुन हटवा : छत्रपती संभाजीराजे



**कोल्हापूर :** कोणताही ऐतिहासिक संदर्भ नसलेल्या, पुरावे नसलेल्या वाघ्या कुत्र्याची समाधी रायगड किल्लयावरून हटवण्यात यावी अशी मागणी माजी खासदार आणि रायगड विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी केली आहे. तशा आशयाचे पत्र त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत एका कपोलकल्पित कुत्र्याची समाधी व पुतळा उभारणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव असल्याचं ते म्हणाले.

३१ मे पर्यंत हा पुतळा हटवण्यात यावा असंही त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. रायगड किल्लयावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीच्या मागे कथित वाघ्या कुत्र्याची समाधी बांधण्यात आली आहे. या गोष्टीला कोणताही ऐतिहासिक आधार नसल्याचं सांगत शिवभक्तांनी त्याला अनेकदा विरोध केला आहे. या आधी एकदा शिवप्रेमींनी तो पुतळा हटवला होता. पण प्रशासनाने तो पुन्हा त्या ठिकाणी बसवला.

### चार वर्षीय चिमुकली बादलीत बुडाली

नाशिक : कंपनीच्या आवारात खेळताना पाण्याने भरलेल्या बादलीत पडून चार वर्षीय चिमुरडीचा दुर्दैवी मृत्यू झाला. रागिणी मनोजकुमार वनवासी (रा. सुपरनेल इंडस्ट्रिअल, ग्लॅस्को बसस्टँडसमोर, एमआयडीसी अंबड) असे मृत बालिकेचे नाव आहे. शनिवारी (दि. २२) दुपारी ही हृदयद्रावक घटना घडली आहे. या घटनेमुळे नाशिक शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.


याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रागिणीचे आई आणि वडील हे कुटुंबासह सुपरनेल कंपनीत वास्तव्यास असून शनिवारी तिचे आई वडील नियमित कामकाज करत होते. त्याचवेळी आंघोळीसाठी असलेल्या जागेवरील एका मोठ्या बादलीत रागिणी पाणी खेळत होती. त्याचवेळी तिचा तोल गेल्याने ती बादलीत पडली. तिचे नाक व तोंड बादलीत अडकल्याने तिचा श्वास गुदमरला व बादलीतील पाणी तिच्या नाका तोंडात गेले. त्यामुळे ती बेशुद्ध झाली. काही वेळाने तिच्या कुटुंबाने तिची शोधाशोध करायला सुरुवात केली. यावेळी रागिणी ही पाण्याच्या बादलीत पडल्याचे कुटुंबीयांना दिसून आले.तिला तत्काळ उपचारासाठी नाशिकच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केले.

# पालकमंत्रीपदाच्या तिढ्यात सुवर्णमध्य काढताना फडणवीस अडचणीत?

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

नाशिक : नाशिक आणि रायगड जिल्हाच्या पालकमंत्रिपदावरून महायुती वाद आहे. नाशिकचे पालकमंत्री म्हणून गिरीश महाजन यांची नियुक्ती करण्यात आली. मात्र शिंदे गटाने त्याला विरोध केला. नाशिकमध्ये देखील मंत्री दादा भुसे यांच्या समर्थकांनी नाराजी व्यक्त केली होती. पालकमंत्रिपदावर महायुतीत वाद उफाळून आल्याने नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली. त्यावर फडणवीस यांनी सुवर्णमध्य काढला आहे. 'जोपर्यंत जिल्ह्याला पालकमंत्री जाहीर होत नाही, तोपर्यंत त्याचा चार्ज मुख्यमंत्र्यांकडे असतो. पण लवकरच पालकमंत्री जाहीर करू', असं विधान फडणवीस यांनी केले. मात्र नाशिकचा पालकमंत्री मुख्यमंत्री फडणवीसच ठेवणार का? अशी राजकीय वर्तुळात रंगत आहे. त्यामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांकडून पुन्हा फडणवीस यांना विरोध होण्याची शक्यता आहे.

या दोन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाचा तिढा अजूनही कायम आहे. दरम्यान नाशिकचे पालकमंत्रिपद भाजपकडेच राहणार असल्याची चर्चा आहे. याचदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकच्या पालकमंत्रिबाबाबत मोठं विधान केलंय. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नाशिक दौऱ्यावर होते. यावेळी फडणवीसांनी त्र्यंबकेश्वर मंदिरात जाऊन दर्शन घेतलं. त्यानंतर कुशावर्त तीर्थ परिसराची पाहणी केली. नाशिकमध्ये आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७ साली होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा आढावा फडणवीसांनी घेतला. आढावा घेतल्यानंतर फडणवीसांनी नाशिक शहरातील युवा उद्योजकांसोबत चर्चा सत्रात सहभाग घेतला. यावेळी देवेंद्र फडणवीसांना युवा उद्योजकांनी नाशिकच्या पालकमंत्रिपदाच्या तिढ्याबाबत प्रश्न केला. यानंतर मुख्यमंत्र्यांनी पालकमंत्रीबाबत स्पष्टीकरण देताना वरील विधान केले. मुख्यमंत्र्यांनी नाशिकच्या कुंभमेळ्याच्या तयारीचा आढावा घेतला. यानंतर माध्यमांशी संवाद साधला, उत्तर प्रदेशने ज्याप्रकारे या कुंभमेळ्याचा कायदा तयार केला. कुंभमेळा प्राधिकरण तयार केलं. त्याच धर्तीवर आपणही कायदा तयार करत असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. कुंभमेळा प्राधिकरण तयार करून त्याला कायदेशीर चौकट देत असल्याचं फडणवीस म्हणाले.नाशिकच्या पालकमंत्री म्हणून भाजप नेते गिरीश महाजन यांची निवड करण्यात आली. मात्र त्या पदावर शिवसेना शिंदे गटाचे नेते दादा भुसेंनी दावा केलाय. तर नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक आमदार राष्ट्रवादीचे आहेत, त्यामुळे अजित पवार गटानेही नाशिकच्या पालकमंत्रिपदावर दावा केला आहे. त्यामुळे महायुती वाद सुरू आहे.



# नागपूर शांत : संचारबंदी उठवली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नागपूर :** गेल्या सहा दिवसांपासून नागपूरमध्ये लागू असलेली संचारबंदी हटवण्यात आली आहे. गेल्या सोमवारी नागपूर शहरात झालेल्या हिंसाचारानंतर ११ पोलिस ठाण्याच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली होती. ती आता उठवण्यात आली आहे. संचारबंदी उठवल्यानंतर नागपूर पोलिसांनी हिंसाग्रस्त भागात रुटमार्चही काढला. गणेशपेठ, कोतवाली, तहसील आणि यशोधरा नगर या भागात संचारबंदी उठवताच बाजापेठा उघडायला सुरवात झाली. छत्रपती संभाजीनगरमधील **(पान ४ वर)**



### १०४ दंगलखोरांची ओळख पटली

नागपूर दंगल प्रकरणात पोलिसांनी चार-पाच तासांत दंगल नियंत्रणात आणली. त्यासाठी अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर करण्यात आला. या सगळ्यात अनेक पोलीस कर्मचारी जखमी झाले. यानंतर पोलिसांनी दंगलीचे सीसीटीव्ही फुटेज, लोकांना मोबाईलवर केलेले चित्रीकरण याआधारे दंगेखोरांची ओळख पटवून त्यांच्यावर कारवाई केली आहे. आतापर्यंत १०४ दंगलखोरांची ओळख पटली आहे. त्यापैकी ९२ जणांना अटक केली आहे. तर १२ जण अल्पवयीन असल्याने त्यांच्यावरही विधिसंघर्षित कायद्यानुसार कारवाई सुरु आहे.

# पाच चिनी उत्पादनावर भारतात अँण्टी-डम्पिंग शुल्क!

## केंद्र सरकारचा निर्णय : भारतीय कंपन्यांना दिला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** भारत सरकारने चीनमधून येणाऱ्या पाच उत्पादनांवर अँण्टी-डम्पिंग शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ल्युमिनियम फॉइल, व्हॅक्यूम फ्लास्क, सॉफ्ट फेराइट कोर्स आणि ट्रायक्लोरो असोसायन्युरिक सिड, पॉली व्हाइनिल क्लोराइड पेस्ट रेझिन यांचा समावेश आहे. हे शुल्क पाच वर्षांसाठी लागू करण्याचा निर्णय आता भारत सरकारने घेतला आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या तपास युनिट डीजीटीआरच्या शिफारशीनंतर हे पाऊल उचलण्यात आलं आहे. भारत सरकारने चार चिनी उत्पादनांवर ण्टी-डम्पिंग शुल्क लावण्याच्या निर्णयामुळे भारतीय कंपन्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

चीनपेक्षा कमी किमतीत भारतात विकल्या जाणाऱ्या उत्पादनांवर हे शुल्क लावण्यात आले आहे. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने या संदर्भातील माहिती देत याबाबतच्या सूचना जारी केल्या आहेत. दरम्यान, ल्युमिनियम फॉइलही अँटी डंपिंग शुल्क लावण्यात आलं आहे. मात्र, ल्युमिनियम फॉइलवरील हे ण्टी-डम्पिंग शुल्क सहा महिन्यांसाठी असणार आहे. ल्युमिनियम फॉइल आयातीवर प्रति टन ८७३ डॉलरपर्यंत तात्पुरतं ण्टी-डम्पिंग शुल्क लावण्यात आलं आहे.

वाढीव आयात शुल्क अर्थात 'ण्टी-डम्पिंग शुल्क' म्हणजेच देशातील उत्पादकांना परदेशातील प्रतिस्पर्धी उत्पादक कंपन्यांकडून हानी पोहोचत असल्यास त्यांची निर्यात किंमत आणि सामान्य मूल्यातील फरकाची भरपाई भरून काढण्यासाठी **(पान ४ वर)**

# विठाबाई नारायणगावकर तमाशा कला पंढरीत लोकनाट्याचे ३१० करार

- पाच कोटींची उलाढाल; मोठ्या तमाशांना मागणी अधिक
- छोट्या फड मालकांना मात्र गुढीपाडव्याची प्रतीक्षा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जुन्नर :** नारायणगाव येथील विठाबाई नारायणगावकर तमाशा कला पंढरीत राज्यातील लहान, मोठ्या एकतीस फड मालकांचे मागील महिनाभरात लोकनाट्य कार्यक्रमाचे ३१० करार झाले आहेत. या माध्यमातून सुमारे पाच कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. तमाशाचे कार्यक्रम ठरविण्यासाठी राहुट्यामध्ये यात्रा समितीच्या प्रमुखांची गर्दी दिसत असून करार करण्यासाठी बैठका रंगल्या आहेत. मोठ्या तमाशांना जास्त मागणी असून हंगामी छोटे तमाशा फड मालक करारासाठी गुढीपाडव्याच्या प्रतीक्षेत आहेत.




**नारायणगाव (ता. जुन्नर): विठाबाई नारायणगावकर या तमाशाचा करार करताना वरुडे -वाफगाव(ता.खेड) येथील ग्रामस्थ. ( दुसऱ्या छायाचित्रात) येथील तमाशा पंढरीत उभारण्यात आलेल्या रंगीबेरंगी आकर्षक राहूट्या.**

नारायणगाव हे राज्यातील तमाशा फड मालकांचे केंद्र आहे.येथील विठाबाई नारायणगावकर तमाशा कला पंढरीत राज्यातील फडमालकांनी रंगीबेरंगी आकर्षक राहुट्या उभारून तमाशा कार्यक्रमाचे करार करण्यास २० फेब्रुवारी २०२५ पासून सुरुवात केली. राहूटीच्या दर्शनी व आतील बाजूस फडाचे नाव, प्रमुख कलावंत, सोंगड्या, गायक किंवा नृत्यांगना यांचे फोटो लावून राहुट्या आकर्षित केल्या आहेत. तमाशाचे करार करण्यासाठी येणाऱ्या यात्रा समितीच्या प्रमुखांच्या बैठकीसाठी गाद्या, तक्के, खुर्च्या ठेवून व कुलर,फॅन बसवून राहुट्या सुसज्ज केल्या आहेत.येथील पुणे नाशिक महामार्गालगत उभारलेल्या राहुट्या लक्ष वेधून घेत आहेत. दरम्यान, नावाजलेला, मोठा आणि चांगला तमाशा ठेवण्यासाठी गावोगावच्या यात्रा प्रमुखांची चढाओढ असते. १०० पेक्षा जास्त कलावंत व गाड्यांचा मोठा ताफा असलेल्या विठाबाई नारायणगावकर, मंगला बनसोडे, पांडुरंग मुळे सह तुकाराम खेडकर, चंद्रकांत ढवळपुरीकर, मालती इनामदार,काळूबाळू, भिका भीमा सांगवीकर, आनंद लोकनाट्य,दत्ता महाडिक,अंजलीराजे नाशिककर, संध्या माने, शिवकन्या बडे, दिपाली, सुरेखा पुणेकर, जगन कुमार वेळवंडकर या **(पान ४ वर)**

### प्रमुख तिथींचे करार पूर्ण

यावर्षी यात्रा, उत्सवाच्या रामनवमी( सहा एप्रिल), चैत्र पौर्णिमा (१२ एप्रिल), काल अष्टमी(२१एप्रिल), अक्षय तृतीया(३०एप्रिल), महाराष्ट्र दिन(१ मे) या प्रमुख तारखांचे बहुतेक फडमालकांचे करार पूर्ण झाले आहेत. मोठ्या फड मालकांचे या तिथींचे लोकनाट्याचे हजेरीसह करार अडीच ते साडेतीन लाख तर हंगामी फडांचे एक ते दीड लाख रुपयांच्या दरम्यान झाले आहेत.

- यंदा एक एप्रिल ते १५ मे दरम्यान यात्रा उत्सव हंगाम आहे. सलग पाचव्या वर्षी राहुटी न लावताच १३ मे पर्यंतच्या ४५ तारखा फोनवर बुक झाल्या आहेत.चौफुला ( ता.दौंड) येथील भैरवनाथ यात्रेनिमित्त काल अष्टमी ची सुपारी ग्रामस्थांनी चार लाख रुपयांना बुक केली आहे. यावर्षी लोकनाट्य कार्यक्रमांना चांगली मागणी आहे.

**- रघुवीर खेडकर, फड मालक**

- मागील वर्षी लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे काही यात्रा उत्सव रद्द झाल्याने त्याचा परिणाम व्यवसायावर झाला होता. यावर्षी ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण असून तमाशा कार्यक्रमाला मागणी वाढली आहे. आमच्या फडाचे प्रमुख तारखांचे करार दोन ते साडे साडेतीन लाख रुपयांच्या दरम्यान झाले आहेत.

**- अविष्कार मुळे, फड मालक**

# यशस्वीतेसाठी युवकांनी स्वत:ला अपडेट ठेवावे : धुमाळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** भाषेच्या माध्यमातून भावना समजून घेणे म्हणजे कृत्रिम बुद्धीमत्ता होय. त्यासाठी आजच्या युगातील तरुणांनी स्वावलंबी, संस्कृत व काळानुसार बदलणे आवश्यक आहे. बदलती मानसिकता, ध्येय, संगत, दृष्टीकोन, तंत्रज्ञानात होणारे बदल स्वीकारणे गरजेचे आहे. जीवनात यशस्वी यश प्राप्तीसाठी शिक्षण, आरोग्य, ज्ञान, कौशल्य, दृष्टिकोन या गोष्टी महत्त्वाच्या असून जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर युवावर्गाने स्वत:ला अपडेट ठेवणे गरजेचे आहे असा मौल्लिक सल्ला अहिल्यानगर येथील उद्योजक, वक्ते व लेखक एन. बी. धुमाळ यांनी दिला.

रयत शिक्षण संस्थेच्या एस.एस. जी.एम. कॉलेजचा वार्षिक पारितोषिक व कै. सौ. सुशीलाबाई (माई) शंकरराव काळे आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा पारितोषिक वितरणफ समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष व महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष ॲड. भगीरथ शिंदे होते.

ॲड. शिंदे म्हणाले की, महाविद्यालयाला नॅक मूल्यांकनात अ++ ग्रेड मिळून अत्युच्च यश मिळाले. महाविद्यालयाने मिळविलेले हे यश शेतकरी व विविध घटकांना उपयुक्त होईल असा एक आगळावेगळा प्रकल्प महाविद्यालयात राबविण्याचे रयतच्या उच्चस्तरावर ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. याबरोबरच महाविद्यालयात पारितोषिक वितरण कार्यक्रम दरवर्षीच होत असला तरी, प्रत्येक वर्षीचे पारितोषिक विजेते वेगळे असतात. त्यामुळे त्यांच्यासाठी याला विशेष महत्त्व आहे.

स्वागत, प्रास्ताविक, पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी करवून केला. अहवाल




वाचन प्रा. अरुण देशमुख यांनी केले.

गुणवंत प्राध्यापकांमध्ये प्रा. डॉ. देविदास रणधीर (रिसर्च प्रोजेक्ट) प्रा. डॉ. संगीता दवंगे, प्रा. काजल साळुंके, प्रा.गणेश सोनवणे, प्रा.अश्विनी पाटोळे, मोरेश बांगर (नेट,सेट परीक्षा उत्तीर्ण), प्रा. डॉ. बाबासाहेब शेंडगे( प्रा. डॉ. र. बा. मंचरकर स्मृती पुरस्कार २०२४), डॉ. वंदना घोडके (पीएच.डी पदवी प्राप्त), प्रा.डॉ. रावसाहेब दहे (पीएच. डी पदवी व संदर्भ पुस्तक प्रकाशन) प्रा. डॉ. सीमा चव्हाण (पेटंट), डॉ.चंद्रभान चौधरी, प्रा. डॉ. अर्जुन भागवत, प्रा. सचिन सोनवणे, प्रा. किरण पवार, प्रा. डॉ. विशाल पवार (पुस्तक प्रकाशन), प्रा.अमोल चंदनशिवे, (पर्यावरण शिक्षण व जल सुरक्षा या विषयाच्या पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी अभ्यास मंडळ सदस्य पदी निवड) प्रा.डॉ. मोहन सांगळे, प्रा.किशोर पाटील व श्रीमती.रेखा जानराव (आदर्श सेवक पुरस्कार) कु. आस्मा पठाण, (आदर्श विद्यार्थी पुरस्कार) यांचा सन्मान करण्यात आला.

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक- शुभम सरदेसाई(श्रीमान भागोजी शेठ खीर लॉ कॉलेज रत्नागिरी), द्वितीय क्रमांक- प्राप्ती बुधवंत(के. बी. रोहमारे जुनिअर कॉलेज, कोपरगाव), तृतीय क्रमांक-कोमल शेलार (एस. एस. जी. कॉलेज, मालेगाव कॅम्प मालेगाव), उत्तेजनार्थ पारितोषिके- प्रथमेश धायगुडे रायगड, सिद्धी बाफना पाथर्डी, वसुधा पाटील पुणे यांना देण्यात आला. फिरता- स्मृती करंडक कोमल शेलार व प्रशांत बेले (एस. एस. जी. कॉलेज, मालेगाव कॅम्प मालेगाव) यांना सन्मानपूर्वक बहाल करण्यात आला. यकार्यक्रमासाठी महेंद्रकुमार काले, डॉ. ज्ञानेश्वर वाकचौरे यांच्यासह उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.डॉ.सीमा चव्हाण, डॉ. वैशाली सुपेकर व प्रा. रवींद्र हिंगे यांनी केले तर आभारसाक्षी सवई हिने मानले.

# संपादकीय

## नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी...

प्रशासकीय सेवेत सहभागी होण्याची इच्छा अनेक तरुणांना असते. त्यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर राज्य लोकसेवा आयोगामार्फत विविध परीक्षा देऊन असंख्य तरुण आपली सुप्त इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असतात. त्यात सर्वांत मोठी अडचण होती ती कंत्राटावर कर्मचारी नेमून राज्यकारभार हाकण्याच्या अघोषित सरकारी धोरणाची. आरक्षणाची बिंदूनामावली ठरता ठरत नाही, अन् राजकारणातला 'किस्सा कुर्सी'का सरता सरत नाही, अशी गेल्या काही दिवसांतली महाराष्ट्राची गत होती. स्पर्धापरीक्षांविषयीचे अनेक प्रश्नही विद्यार्थ्यांनी आंदोलन करून मांडले होते. या पार्श्वभूमीवर विधिमंडळातील या विषयावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्या घोषणा केल्या, त्यांची नीट अंमलबजावणी झाली, तर परीक्षार्थींना मोठा दिलासा मिळेल.केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांप्रमाणेच राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षाही नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. महत्त्वाचे म्हणजे राज्यातील वर्ग एक, दोन आणि तीनची भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) करण्यात येईल, असेही सांगितल्याने ही परीक्षा देणाऱ्यांच्या संधी वाढतील. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार सत्तारूढ झाल्यानंतर जे प्रश्न त्वरेने मार्गी लावले जाण्याची अपेक्षा होती, त्यातला सरकारला गतिमान करण्यासाठी रिक्त जागा भरणे आणि लाखो युवकांना मानाच्या सरकारी नोकरीची संधी उपलब्ध करुन देणे, हा महत्त्वाचा विषय होता. रिक्त जागा आणि रिक्त हात हे प्रश्न गंभीर होते. फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या कारकिर्दीत अखेरच्या वर्षी एक लाख सरकारी नोकऱ्या देण्याचे आश्वासन दिले होते. पण ते प्रक्रियेत, आक्षेपात अडकले. यावेळी तसे न होवो याकडे लक्ष द्यावे लागणार आहे. पायाभूत रचनांमधले प्रकल्प आकार घेत असताना भूसंपादन, मोबदले देणे, राज्य आधुनिक प्रणालीशी जोडणे असे कितीतरी मुद्दे विचारात घ्यावे लागणार आहेत. उत्तम कारभाराची हमी द्यायची असेल तर केवळ सत्ताधाऱ्यांच्या निर्धारी घोषणा पुरेशा नसतात तर ती स्वप्ने प्रत्यक्षात उतरवणारी नोकरशाहीची सक्षम फळी निर्माण करणे आवश्यक असते. त्यादृष्टीने सरकारचा मनोदय महत्त्वाचा. आता प्रतीक्षा आहे ती कार्यवाहीची. 'सरकार' हा आजही भारतीयांना सर्वाधिक भावणारा नोकरपुरवठादार. पगार वेळेवर मिळणार, निर्वाहाची सोय होणार, भविष्य निर्धास्त होणार आदी कारणांमुळे सनदी सेवांकडे तरुणांचा ओढा असतो. राज्यात वर्ग एक, वर्ग दोन आणि वर्ग तीनमध्ये जागा असल्याने लाखो मुले या पदभरतीकडे लक्ष ठेवून आहेत. आयोगामार्फत भरती करण्याच्या निर्णयामुळे एकूण प्रक्रियेत सुसूत्रताही येईल आणि या पदांवर संधी मिळालेल्यांना परीक्षेसाठी केलेल्या परिश्रमांचे चीज झाल्याचे समाधान वाटेल. स्पर्धापरीक्षांची जबाबदारी सांभाळणाऱ्या राज्य लोकसेवा आयोगाची स्थिती अत्यंत दयनीय आहे. पदे रिक्त, कर्मचारी तुटपुंजे, अध्यक्ष नेमले जातात ते गुणवत्तेच्या नव्हे तर राजकीय निकषावर!या अनागोंदी कारभारामुळे पेपर फुटतात. घोळ होतात. आयोगाची फेररचना करून तेथे चांगली माणसे नेमण्याची तयारी करण्याची जबाबदारी आता व्ही. राधा या सचोटीच्या सनदी अधिकाऱ्यांवर सोपवली गेली हेही चांगले झाले. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर परीक्षा होणार असतील तर साहजिकच वर्णनात्मक उत्तरांचा भाग त्यात असणार.पण वर्णनात्मक उत्तरांना आंदोलक विद्यार्थ्यांनी विरोध केला होता. आता आयोगाच्या परीक्षेत सुसूत्रता आणताना अशा सर्व मुद्यांचा नीट विचार करून धोरण आखले पाहिजे. राज्यसेवेत शिरू पाहाणारे केंद्राच्या परीक्षेलाही समान प्रकारच्या अभ्यासामुळे पात्र ठरण्याची शक्यता वाढते. महाराष्ट्राची नोकरशाही देशात एकेकाळी सर्वोत्तम मानली जाई. आता अन्य राज्येही स्पर्धेत उतरली आहेत. त्यामुळे महाराष्ट्राला द्रुतगतीने पुढे जायचे असेल तर पोलादी चौकट हाताळणारे सनदी अधिकारी उत्तम हवेत. काळाचे हे आव्हान पेलण्याच्या दृष्टीने लोकसेवा आयोगाला सज्ज करणे हे फेररचनेमागचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे.

# विद्यार्थ्यांचा कलागुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलन उपयुक्त : कराड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पानेगाव :** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलन महत्त्वाची असतात असे प्रतिपादन नेवासे पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड यांनी केले. पानेगावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनातते ते बोलत होते.

कराड म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थी आता मागे नाही. वेगवेगळ्या कला त्यांचा अंगात असतात. कला सादर करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ शिक्षण विभागाच्यावतीने राज्यभरात उपलब्ध करून देण्यात येत आहे. शासन स्तरावरून निधी नसताना शिक्षक वृंद, ग्रामपंचायत स्तरावरील पदाधिकारी, गावातील सामाजिक कार्यकर्ते यांच्या अर्थिक मदतीने हे आयोजन होत असते. येथील शाळा तालुक्यात आदर्शवत असून येथील शिक्षक तसेच शाळेसाठी योगदान देणाऱ्यांचे विशेष कौतुक कराड यांनी करुन जिल्हास्तरावर आदर्श शाळा म्हणून पुरस्कार मिळावा यासाठी मी स्वतः पाठपुरावा करण्याची ग्वाही कराड यांनी दिली.

सरपंच संजय जंगले म्हणाले की, डिजिटल शाळा त्याचबरोबर येथे सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. शाळा बघण्यासाठी जिल्हा, तालुका स्तरावरील अधिकारी येत असतात. देश भक्तीपर गीते, भक्ती गीते, चिमुकल्यांनी म्हटली. पालकांनी त्याला प्रतिसाद बक्षिसांची खैरात केली.

यावेळी जिल्हा परिषद सोनई केंद्र प्रमुख हनुमंत फुंदे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विजय जंगले, सरपंच निकीता भोसले-आंबेकर, उपसरपंच दत्तात्रय घोलप, मुख्याध्यापक विष्णू दहिफळे, मच्छिंद्र खेमनर, अरुण ढेरे, छाया देठे, संकेत गुडधे, मंगल गुडधे, सविता जंगले, गोदा चिंधे, पोलीस पाटील बाबासाहेब जंगले, ग्रामपंचायत सदस्य सतीश जंगले, ज्ञानेश्वर जंगले, माजी सरपंच हौशाबापू जंगले, शिवस्मारक समितीचे अध्यक्ष किशोर जंगले, महालक्ष्मी देवस्थान अध्यक्ष अमित जंगले,अ ामराई उद्योग समूहाचे अध्यक्ष सुरज जंगले, नामदेव गुडधे, अनिल चिंधे,उत्तम तांबे, ज्ञानदेव गुडधे, तंटामुक्ती अध्यक्ष उद्धव चिंधे, उपाध्यक्ष सुरेंद्र जंगले, बाबासाहेब शेंडगे, गणेश गायकवाड सुनिल चिंधे, शुभम जंगले, मोहनराव दहिफळे,लक्ष्मीकांत जंगले, आरुण सोनवणे, गणेश जंगले, रामदास गागरे, लक्ष्मण गागरे, रविंद्र सोनवणे, प्रविण सोनवणे, किरण जंगले आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन संदिप जंगले यांनी केले आभार संकेत गुडधे यांनी मानले.

# त्रिंबकराज व्याख्यानमाला प्रेरणादायी : आ. ओगले



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** देवळाली प्रवराचे मुख्याधिकारी विकास नवाळे यांच्या संकल्पनेतून पार पडलेली त्रिंबकराज व्याख्यानमाला ही प्रेरणादायी असून शहरातील साहित्यिक व सांस्कृतिक वाटचालित व्याख्यानमालेच्या रूपाने एक चांगला पायंडा त्यांनी सुरू केला असल्याचे प्रतिपादन आ. हेमंत ओगले यांनी केले.

देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे श्री त्रिंबकराज मोफत वाचनालयाच्या वतीने समर्थ बाबुराव पाटील महाराज सांस्कृतिक भवन येथे पार पडलेल्या तीन दिवसीय त्रिंबकराज व्याख्यानमालेची सांगता शनिवारी पुणे येथील सचिन पवार यांच्या संताने महाराष्ट्राला काय दिले या व्याख्यानाने झाली. प्रसंगी आ.ओगले बोलत होते.

यावेळी माजी आ.चंद्रशेखर कदम, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, मुख्याधिकारी विकास नवाळे, माजी नगराध्यक्ष मुरलीधर कदम, साई आदर्श मल्टिस्टेटचे अध्यक्ष शिवाजीराव कपाळे, वैभव गिरमे, कृष्णा मुसमाडे, दत्ता कडू, नानासाहेब कदम आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

आ.ओगले म्हणाले, मुख्याधिकारी नवाळे यांच्या रूपाने देवळाली प्रवराला एक उत्तम अधिकारी मिळाले मात्र आता त्यांची पदोन्नती झाली आहे. मात्र शहराच्या विकासाबरोबर सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. राज्यातील जाणकारांचे विचार शहरातील नागरीकांना ऐकवयास मिळावे यासाठी मोठ्या शहराप्रमाणे देवळाली प्रवरात व्याख्यानमाला आयोजित करून चांगला पायंडा पाडला असून ही व्याख्यानमाला दरवर्षी व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिल गोसावी यांनी केले तर आभार ग्रंथपाल संभाजी वाळके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नगरपरिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात गाथा पारायण सुरु

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, भाविक भक्त व तरुण मंडळ व महाराज मंडळी यांच्यावतीने गुढीपाडवा या हिंदू नववर्षाचे औचित्य साधून संत जगद्गुरु श्री तुकोबाराय त्रिशतकोत्तर सदेह वैकुंठ गमन सोहळयानिमित्त गाथा पारायणास कालपासून (रविवार)संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरामध्ये सुरुवात झाली असून ३० मार्चपर्यंत हा सोहळा चालणार आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिर निर्माते वैकुंठवाशी गुरुवर्य बन्सी महाराज तांबे, योगी मनोहरनाथ महाराज यांच्या आशीर्वादाने व देवगड संस्थानचे महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज, प्रकाशानंदगिरी महाराज, संत तुकाराम महाराज मंदिराचे प्रमुख महंत उध्दव महाराज मंडलिक-नेवासेकर, श्रीराम साधना आश्रमाचे महंत सुनीलगिरी महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त देविदास महाराज म्हस्के, त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत रमेशानंदगिरी महाराज, रामकृष्ण आश्रमाचे महंत वेदमूर्तीभगवान महाराज जंगले शास्त्री, रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात, चांगदेव महाराज काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळा होत असल्याचे सोहळा संयोजन कमिटीचे नारायण महाराज नजन यांनी सांगितले



नेवासा : येथील संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिरात गाथा पारायणास बसलेले वाचक वारकरी व माऊलींचा पैस खांब. (छाया : सुधीर चव्हाण)

सोहळयामध्ये सकाळी ७ ते १२ यावेळेत संत तुकोबारायांच्या गाथा ग्रंथाचे पारायण तर मंदिराच्या बाहेरील प्रांगणात सायंकाळी ७ ते ९ यावेळेत गंगापूर जाखमाथा येथील श्री विठ्ठल आश्रमाचे प्रमुख गाथामूर्ती रामभाऊ महाराज राऊत हे संत तुकाराम महाराज जीवन चरित्रावर कथा सांगणार आहेत. पहाटे ५ ते ६.३० काकडा भजन, विष्णूसहस्त्रनाम, सकाळी ७.१५ ते दुपारी १२ गाथा पारायण, दुपारी १२ ते १ महाप्रसाद, सायंकाळी ७ ते ९ कथा व तदनंतर महाप्रसाद असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहे. ३० मार्चला देविदास महाराज म्हस्के यांच्या सकाळी ९.३० ते ११.३० यावेळेत होणाऱ्या काल्याच्या कीर्तनाने या सोहळयाची सांगता पुरणपोळीच्या महाप्रसाद वाटपाने होणार असून होणाऱ्या गाथा पारायणाचा व कथा श्रवणाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सोहळा संयोजन समिती, संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर देवस्थान व नेवासा ग्रामस्थ यांनी केले आहे.

# शिरसगाव विद्यालयाचे स्नेहसंमेलन गौरवास्पद : अनुराधा आदिक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव :** खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्थेचे शिरसगाव न्यू इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंतउत्कृष्टरीत्या सादरीकरण करून विद्यार्थ्यांनी लोकप्रिय गीतांच्या माध्यमातून २० नृत्ये सादर केली. भारतीय संस्कृती जपून माता जिजाऊ, साउथ इंडियन आदी वेशभूषा केल्या. त्यांचा उत्साह पाहून आनंद होतो.विद्यार्थ्यांनी चांगले भवितव्य घडवावे, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक यांनी अध्यपदावरून केले.


प्रारंभी आदिक, संस्था सहसचिव जयंत चौधरी, सदस्य हंसराज आदिक, सुनील थोरातआदींच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. शिरसगाव सोसायटीचे तज्ञ संचालक रामचंद्र बकाल प्रमुख पाहुणे होते.प्रास्तविक प्राचार्य सुभाष काळे यांनी केले. सहसचिव जयंत चौधरी यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. यावेळी पालक, माजी विद्यार्थी, माजी मुख्याध्यापक, विविध शाखेतील मुख्याध्यापक, गोरे, अरविंद थोरात, मच्छिंद्र जगताप, शंकरराव शेलमकर, रंगनाथ माने, विमल आदिक, ग्रा. पं. सदस्य अशोक जाधव, महेश ताके, इसाक पठाण उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रकाश बागुल व पवार यांनी केले. आभार आशा दांगट यांनी मानले.




# कोणत्याही चुकीच्या चाललेल्या गोष्टी विरोधात आवाज उठवला पाहिजे, प्रेषित मुहम्मद स्व.

रमजान मुबारक २०२५,
रोजा नं. २३ वां,

" पवित्र कुरआण मध्ये अल्लाह सांगतात कीं, " तुम्ही एक सर्वोत्तम लोकं समूह आहात, कीं,ज्यांना मनावजातीच्या कल्याणासाठी घडवून पुढे आणण्यात आले आहेत, लोकांना सतकर्माची शिकवण देतात आणि दुषकृत्या करण्यापासून मनाई करतात.. आणि अल्लाह वर श्रद्धा ठेवतात. ( सुरह ०३, अल - इमरान, आ. नं. ११०). कालच आपण बघितलं कीं, प्रत्येक श्रद्धावान बंधुचे काम हें आहेत कीं, समाजात सतत समाजाच्या भलाई साठी चांगल्या गोष्टी चा सल्ला द्यावं व चांगले सत्कार्य, समाजउपयोगी काम करण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करावेत, चांगल्या काम करण्यासाठी मुलांना उत्साहित करावे. अगदी तसेच मनाव जातीच्या कल्याणा विरुद्ध जो कोणीही काम करीत असेल, जेथे जेथे काही चुकीचं घडतं असेल अशा ठिकाणी आप आपल्या कुवती नुसार आपल्या टाकती नुसार आवाज उठवायला पाहिजे.. इस्लामचे दुसरे खलिफा हजरत उमर बिन खतताब रजि. सांगतात कीं, आम्हाला, प्रेषित मुहम्मद स्व. नी सांगितले कीं, ज्या- ज्या ठिकाणी तुम्हीं एखादे चुकीचं - वाईट - अत्याचार - होत असलेला तुम्हीं पाहाल तर, त्या वाईट - चुकीच्या गोष्टीला विरोध करा,! आपल्या कुवतीनुसार आपल्या बाळाचा वापर करून त्या बंद करा - रोखा, जर तेही तुम्हाला शक्य झाले नाहीं, तर, त्या विरोधात तोंडाने आवाज उठवून कडाडून विरोध करून आवाज उठवा,!!, आणि, अगर ते ही, तुमच्याच्याने शक्य नसेल तर, त्या त्या वाईट चुकीच्या कृत्या चं मनामध्ये तरी ध्रुणा बाळगा..!!, ध्रुणा बाळगणे हा श्रद्धेचा ( इमानी ) चा अंतिम ( कमी ) दर्जा आहेत.. ( हदीस मुस्लिम शरीफ ). जगात कोणतेही राष्ट्र असो, त्यामध्ये वेगवेगळ्या पद्धतीने रास्ट्राची सामाजिक राजकीय व्यवस्था बघणारे असतात, प्रत्येक राष्ट्राची राजकीय सामाजिक घटना वेगवेगळ्या प्रकारची असतात व त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे राजकीय पक्षाचे लोकं येऊन सत्ता चालवीत असतात, त्या प्रत्येक राष्ट्रात काळानुसार सतत सुधारणा होत असतात,नवीन युगात नवीन विचारांचे, आचाराचे राजकीय पक्ष सत्ते वर काम करीत असल्याने त्यामध्ये चांगल्या पुरोगामी, तर काही रूढीवादी विचाराचे ही लोकं असतात, अर्थातच व्यक्ती त्तीतक्या प्रवृत्ती असा कालचक्र चालत असतात. या मध्ये काही चांगली सामाजिक भान असलेले ही लोकं सत्तेवर असतात तर काही गुन्हे गारी पारशभूमिचे लोकं ही येतात आन असें लोकं कोणत्याही राष्ट्रात सत्ते वर आल्यावर ते कोणात्याही परिस्थिती समोरच्या विरोधी पक्षाचे एकन्याच्या मनस्तीत बिलकुल नसतात.. मनमानी सत्ता चालवतात मनमानी कारभार करतात, कधी कधी त्यातूनच हुकूमशाही पद्धतीने ते सरकार चालवतात , चुकीचे कायदे करतात, बरेचदा चुकीच्याच गोष्टी घडताना दिसते , त्यामुळे समाजात गुन्हेगारी वृतीचे प्रणाम वाढलं जाते व एक प्रकारचे अराजक परिस्थिती निर्माण होत असते, त्यांना कुणाचं ऐकणं पसंत नसते त्यामुळे कोणतेही निर्णय घेतलं जाते कोणतेही कायदे केले जातात, मानवी हक्काचे एक प्रकारे हनन च होत असते, त्यामुळे त्यांच्या मनात इतरांच्या बद्दल द्वेष निर्माण करतात व राष्ट्रात एक अराजक परिस्थिती निर्माण, म्हणून अशी परिस्थिती निर्माण होणार नाहीं म्हणून वेळोवेळी अशा लोकांच्या विरोधात सतत- वेळोवेळी - वारंवार थोडा काही होईना आवाज उठवला पाहिजे. आपल्या कुवती नुसार बोललं पाहिजे.. अशा विधवन्सक प्रवृत्ती च्या विरोधात आज आवाज नाहीं उठवला तर उदया येणाऱ्या काळात जगात अंधाधुंधी माजेल, एक विचित्र परिस्थिती निर्माण होईल, मानवी हक्काच्या संरक्षणा साठी सतत कार्यरत राहणं अंत्यन्तगरजेचं असतं म्हणून त्यासाठी प्रत्येक समुदायास त्यातील प्रत्येक व्यक्तीला सत्याचा आग्रह करणे गरजेचं आहेत. आपल्या मुलांनाही चांगले मूल्यवर्धन संस्कार देणे गरजेचे आहेत. सरकार ला लोकं उपयोगी योजना आणण्यासाठी भाग पाडलं पाहिजे. नवीन पिढी वाया जाऊ नयेत म्हणून काहीतरी काम दिले पाहिजे. या साठी जगातील प्रत्येक नागरिकांनी सावधान राहिलं पाहिजे. तसेच आपल्या दैनंदिन जीवनात रस्त्यावर चालताना काही चुकीचं दिसत असेंल तर त्याला विरोध केला पाहिजे, उदा, एखाद्या वर कोणी खूप अत्याचार करीत असेल, किंवा एकदा मालक आपल्या नोकरा कडून खूप प्रमाणापेक्षा काही जास्तच काम करून घेत असेल, एखाद्या कंपनीत मालक रोजगारांना जास्तच काम देवून त्याचं व्यवस्थित मोबदला देत नसेल, किंवा प्रशासन नागरिकांना वेठीस धारित असेल तर, अशा विविध पातळीवर अगर काही चुकीचं दिसतं असेल तर त्याला त्या ठिकाणी जरूर जाब विचारलं पाहिजे व न्याय मिळाला नाहीं तर आपल्या परीने आवाज उठवला पाहिजे.. आणि हेच इस्लाम शिकवते व हिच इस्लामी शिकवणूक आहेत. प्रेषित पैगंबर मुहम्मद स्व. सांगतात कीं, " चुकीच्या प्रवृत्ती, गोष्टी, अन्यायकारक गोष्टी कधी तुमच्या नजरेत आल्या तर त्यावेळी त्याविरोधात आपल्या परीने आवाज उठवा.. एक तर तुम्ही तुमच्या शक्तीने हाताने बंद करा, अगर ते ही तुमच्याच्यानें जमलं नाहीं तर आवाज उठवा.. अगर ते ही जमलं नाहीं तर, आपल्या मनात तरी त्या चुकूच्या गोष्टी बद्दल घृणा बाळगा " अत्याचार अन्याय करणारे आवाज उठवणाऱ्या नां त्रास देतात किंवाकधी कधी जास्तच पब्लिक मध्ये जागृती झाली तर तुरुंगात टाकतात किंवा कोणी कोणी आपल्या स्थानिक गुंडा मार्फत इजा पोहचवण्याचे ही शक्यता असते.. म्हणून, पवित्र कुरआन मध्ये अल्लाह सांगतात कीं, " थोडीशी इजा पोहचवण्या व्यतिरिक्त ते तुमचे कोणतेही नुकसान करू शकत नाहीं, आणि ते जर तुमच्याशी लढायी करतील तर, ते, पाठ दाखवून पळून जातील, तेंव्हा त्यांना कोणाचेही साह्य मिळणार नाहीं " ( सुरह नं. ०३, सुरह अल - इमरान आ. नं. १११). पुन्हा पवित्र कुरआन मध्ये अल्लाह सांगतात कीं, " अत्याचार करणारे, ते जेथे कुठे जातील -आढळतील तिथे ते धिक्कारलेच जातील, व त्यांनी स्वतः वर अल्लाह चा कोप ओधावून घेतला आहेत. "..सुरह ०३, अल - इमरान आ. नं. ११२). म्हणून, अगर आज आपण हें केलं नाहीं तर उदयाची पिढी आपल्याला माफ करणार नाहीं.. कोणावर ही अन्याय झाला तर आपल्या परीनं आवाज उठवा.. अल्लाह न्याय करणारा आहेत.. अल्लाह अन्याय करणाऱ्याना जरूर बघेल,"




रोजा नंबर
लेखक :- डॉ. सलीम साईदा सिकंदर शेख
बैतुशशिफा दवाखाना ९२७१६४००१५



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)- ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय- कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहमदनगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले. संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Bahasaheb Nawale To be Printed At Saived Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahmednagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor, Near New Court, Shrirampur, Dist. Ahmednagar, Maharashtra 413 709, India Editor : Karan Babasaheb Nawale" RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com, Email ID- rashtrasahyadri @ gmail.com. Mo. 7774001818

द • ख • ल

## लोकन्यायालयात ८८ प्रलंबित खटले निकाली

**राहुरी** : येथे झालेल्या लोकन्यायालयाच्या दरम्यान राहुरी पोलीस स्टेशन मधील ८८ केसेस न्यायालयाने निकाली काढल्या असुन त्यामध्ये सुमारे ४४,५०० रुपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे. २२ मार्चला राहुरीमध्ये लोक न्यायालय आयोजित करण्यात आले होते . यामध्ये राहुरी पोलीस स्टेशनमध्ये प्रलंबित असलेल्या एकूण ८८ खटले न्यायालयाने निकाली काढले.१६ खटल्यांतू ९९०० रुपयांचा दंड करण्यात आला असून बीएनएस २८५ मध्ये ४४ खटल्यांमध्ये सुमारे २२,००० रुपयांचा दंड करण्यात आला. इंडियन पिनल कोड २८३ च्या ३ खटल्यात ६०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे तसेच बीएनएसच्या खटल्यात ११,५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला असून, कलम ३३६ च्या दोन केसेसमध्ये ५०० रुपयांचा असे ८८ खटले निकाली काढण्यात आले. एकून ४४,५०० रुपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे. सदरची कारवाई राहुरी न्यायालयाच्या प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी तसेच सरकारी अभियोक्ता राहुरी न्यायालय, पोलिस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीरामपूर डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या सुचनेनुसार व मार्गदर्शनाखाली राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली महेश शेळके, प्रशांत पवार यांच्या पथकाने केली.

## आंबेडकर विद्यालयात सहविचार सभा उत्साहात



**सोनई** : मुळा कारखाना येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक विद्यालयात शिक्षक पालक सहविचार सभा उत्साहात झाली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक लोंढे एस एम होते. प्रास्ताविक शिंदे आर एस यांनी केले. नवीन बदलते शैक्षणिक धोरण व इयत्ता दहावीच्या अभ्यासक्रमाचे नियोजनाची माहिती शिंदे यांनी सांगितली. पालकांमधून भाग्यश्री दरंदले यांनी मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ अध्यापिका जाधव म्हणाल्या की, विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या संदर्भामध्ये पालकांनीही दक्ष राहणे गरजेचे आहे. लोंढे सरांनी शाळा राबवत असलेल्या उपक्रमांविषयी माहिती दिली, शनिशिंगणापूर ग्रामपंचायतचे सरपंच बाळासाहेब बानकर व सर्व पालक, विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन आढाव यांनी केले तर आभार व समारोप क्रीडाशिक्षक आप्पासाहेब शेटे यांनी मानले.

## 'रेल्वेच्या विविध प्रश्नी खा. वाकचौरे यांनी लक्ष घालावे'

**पुणतांबा** : येथील रेल्वे खात्याबाबत असलेल्या विविध प्रश्नांबाबत खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी लक्ष घालावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. पुणतांबा येथे रेल्वेखात्याने उड्डाण पूल किंवा अंडरपास सुरु करावा ही ग्रामस्थांची गेल्या २५ वर्षापासून मागणी आहे. विशेष म्हणजे दौंड –मनमाड रेल्वेमार्गाचे दुहेरीकरणाचे काम सुरु होऊन सध्या अंतिम टप्प्यात आहे. या मार्गावर सर्व ठिकाणी रेल्वे फाटकाच्या ठिकाणी अंडरपास करण्यात आले आहेत. मात्र पुणतांबा येथे जुने रेल्वे फाटक बंद करण्यात आले. अंडरपास ऐवजी नवीन रेल्वे फाटक सुरु करण्यात आले. पुणतांबा रेल्वे स्टेशनला जंक्शनचा दर्जा मिळाला मात्र अजूनही स्टेशनवर सर्व गाडयांना थांबा मिळत नाही. रेल्वे खात्यामार्फत पुणतांबा येथे एकादा छोटा किंवा मोठा उद्योग सुरु करण्याची गरज आहे. त्यामुळे पुणतांबा परिसराच्या विकासाला चालना मिळू शकेल. मात्र त्याकडेही दुर्लक्ष केले आहे. खा. निलेश लंके यांनी नुकतेच दोन उड्डाण पूलांची रेल्वे खात्याकडून मंजुरी मिळविली आहे. त्याप्रमाणे खा. वाकचौरे यांनी पुणतांबा येथील रेल्वेच्या प्रशाबाबत पाठपुरावा करण्याची गरज आहे. या प्रश्नाबाबत ग्रामस्थांचे शिष्टमंडळ लवकरच खा. वाकचौरे यांची समक्ष गाठ घेणार आहेत.

## बंधाऱ्यातील पाण्याचे...

# आ.लंघेंच्या हस्ते जलपूजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील पाचेगावसह पुनतगाव व नेवासा येथील मध्यमेश्वर बंधाऱ्यात भर उन्हाळ्यात आलेल्या पाण्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. बंधाऱ्यामध्ये आलेल्या पाण्याचे आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले.

प्रवरा नदीवरील प्रथम असणाऱ्या पाचेगाव बंधाऱ्यात पाणी सोडवून तालुक्यातील शेतकऱ्यांना आधार देण्याचे काम आमदार लंघे यांनी केले. त्या ऋणातून उतराई होण्यासाठी आमदार लंघे यांच्या हस्ते पाण्याचे जलपूजन करून शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानून सत्कार केला. आमदार लंघे हे पाचेगाव, चिंचबन व नेवासा येथील मध्यमेश्वर बंधाऱ्यावर येताच परिसराच्या गावातील शेतकरी व कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. बंधाऱ्यातील पाणी जास्त काळ टीकत नसल्याने यावर उपायोजना करून निधी उपलब्ध करून देण्यासाठी निवेदने शेतकऱ्यांनी निवेदने दिली. लवकरात लवकर निधी उपलब्ध करून भविष्यात बंधारा पूर्ण क्षमतेने भरून देण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन आ. लंघे यांनी दिले.



जलपूजन कार्यक्रमप्रसंगी शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार, विठ्ठलराव मते, बाळासाहेब शिंदे, माऊली पेचे. भाजपचे ऋषिकेश शेटे, शांताराम तुवर, ज्ञानेश्वर डौले, शेतकरी संघटनेचे हरिभाऊ तुवर, विक्रम तुवर, श्रीकांत पवार, हरिभाऊ जगताप, अशोक कुलकर्णी, अशोक मतकर, बापूसाहेब दारकुंडे, कुणाल बोरुडे, शिवाजी पवार, किरण जाधव, दादासाहेब होन, लक्ष्मण माकोणे, दिगंबर नांदे, दत्तात्रय पाटील, समत कुलकर्णी, सुनील शिंगोटे, योगेश थिटे, अनिल पडूरे, प्रसिद्धीप्रमुख आदिनाथ पटारे, संजय पवार, आप्पासाहेब काळे, अशोक मतकर, ज्ञानेश्वर मतकर, अविनाश सोनावणे, सुरेश पडूरे, अमोल गायकवाड गणेश तुवर, सुधाकर शिंदे, बाप्पू गोरे, ज्ञानदेव आढाव, पवन पवार, राहुल तुवर, राहुल पंडित, भास्कर तुवर, गणेश माकोणे, ज्ञानेश्वर घोगरे, चैतन्य कुलकर्णी, दिलीप कुलकर्णी, प्रशांत विधातटे, नदराज घोगरे, नारायण पांडुरे, रामदास भिसे, अंबादास रोडे, भाऊसाहेब जाधव, बाबासाहेब जाधव, पाटबंधारे विभागाचे शाखा उपअभियंता मारवाडे, बेलपिपळगाव शाखाधिकारी घोंगडे यांच्यासह पपाचेगाव, इमामपूर, गोनेगाव,निंभारी, पुनतगाव चिंचबन, मधमेश्वर, नेवासा बुद्रुक आदी गावातील शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## स्वातंत्र्य लढ्यात क्रांतिविरांचे मोलाचे योगदान : आ. ओगले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : क्रांतीची मशाल हातात घेऊन ब्रिटिश सत्तेच्या गुलामगिरीतून भारताला मुक्त करण्यासाठी ज्या हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची परवा न करता आहुती दिली अशा अमर हुतात्म्यांच्या त्यागाची जाणीव प्रत्येक भारतीयाने ठेवली पाहिजे. भारतीय स्वातंत्र्यासाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या क्रांतिविरांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन आ. हेमंत ओगले यांनी केले,.

शहर काँग्रेस कमिटीच्यावतीने आयोजित शहीद दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी आ. ओगले बोलत होते. ओगले म्हणाले की स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भारतीय जनतेच्या मनात ब्रिटिशाविरुद्ध क्रांतीची मशाल पेटली. त्यामुळे लक्षावधी भारतीयांनी स्वातंत्र्याच्या प्रेरणेने असीम त्याग केला. इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारताला मुक्त करण्यासाठी ज्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले अशा क्रांतिविरांचे स्मरण ठेवणे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. यावेळी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव या क्रांतिविरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा बँकेचे संचालक, मा. उपनगराध्यक्ष करण ससाणे, जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन गुजर, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रमोद भोसले, मा. नगरसेवक दिलीप नागरे, के. सी. शेळके, विलास लबडे, अशोक जगधने, डॉ. राजेंद्र लोंढे, युवा काँग्रेसचे अध्यक्ष रितेश चव्हाणके, रितेश एडके, रावसाहेब आल्हाट, सुरेश ठुबे, रजाक पठाण, आयडी तांबोळी, अमोल शेटे, सनी मंडलिक, जाफर शहा, सुरेश बनसोडे, संजय गोसावी, तीर्थराज नवले, कुंदनसिंग जुनी, सागर दुपाटी, कल्पेश पाटणी आदी मान्यवर उपस्थित होते.





## प्रलंबित प्रश्नांसाठी कामगार धरणे आंदोलन करणार : कुलकर्णी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : शेती महामंडळाच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी तसेच शासनाने महामंडळाच्या कामगारांना राहण्यासाठी दोन गुंठे जागेऐवजी अर्धा गुंठा देण्याचा आदेश केला आहे. त्यासाठी हरेगाव, एकवाडी व पटेलवाडी टिळकनगर येथे रविवारी झालेल्या कामगार मेळाव्यात प्रश्न मार्गी न लागल्यास राज्यातील तेरा मळ्यावरील कामगार शेती महामंडळाच्या पुणे येथील मुख्यालयासमोर प्रत्येक मळ्यावरील कामगारांनी दोन दिवस असे २६ दिवस धरणे आंदोलन करण्याचा इशारा सरचिटणीस सुभाष कुलकर्णी यांनी दिला. अध्यक्षस्थानी संपतराव मुठे होते.

कुलकर्णी म्हणाले की, सर्व कामगारांना माहिती दिली जाते. त्याचा उपयोग होत नाही. आकारी पडीत शेतकऱ्यांना जमीन मिळाली नाही. त्यापूर्वी इतर प्रयोजनासाठी शेती महामंडळाची जमीन देण्यात आली. त्याचा ताबा, मोजणी करण्यासाठी शासकीय अधिकारी आले. त्यावेळी आकारी पडीत शेतकरी यांनी आम्हाला जमिनी मिळेपर्यंत शेती महामंडळ जमिनीचा ताबा कोणाला देऊ देणार नाही. आंदोलन करून काम बंद पाडले. तसे कामगारांनी आपल्या विविध प्रश्नासाठी, लढा देण्याची गरज आहे. पुणे येथे महामंडळ मुख्यालयात कामगारांना घरकुलासाठी दोन गुंठे जागा देण्याचा निर्णय झाला. पण जीआर निघाला ग्रामपंचायतला घरकुलासाठी अर्धा गुंठा देण्याचे आदेश झाल्याने कामगार नाराज झाले. त्यात सुद्धा ज्यांची घरकुले मंजूर आहेत त्यांनाच अर्धा गुंठा जागा दिली जाईल. इतरांना नाही, असा उल्लेख आहे. त्याविरोधात उच्च न्यायालयात कामगार संघटना यांनी याचिका दाखल केली व त्याप्रमाणे संबंधित अधिकारी यांना न्यायालयाने नोटीसा बजावल्या. शासनाने शेती महामंडळाच्या जमिनी एक रुपया न घेता हजारो एकर फुकट वाटल्या, असेही कुलकर्णी यांनी सांगितले.

यावेळी कामगार नेते अविनाश आपटे, अशोक पाटील, उत्तम राजगुडे, भालचंद्र कोल्हटकर, रामचंद्र दानुले आदींनी मनोगत व्यक्त करून मार्गदर्शन केले. यावेळी चंद्रकांत येरुळे, वीर, कारभारी त्रिभुवन, फकीरा पंडित व कामगार उपस्थित होते.

# नारायणगिरी महाराजांच्या वाणीतील सुगंध आजही दरवळतो : रामगिरी महाराज

## नारायणगिरी महाराजांची १६ वी पुण्यतिथी भाविकांच्या मांदियाळीत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव** : श्रीक्षेत्र गोदाधाम सरालाबेटचे सदगुरू गंगागिरी महाराजांनंतरच्या उत्तराधिकारी परंपरेत गुरूवर्य सगुरू नारायणगिरी महाराजांनी सर्वाधिक दीर्घकाळ सेवा करून भक्तांचा वटवृक्ष फुलविला. त्यांच्या वाणीतील सुगंध आजही दरवळतो आहे. त्यांनी दाखवून दिलेल्य मार्ग परंपरेनुसार आज आम्ही यशस्वी वाटचाल करत असल्याचे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी नारायणगिरी महाराज यांच्या १६ व्या पुण्यातिथी सोहळ्यात कीर्तनातून भाविकांना उपदेश करताना केले.

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या गोदाधाम सरालाबेट येथे सालाबादप्रमाणे १६ व्या वर्षीही हजारो भाविकांच्या मांदियाळीत मोठ्या उत्साहात गुरूवर्य नारयणगिरी महाराज यांचा पुण्याततिथी सोहळा पार पडला. रामगिरी महाराज यांच्या हस्ते गुरूवर्य नारायणगिरी महाराज समाधीचे विधीवत पूजन करून महाआरती झाली. रामगिरी म्हणाले की, प्रश्न निर्माण झाल्याखेरीज उत्तर सापडत नाही. ज्याच्या जीवनात शंका, प्रश्न निर्माण होत नाही असे जीवन व्यर्थ आहे. योगीराज सदगुरू गंगागिरी महाराजानंतर बेटांचे उत्तराधिकारी गादी परंपरेत नारायणगिरी महाराज यांनी सर्वाधिक दीर्घकाळ भाविक भक्तांच्या माध्यमातून परमार्थाची सेवा केली. छत्रपती संभाजीनगर, अहिलयानगर, नाशिक जिल्ह्यात लाखो भाविक श्रध्देने बेटाशी जोडून वटवृक्ष फुलविला. त्यांच्या वाणीतील सुगंध आजही सर्वत्र दरवळतो आहे. त्यानी दाखविलेल्या परंपरा मार्गावर आपणं यशस्वी वाटचाल करत आहोत. गुंतागुंतीचा परमार्थ स्वीकारू नये. परमार्थात भक्तीत गुरू करताना काळजी घेतली पाहीजे. हल्ली गुरू जर तुरूंगात असेल तर भक्त शिष्य गणांनाही समाजात खाली मान घालून चालण्याची वेळ येते, असे त्यांनी सांगितले. .



आमदार, खासदार, पालक मंत्रीमहोदय यांच्याकडे बेटाच्या विकासासाठी समस्या मांडताना महंत रामगिरी महाराज म्हणाले की, या तीर्थक्षेत्रावर दर्शनासाठी हजारो भाविक येत असतात. इथं येण्यासाठी त्यांचा धुळीच्या रस्त्याचा सामना करावा लागतो. या ठिकाणी सर्वपक्षीय भक्तगण, राजकीय नेते आहेत. सर्वांनी नेटाने आपापल्या परीने विकास योजनेसाठी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे, संभाजीनगरचे खासदार संदिपान भुमरे यांनी मनोगत व्यक्त करत विकासकामे करण्याचे आश्वासन दिले. हजारो भाविकांना पुरणपोळी मांडे, दूध, आमटी महाप्रसाद देण्यात आला.

### महाराजांनी योग्यवेळी हिंदुत्वाचा मुद्दा उचलला : ना. शिरसाट

महंत रामगिरी महाराज यांनी योग्य टाईमिंगवर प्रखर हिंदुत्वाचा मुद्दा उचलल्याने वातावरण ढवळून निघाले. तेव्हापासून आपण महंत रामगिरी महाराज यांचे फॅन बनलो अन् बेटांशी जोडलो गेलो. या धार्मिक सोहळ्यात कुणी एका जातीधर्माचे नाही. एकमेकांचे नातेवाईक, मित्र नाहीत. निव्वळ श्रध्देने, स्वयंस्फूर्तीने किती वर्षांपासून जोडले गेले आहेत. एकत्र आलेले हे भाविक ही खरी महाराजांच्या श्रद्धेची ताकद आहे. हे एक परमार्थ भक्तीचे नेटवर्क व्यासपीठ आहे. आम्हाला गर्दी जमवताना आमचा किती जीव जातो हे आम्हालाच माहिती. महाराजांचे आशीर्वाद आमच्या पाठिशी आहेत. पर्यटन मंत्री शंभुराजे देसाई,अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या समवेत आम्ही बेटावर विकास आराखडा बैठक लावून प्रश्न सोडविणार असल्याचे ते म्हणाले.

## इलेक्ट्रिक वाहनांवरील कराला आ. सत्यजीत तांबेंचा विरोध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : जगभरासह देशात ऑटोमोबाईल क्षेत्रात इलेक्ट्रिक कारची मागणी वेग धरू लागली असताना महाराष्ट्रात मात्र राज्य सरकारकडून इलेक्ट्रिक गाड्यांच्या मागणीला ब्रेक लावण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे समोर येत आहे. राज्य सरकारने अर्थसंकल्पात ३० लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर ६ टक्के मोटार वाहन कर लावण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या निर्णयाला आमदार सत्यजीत तांबे यांनी जोरदार विरोध केला असून, हा कर अन्यायकारक असल्याचा आरोप केला आहे.

### महाराष्ट्रात सर्वाधिक विक्री

महाराष्ट्रात २०२४ मध्ये १५,०४४ इलेक्ट्रिक कार विकल्या गेल्या आहेत. भारतातील एकूण इलेक्ट्रिक कार विक्रीपैकी १५ टक्के विक्री महाराष्ट्रातून होते. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ६ टक्के कर लावण्याचा निर्णय घेतला आहे.

आ. तांबे यांनी विधीमंडळात सरकारला प्रश्न विचारला की, देशातील इतर कोणत्याच राज्यात इलेक्ट्रिक वाहनांवर कर नाही, मग महाराष्ट्रातच का?žž तसेच, केंद्र सरकार प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना देण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देत आहे, अशा स्थितीत महाराष्ट्र सरकारने कर लावणे म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीला विरोध करण्यासारखे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र सरकारने आतापर्यंत इलेक्ट्रिक वाहनांवर कोणताही कर लावलेला नव्हता. मात्र, नव्या निर्णयामुळे ही वाहने ६ टक्क्यांनी महाग होणार आहेत. महाराष्ट्रातील ऑटोमोबाईल उद्योग मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहे, त्यामुळे या निर्णयाचा उद्योगावरही परिणाम होईल, असे आ. तांबे यांनी सांगितले.

तसेच, राज्यात इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशनची सुविधा अपुरी आहे. केवळ मुंबई महापालिकेने पार्किंगमध्ये चार्जिंग पॉइंट सक्तीचे केले असले तरी इतर ठिकाणी चार्जिंग स्टेशन नाहीत. अशा परिस्थितीत सरकार या करातून चार्जिंग सुविधांचा विकास करणार का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

# महिलांचे कार्य समाजाला प्रेरणादायी : वसंत कदम

## सामाजिक समरसता मंचकडून महिलांचा सन्मान



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : सामाजिक एकोपा आणि सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी सामाजिक समरसता मंच कार्यरत आहे. विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या महिलांच्या सत्काराचे आयोजन समरसता मंचच्या वतीने करण्यात आले. समाजाला प्रेरणा देणारे त्यांचे कार्य सर्वांसमोर यावे, हा हेतू त्यामागे आहे, असे प्रतिपादन सामाजिक समरसता मंचचे जिल्हा संयोजक वसंत कदम यांनी केले.सामाजिक समरसता मंचच्या माध्यमातून राहाता येथील कला, वाणिज्य महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात कदम बोलत होते. या कार्यक्रमात जयमाला कुलकर्णी (सांस्कृतिक व लेखन), सारिका आहेर (शैक्षणिक), गायत्री म्हस्के (सामाजिक), माधुरी शिंदे (धार्मिक), संगीता मालकर (शैक्षणिक व सामाजिक), माधुरी जावळे (तंत्रज्ञान), सुधाराणी बेदलामाडी (सेवाभाव) या कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला.

योग प्रशिक्षक वृंदा कोऱ्हाळकर, प्राचार्य सोमनाथ घोलप, विठ्ठल जाधव, मयुरेश नवले, प्रा. रघुनाथ गोंदकर, अनिल पिपाडा, ललित मुनावत, अजय गरूड, राजेंद्र पवार, नीलेश जाधव, शुभांगी कदम, सुरक्षा कुलकर्णी, सुवर्णा म्हस्के, स्वरूपा कुलकर्णी, सारिका मुनावत आदी यावेळी उपस्थित होते.

कोऱ्हाळकर म्हणाल्या की, मंचच्या सामाजिक माध्यमातून समतेचा संदेश दिला जातो. सर्वांना समान संधी आणि सदभाव यासाठी हे व्यासपीठ कार्यरत आहे. सध्याच्या वातावरणात सामाजिक समरसता मंचच्या कार्याची गरज आहे. प्राचार्य सोमनाथ घोलप यांचेही भाषण झाले. सामाजिक कार्यकर्त्या उमाताई वहाडणे यांनी उपस्थितांना सामाजिक समरसतेची शपथ दिली. सुनीता जैन यांनी सूत्रसंचालन केले. स्वरूपा कुलकर्णी यांच्या पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# गावोगावी पैठणीच्या खेळाचे आयोजन करणार : धनश्री विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव** : ग्रामीण भागातील महिला आपल्या कुटुंबासाठी दिवसभर शेतात, घरी, विविध क्षेत्रात काम करतात. मात्र त्यांना सार्वजनिक कार्यक्रमात आनंद घेता येत नाही. खेळ पैठणी कार्यक्रम आयोजित करून महिलांचा सन्मान केला. भविष्यात असेच कार्यक्रम आयोजित करू असे आश्वासन रणरागिनी महिला मंडळाच्या अध्यक्षा धनशी विखे यांनी दिले.

खासदार डॉ. सुजय विखे पाटील मित्र मंडळ व मैत्रिय महिला ग्रामसंघ मुठेवाडगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने भारतीय जनता पार्टीचे तालुका उपाध्यक्ष डॉ. शंकरराव मुठे यांच्या विशेष सहकार्याने खेळ पैठणीचा– सन्मान महिलांचा कार्यक्रमात विखे बोलत होत्या. त्या म्हणाल्या की, मुठेवाडगाव येथे महिला भगिनींसाठी डॉ. शंकरराव मुठे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन करून महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. पुढील काळात महिलांनी अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करावे.



पैठणीच्या खेळात लहान मुलींपासून ते ९० वर्षाच्या आजीबाईपर्यंत सर्वांनीच सहभाग नोंदवला. सहभागी महिलांच्या नावाचा लकी ड्रॉ काढण्यात आला. फ्रिज, कुलर, फॅन अशा वस्तू भेट देण्यात आल्या. विजेत्या पाच महिलांना मानाची पैठणी देण्यात आली. सूत्रसंचालन पत्रकार गणेश हापसे यांनी केले.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, तालुकाध्यक्ष दीपक पटारे यांनी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. बाजार समितीचे संचालक गिरीधर आसने, भाऊसाहेब बांद्रे, भैरवनाथ कांगुणे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब चिडे, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष मंजुषा ढोकचौळे, पुष्पलता हरदास, पूजा चव्हाण, भाजपचे तालुका प्रसिद्धीप्रमुख पत्रकार संदीप आसने, जयराम मुठे, सचिन मुठे, आकाश मुठे, दिलीप हुरूळे, रावसाहेब काळे, आत्माराम मुठे, आबासाहेब घोडेचोर, किशोर आण्णा बनसोडे, विकास बनसोडे, जयदीप आसने, नानासाहेब आसने, सुरेश मुठे, मारुती जाधव, रामेश्वर मुठे आदींसह मुठेवाडगाव, माळवाडगाव, भामाठाण, उंदीरगाव, खोकर, भोकर, कमलपूरसह परिसरातील महिला उपस्थित होत्या.

## पान १ वरुन

### नाशिक कुंभमेळ्यासाठी योगी पॅटर्न,११०० कोटींचा निधी

१८ तास ड्युटी करत होते, कोणी कंप्लेंट करत नव्हते. ते म्हणत होते आम्हाला कुंभाने ताकद दिली. नाशिक आणि महाराष्ट्राचे युवा या कुंभमेळ्यात जोडले गेले पाहिजे , वेगळ्या पद्धतीने ते जोडले गेले पाहिजे, असाही विश्वास यावेळी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

### पाच चिनी उत्पादनावर भारतात ॲण्टी-डम्पिंग शुल्क!

आयात केलेल्या वस्तूंवर वाढीव कर लादले जातात. थोडक्यात 'ण्टी-डम्पिंग' हे देशाअंतर्गत उद्योगांचे संरक्षण करणारे शुल्क आहे. जे सरकार परदेशातील आयातीवर आकारते. डम्पिंग ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये एखादी कंपनी एखादे उत्पादन सामान्यपणे त्या देशातील बाजारपेठेत आकारत असलेल्या किमतीपेक्षा लक्षणीयरीत्या कमी किमतीला दुसऱ्या देशात निर्यात करते.

### नागपूर शांत : संचारबंदी उठवली

औरंगजेबच्या कबरीवरुन झालेल्या वादानंतर १७ मार्च रोजी नागपूरमध्ये दंगल उसळली होती. संचारबंदी उठल्यानंतर नागपूर पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांनी हिंसाचाराचे केंद्र राहिलेल्या भालदारपुरा या भागाची पाहणी केली. यावेळी एबीपी माझाशी बोलताना त्यांनी नागपूरची स्थिती नियंत्रणात असून परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर संचार बंदी उठवण्याचा निर्णय घेतल्याचं सांगितलं. पुढील काळात सोशल मीडियाच्या वापरावर पोलिसांची कडक नजर राहणार असल्याचे देखील पोलिस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांनी सांगितलं.

नागपूरमधील अग्रेसन चौक, चिटणवीस पार्क , शिवाजी चौक ,गांधीगेट , महाल मार्केट हंसापुरी , मोमीनपुरा भागातून रुट मार्च काढण्यात आला. संचारबंदी हटवल्यानंतर या परिसरातील दुकानं उघडायलाही सुरुवात झाली आहे. हिंसाचारामुळे नागपुरात निर्माण झालेला तणाव आता निवळला असून जनजीवन पूर्ववत होवू लागल्याने नागपूरकरांकडूनही समाधान व्यक्त केलं जातंय.

### विठाबाई नारायणगावकर तमाशा कला पंढरीत लोकनाट्याचे ३१० करार

फडाचे प्रमुख तारखांसह २० ते ३५ करार झाले आहेत. तर गायक, नृत्यांगना, कर्मचारी आशा ५० ते ६० जणांचा ताफा असलेल्या हंगामी फडाचे पाच ते दहा करार झाले आहेत. मोठ्या तमाशाचे करार पूर्ण झाल्यानंतर हंगामी फडाचे करार वाढतील अशी अपेक्षा या फड मालकांना आहे. तमाशाचे हंगामी (लहान) व तंबूचे (मोठे)असे दोन प्रकार आहेत.हंगामी फडमलकांच्या तुलनेत तंबूच्या फडमलकांचा वाहने, कलावंत, नृत्यांगना,गायक, वादक आदींचा शंभर ते दीडशे जणांचा ताफा आहे. यामुळे आर्थिक स्थिती चांगल्या असलेल्या यात्रा समितीच्या प्रमुखांकडून नावाजलेल्या तमाशाला जास्त मागणी आहे. या वर्षी मोठा ताफा असलेल्या तमाशाचे (हजेरीसह) मुख्य तिथींचे अडीच लाख ते चार लाख रुपयांच्या दरम्यान करार झाले आहेत, अशी माहिती फड मालक अविष्कार मुळे, मोहित सावंत, किरण कुमार ढवळपुरीकर, संभाजी राजे जाधव यांनी दिली.

### न्यायमूर्तींच्या निवासस्थानी मोठी रोकड!

पैशाचा स्रोत आणि त्याच्या अधिकृत बंगल्यात त्याची उपस्थिती याबद्दल विचारले तेव्हा न्यायमूर्ती वर्मा यांनी त्यांच्याविरुद्ध कट रचल्याची भीती व्यक्त केली. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीचे अधिकृत कर्मचारी, न्यायमूर्ती वर्मा यांच्या निवासस्थानी गेल्या सहा महिन्यांत तैनात केलेले खाजगी सुरक्षा अधिकारी आणि सुरक्षा रक्षक यांचा तपशील तपासण्यास सांगितले होते. न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या गेल्या सहा महिन्यांतील अधिकृत किंवा इतर मोबाइल फोन नंबरचे कॉल रेकॉर्ड तपशील देण्यासाठी मोबाइल सेवा देणाऱ्या कंपन्यांना विनंती पत्र पाठवले जाऊ शकते.

मुख्य न्यायमूर्ती खन्ना यांनी न्यायमूर्ती उपाध्याय यांना न्यायमूर्ती वर्मा यांना 'त्यांच्या मोबाईल फोनची विल्हेवाट लावू नका किंवा त्यांच्या मोबाईल फोनवरून कोणतेही संभाषण, संदेश किंवा डेटा हटवू नका किंवा बदलू नका' असा सल्ला देण्यास सांगितले होते. उत्तरात, दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी लिहिले की, कॉल तपशील रेकॉर्ड प्राप्त झाला आहे आणि या पत्रासह पेन ड्राइव्हमध्ये पाठविला जात आहे. आयपीडीआरच्या संदर्भात, ते पोलिस आयुक्त, दिल्ली/मोबाइल सेवा प्रदात्याकडून प्राप्त होताच ते तुम्हाला ताबडतोब उपलब्ध करून दिले जाईल.

निर्दोष असल्याची बाजू मांडत न्यायमूर्ती वर्मा यांनी लिहिले, मी स्पष्टपणे सांगतो की, त्या स्टोअररूममध्ये मी किंवा माझ्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने कधीही रोकड ठेवली नाही आणि ती रोकड आमची नाही. ही रोकड आमच्याकडे आहे किंवा साठवून ठेवली आहे ही कल्पना किंवा सूचना पूर्णपणे मूर्ख असल्याचे त्यांनी सांगितले. कोणीतरी मोकळ्या, सहज उपलब्ध असलेल्या आणि सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या स्टोअर-रूममध्ये स्टाफ क्वार्टरजवळ किंवा आऊटहाऊसमध्ये रोकड ठेवेल ही सूचना अविश्वसनीय आहे.१४ मार्च रोजी रात्री होळीच्या दिवशी माझ्या शासकीय निवासस्थानाच्या जवळ असेलल्या स्टोअररूममध्ये आग लागली होती. ही स्टोअररूम आमचे सर्व कर्मचारी जुने फर्निचर, बाटल्या, क्रॉकरी, गाद्या, वापरलेले गालिचे, बागेच्या कामाचं सामान, आणि इतर वस्तू ठेवण्यासाठी वापरतात. या खोलीचे दरवाजे कायम उघडे असतात. तिथे मुख्य प्रवेशद्वारातून आणि स्टाफ क्वार्टरच्या मागून प्रवेश करता येतो. न्यायमूर्ती वर्मा यांनी पुढे सांगतात की, जेव्हा ही घटना घडली तेव्हा मी आणि माझी पत्नी मध्यप्रदेशमध्ये होतो. तर दिल्ली येथील निवासस्थानी माझी मुलगी आणि वृद्ध आई होती. मध्यरात्री त्या ठिकाणी आग लागली, तेव्हा माझ्या मुलीने आणि खाजगी सचिवांनी अग्निशमन दलाला याची माहिती दिली. त्यानंतर ही आग विझवण्यात आली. आमच्या कुटुंबातील सदस्य जेव्हा तिथे पोहोचले तेव्हा तिथे नोटा किंवा नोटांचे अवशेष सापडले नव्हते.मी किंवा माझ्या कुटुंबामधील कुठल्याही सदस्याने त्या स्टोअर रूममध्ये कधीही रोख रक्कम ठेवली नव्हती. माझ्यावर होत असलेले आरोप अविश्वसनीय, निंदनीय आणि हास्यास्पद आहेत. मी जेव्हा दिल्लीमध्ये परतलो तेव्हा मला या घटनेची माहिती समजली. मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी मला फोन करून या घटनेची माहिती दिली, तोपर्यंत मला केवळ शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचंच सांगितलं होतं.आगीची घटना घडल्यानंतर न्यायमूर्ती वर्मा आणि त्यांच्या खासगी सचिवाने जळालेल्या खोली पाहिली होती. तेव्हा तिथे कुठल्याही प्रकारची रोख रक्कम किंवा जळालेल्या नोट्या सापडल्या नव्हत्या. मात्र १६ तारखेला कोर्टाचं कामकाज सुरू होण्यापूर्वी मी मुख्य न्यायाधीश उपाध्याय यांची भेट घेतली तेव्हा त्यांनी मला दिल्ली पोलिसांनी दिलेला एक व्हिडीओ दाखवला. तो व्हिडीओ पाहून मला धक्काच बसला कारण घटनास्थळावरील दृश्य आणि व्हिडीओत दिसत असलेलं दृश्य एकदम वेगळंच होतं. हा सर्व प्रकार मला फसवण्यासाठी आणि बदनाम करण्यासाठी आखलेला कट असल्याचा मला संशय आहे.

NAME CHANGE
CHANGE OF NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME **SHAHA SURAYYABI HAMID** (NAME AS PER PANCARD NO.EZYPS7066B) TO NEW NAME AS **SURAIYABI HAMIDBHAI SHAIKH**
**VIDE AADHAR NO.5719 1638 2710**

# पाटबंधारे विभागाकडून हॅरिसन ब्रँच चारीचे वाटोळे

## बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या : होन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव** : तालुक्याला वरदान ठरलेल्या गोदावरी उजव्या कालव्याच्या लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना वरदान ठरलेल्या हॅरिसन ब्रँच चारीने अनेक चढ-उतार पाहिले आहेत. या चारीच्या लाभक्षेत्रातील सोनेवाडी, चांदेकसारे, डाऊच खुर्द, जेऊर कुंभारी व कोकमठाण परिसरातील शेतकरी एकेकाळी समृद्ध होता. त्यामुळेच भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या परिसराला कॅलिफोर्निया म्हणून संबोधले असल्याचे सांगितले जाते. मात्र २०११/१२ या वर्षापासून या चारीला घरघर लागली असून पाटबंधारे विभाग जाणीवपूर्वक या शेतकऱ्यांचे वाटोळे करत असल्याचा आरोप शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख भगीरथ होन यांनी केला आहे. पाटबंधारे विभागाने या चारीचे वाटोळे केले असून हॅरिसन ब्रँच चारी लाभ क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना नाशिक पाटबंधारे विभागाकडून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी होन यांनी केली आहे. गोदावरी उजव्या कालव्याला आवर्तन सुटल्यानंतर पाणी राहता तालुक्यातील चितळी परिसरात टेलला गेल्यानंतर लगेच सुरुवातीला हॅरिसन ब्रँच चारी सुटली जायची. या चारीच्या लाभ क्षेत्रात हजारो एकर बागायती क्षेत्र होते. मात्र सन २००५ च्या समन्वयी पाणी वाटप कायद्यानंतर नाशिक पाटबंधारे विभागाने पूर्वीच्याही आवर्तन सोडण्याच्या निर्णयात बदल केला आहे का असाही सवाल त्यांनी केला आहे.अनेक वेळा परिसरातील शेतकऱ्यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या विरोधात आंदोलन उपोषण केले आहे. गोदावरी उजव्या कॅनलला आवर्तन सुटल्यानंतर किमान आठ ते दहा दिवसात ही सारी सुटायला हवी असते मात्र गेल्या दहा ते पंधरा वर्षापासून असे घडत नाही. पाटबंधारे विभागाच्या राहाता येथील अधिकाऱ्यांशी या संदर्भात अनेक वेळा संपर्क केला असता त्यांनीही यासंदर्भात उडवा उडवी करत ये रे माझ्या मागल्या असेच काही केले आहे.या चारीच्या संदर्भात राजकारण होते का असाही प्रश्न उपस्थित होतो. मात्र राजकारणी मंडळी ही ही चारी वेळेस सोडण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे अनेक वेळा दिसून आले. मात्र तरीही पाटबंधारे विभाग कडून दखल का घेतली जात नाही. हा मोठा यक्षप्रश्न आहे.आता या परिसरातील शेतीचे पूर्ण वाटोळे झाले असून गेल्या आठवड्यातच शेतकऱ्यांना आपल्या शेतात लावलेल्या कांदा गहू व ऊस भाजीपाला फळबागांना पाणी मिळणे अपेक्षित होते. मात्र अजून देखील पाण्याची प्रतीक्षा असल्याने आता या परिसरातील या पिकांचे नुकसान होत आहे. गेल्या पंधरा वर्षापासून हा अन्याय या परिसरातील शेतकरी सहन करत असून अधिकारी व सरकारकडून देखील कुठल्याही प्रकारची दखल घेतली जात नसल्याने आता परिसरातील शेतकऱ्यांना बरोबर घेत पंधरा वर्षापासून झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्यासाठीच आंदोलन उभारण्यात येणार असल्याचे शिवसेना शेतकरी संघटनेचे जिल्हाप्रमुख भगीरथ होन यांनी सांगितले आहे.

# पतसंस्था कर्ज परतफेड प्रकरणी शासनाला म्हणणे मांडण्याची शेवटची संधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सोनई** : राज्यातील सहकारी पतसंस्थांनी शासनाच्या सामोपचार कर्जफेड योजनेला केराची टोपली दाखवली आहे. त्यामुळे दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीच्या वेळी याप्रकरणी राज्य शासनाला म्हणणे माडण्याची शेवटची संधी देत असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने म्हटले आहे. या शासन निर्णयाचा गेल्या पंधरा ते सोळा वर्षापासून पतसंस्था विरोधात लढा चालू असून राज्यात कोणालाही लाभ मिळालेला नाही. कर्जदाराने तसा अर्ज केल्यास पतसंस्था अर्ज स्वीकारण्यास नकार देतात. पतसंस्थांच्या मनमानी कारभार मूळे राज्यातील एकाही पतसंस्था कर्जदाराला पंधरा वर्षापासून या योजनेमुळे कर्जमुक्त होता आलेले नाही. ही बाब माहिती अधिकारात उघड झाली आहे. त्यामुळे या शासन निर्णयाची योग्य अंमलबजावणी होण्यासाठी शासनाला आदेश व्हावेत या निर्णयाची योग्य अंमलबजावणी झाल्यास अनेक पतसंस्था कर्जदारांना कर्जमुक्त होता येऊ शकते, हा उद्देश समोर ठेऊन या सामोपचार योजनेमुळे पतसंस्थेचा ताळेबंद सुधारेल, आर्थिक अडचणीतील पतसंस्था सावरतील, या हेतूने ॲड. रामदास घावटे यांनी संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल केली दाखल केली. दोन वर्षे उलटूनही राज्य सरकारने म्हणणे सादर केले नाही, त्यामुळे खंडपीठाने चार आठवडे ची मुदत देऊन राज्य सरकारला याबाबत अखेरची संधी देण्यात आलेली आहे. पुढील सुनावणी ९ एप्रिलला ठेवण्यात आलेली आहे. याप्रकरणी न्यायमूर्ती मंगेश पाटील, न्यायमूर्ती प्रफुल्ल खुबाळकर पाटील यांच्यासमोर ही सुनावणी चालू आहे. याचिकाकर्ते यांच्यातर्फे ॲड .अरविंद आंबेटकर हे बाजू मांडत आहे.

### ऐच्छिक शब्द वगळावा

शासन निर्णयात ही योजना स्वीकारण्याची बाब ऐच्छिक ठेवल्याने पतसंस्था ही योजना स्वीकारत नाहीत या योजनेतून ऐच्छिक शब्द वगळून मागणी केलेल्या कर्जदारांना योजनेच्या माध्यमातून ८ टक्के व्याज दराने कर्जमुक्त करावे, अशी मागणी याचिकेत केलेली आहे.

राज्य शासनाच्या योजनेची योग्य अंमलबजावणी केल्यास राज्यातील कर्जदाराच्या आत्महत्या थांबून प्रपंच वाचतील, कर्जदारांना दिलासा मिळेल, व पतसंस्थाची वसुली होऊन कर्जदार ठेवीदार या सर्वांना व्यापक आर्थिक लाभ मिळेल, म्हणून सहकार वर्षानिमित्त सरकारने योग्य निर्णय घेऊन सर्वसामान्य जनतेशी पाठीशी राहावे.

**– ॲड. रामदास घावटे**
**याचिकाकर्ते**

## निधन वार्ता..

### विठ्ठल झेंडे पाटील



**श्रीगोंदा** : तालुक्यातील चिखली येथील विठ्ठल भैयासाहेब झेंडे पाटील (वय ८५) याचे निधन झाले असून ते सेवा निवृत्त वाहतूक नियंत्रक म्हणून त्यांनी काम केले.ह. भ. प. नारायण झेंडे यांचे ते वडील होत, त्यांच्या पश्चात एक मु लगा, तीन मुली. जावई.सुन. नातवंड चार भाऊ पुतणे असा मोठा परिवार आहे. माजी सरपंच रामेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अजिंक्य झेंडे यांचे ते चुलते होत.

# कापूस सुधार प्रकल्पाच्या शेततळ्याचे जलपूजन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथील कापूस सुधार प्रकल्पाच्या शेततळ्याचे जलपूजन दि. २० मार्च रोजी संपन्न झाले. या शेततळ्याचे जलपूजन विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या हस्ते पार पडले. सदरील शेततळे हे कापूस सुधार प्रकल्प येथील येथे तयार करण्यात आले असून या शेततळ्याची लांबी ११० मीटर असून रुंदी ७४ मीटर व खोली ९ मीटर आहे हे शेततळे एकूण ८१४० चौ. मी. असून शेततळ्याची साठवण क्षमता ७ कोटी लिटर इतकी आहे. या शेततळ्याचे खोदकाम २०१५ मध्ये सुरु झाले होते या शेततळ्यात तत्कालीन संशोधन संचालक डॉ.आर.एस.पाटील व माजी कुलगुरू डॉ.तुकाराम मोरे यांच्या संकल्पनेतून प्लास्टिक पेपर टाकण्यात आला आहे. कापूस सुधार प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावरील शेततळे हे टेलला असल्यामुळे पाटाचे पाणी पूर्ण क्षमतेने येत नसल्याने कार्यालय प्रमुख डॉ.पवन कुलवाल यांच्या मार्गदर्शनाखाली व विद्यापीठाच्या जेसीबीच्या सहाय्याने पाणी येण्यापूर्वी चर दुरुस्त करून घेतला व २० मार्च रोजी शेततळे पूर्ण क्षमतेने भरण्यात आले. या शेततळ्यामुळे प्रक्षेत्रावरील एकूण ५० हेक्टर क्षेत्रावर या तळ्याचा शाश्वत विकास पाणी देण्यासाठी उपयोग होणार आहे. तसेच प्रक्षेत्रावर कापूस भुईमूग व ज्यूट या पिकांचे प्रायोगिक चाचणी प्रयोग घेतले जातात तसेच प्रक्षेत्रावर भुईमूग सोयाबीन गहू हरभरा व कांदा पिकांचे उत्पादन घेतले जाते त्यामुळे प्रक्षेत्रावरील पिकांना विहीर व नदीवरील लिफ्टने मोटारीच्या साह्याने पिकांना पाणी दिले जात होते आता शेततळे परिपूर्ण तयार झाल्याने हे शेततळे पिकांना लाभदायक ठरणार आहे.

या शेततळ्याच्या जलपूजनाप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.नितीन दानवले, विस्तार शिक्षण संचालक डॉ. ससाने, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, उद्यानविद्या विभाग विभाग प्रमुख डॉ.भरत पाटील, डॉ. सुरेश दोडके, डॉ.सचिन सदाफळ यांच्यासह अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच परिसरातील शेतकरी सचिन शेटे, भाऊसाहेब शेटे, नंदू हरिचंद्रे उपस्थित होते.

# माजी सैनिकाने आजीवन योद्धा बनवून समाजसेवा करावी : हजारे

## राळेगणसिद्धी येथे सैनिक योद्धा सेवाभावी संस्थेचे उद्घाटन



पारनेर तालुक्यातील राळेगणसिद्धी येथे नवलभाऊ फिरोदिया सभागृहामधे सैनिकयोध्दा सेवाभावी संस्थेचे उध्दाटन पद्मधूषण अण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते झाले. (छाया : दत्ता गाडगे)

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पारनेर : शहीद दिनाचे (२३ मार्च) औचित्य साधून जेष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या विचारातून निर्माण झालेल्या सैनिक योद्धा सेवाभावी संस्था महाराष्ट्र राज्य उद्घाटन समारंभ सोहळा पारनेर तालुक्यातील राळेगणसिद्धी येथील नवलभाऊ फिरोदिया सभागृह येथे पार पडला. या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष पद्मभूषण डॉ. हजारे यांनी सैन्यातील थरारक आठवणींना उजाळा देऊन प्रत्येक सैनिकाने आजीवन योद्धा बनवून समाजसेवेचे कार्य आपल्या गावातून सुरू करण्यास सांगितले. त्याचसोबत शुद्ध आचार, शुद्ध विचार, त्याग, निष्कलंक जीवन व समाजसेवा या पंचसूत्रीचे रहस्य उघडले.

प्रारंभी संस्थेचे कार्याध्यक्ष रामदास पालेकर यांनी स्वागत तर प्रास्ताविक सचिव बाळासाहेब नवले यांनी केले.

कॅप्टन विठ्ठल वराळ, कॅप्टन प्रभाकर थेऊरकर साहेब, तसेच अण्णासाहेब हजारे यांनी आपल्या मनोगतातून संस्थेस शुभेच्छा दिल्या. संस्थेचे मुख्य मार्गदर्शक ले. कर्नल साहेबराव शेळके (निवृत्त) यांनी त्यांनी राबवत असलेल्या विविध उपक्रमाविषयी माहिती देऊन या संस्थेच्या पुढील ध्येय धोरणाबद्दल मार्गदर्शन केले. प्रमुख उपस्थिती असलेले ले. कर्नल सतेश हंगे (निवृत्त) जिल्हा सैनिक अधिकारी, पुणे यांनी माजी सैनिकांसाठी महाराष्ट्र शासनातर्फे राबवत असलेल्या विविध योजनाची माहिती देऊन सर्व भत्त्यामध्ये वाढ झाल्याची बाब निदर्शनास आणली. कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी शुभेच्छा दिल्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार संस्थेचे अध्यक्ष शामराव धुमाळ यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व कार्यकारी पदाधिकाऱ्यांसह राजू मेहेत्रे, दादा पठारे, मारुती पोटघन, प्रफुल्ल पतंगे, उमाकांत भुजबळ, बापूसाहेब निलख, मधुकर पायगुडे, दगडू कहाणुरकर, पी एन राव, वीरपत्नी माधुरी लोखंडे, विरपत्नी आशा ढमढेरे व विरपत्नी मंदा रणशिंग यांनी विशेष प्रयत्न केले. सूत्रसंचालन संतोष तरटे यांनी केले.

# आपले डोळे प्रभूच्या प्रेमावर केंद्रित करा




कधीकधी आपल्याला प्रार्थना आणि येशूशी असलेले आपले नाते खूपच निराशाजनक वाटते. मी माझ्या भावाकडे प्रार्थनेतील माझ्या चिंता, इच्छा आणि प्रश्नांसह वळतो आणि मला मिळणारा अर्थ असा आहे की कृतीचा एक मार्ग आहे जो सर्वोत्तम प्रकारे गोंधळात टाकणारा आहे, बर्याच वेळा गैरसोयीचा आहे आणि सर्वात वाईट वेळी वेडा आहे. मला वाटते की जेव्हा अलीशाने त्याला त्याचा कुष्ठरोग दूर करण्यासाठी घाणेरड्या नदीत आंघोळ करण्यास सांगितले तेव्हा नामानला असेच वाटले असेल. तो कदाचित असा विचार करत असेल की हे असे व्हायला नको.

मला वाटले होते की तो नक्कीच बाहेर येईल आणि त्याच्या देव परमेश्वराची प्रार्थना करण्यासाठी तिथे उभा राहील आणि त्या जागेवर हात फिरवेल आणि अशा प्रकारे कुष्ठरोग बरा करेल. दमास्कसच्या नद्या, अबाना आणि परपर इस्राएलच्या सर्व पाण्यांपेक्षा चांगल्या नाहीत का? मी त्यात आंघोळ करून शुद्ध होऊ शकत नाही का?

आपण सर्वजण आपल्या जीवनात देवाच्या कार्यावर काही प्रमाणात प्रश्न विचारतो. तुम्हाला असे का करावे लागले?, मला हे का करावे लागले?, चांगल्या लोकांसोबत वाईट गोष्टी का घडतात?, नामानसारखे आपल्या सर्वांच्या विश्वासाच्या प्रवासात शंका आणि प्रश्न असतात. परंतु आपण त्यांना देवाच्या अमर्याद प्रेमापासून आपल्याला रोखू शकत नाही.

आपल्या जीवनात आपल्याला नामानसारखा एक नीच सेवक हवा आहे. या नीच सेवकाच्या हस्तक्षेप आणि प्रोत्साहनामुळे, नामानने अलीशाला सांगितल्याप्रमाणे केले आणि तो बरा झाला. आपल्या सर्वांना आपल्या जीवनात एक नीच सेवक हवा आहे जो आपल्याला आठवण करून देतो की आपल्याला माहित आहे की देवावर प्रेम करणाऱ्यांसाठी सर्व गोष्टी चांगल्यासाठी काम करतात, ज्यांना त्याच्या उद्देशानुसार बोलावले आहे. (रोमकर ८:२८). मित्र असो किंवा कुटुंबातील सदस्य असो, आपल्या सर्वांना आपल्या जीवनात त्या नीच सेवकाची गरज आहे आणि आपण सर्वांना दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनातही नीच सेवक असण्याची गरज आहे.

पवित्र आत्मा ये, प्रभु येशू ये, आज तुझ्यावर अधिक अवलंबून राहण्यास आम्हाला मदत कर. तुझ्या मागे येण्यास आम्हाला मदत करण्यासाठी आमच्या जीवनात एका नीच सेवकाला आण. आम्हाला इतरांसाठी नीच सेवक बनण्याची आणि आज आणि आमच्या आयुष्यातील प्रत्येक दिवशी तुझे अनुसरण करण्याची कृपा दे.

प्रथम, तुमच्या जीवनात सर्वात पवित्र काय आहे याचा विचार करा. अनेकांसाठी, कुटुंब हे ते ठिकाण आहे. तुमच्या कुटुंबात, देव एका विशेष पद्धतीने राहण्याची इच्छा करतो, तुमच्या कुटुंबाला असे स्थान बनवतो जिथे देवाचा सन्मान केला जातो आणि त्याची इच्छा पूर्ण होते.. अभिमान हे एक पाप आहे जे विशेषतः कौटुंबिक जीवनाचे नुकसान करते आणि म्हणूनच, या मोहाचा नकार नम्रतेद्वारे होईल.

देवाने तुम्हाला त्याच्या चर्चच्या प्रेषितीय कार्यात सहभागी होण्यासाठी कोणत्या मार्गांनी बोलावले आहे याचा देखील विचार करा. आपण चर्चच्या ध्येयाला ज्या पद्धतीने पुढे नेतो त्या पद्धती सैतानला आवडत नाहीत, म्हणून तो विशेषतः चर्चच्या सदस्यांना अभिमानाने मोहात पाडून, आत्म्यांच्या तारणाच्या एकमेव उद्देशाऐवजी स्वार्थी कारणांसाठी आणि अहंकाराने चर्चच्या ध्येयाची सेवा करून त्या ध्येयात अडथळा आणण्याचा प्रयत्न करेल.

शेवटी, तुमच्या प्रार्थनेच्या अंतर्गत जीवनाचा विचार करा. तुमचा आत्मा देवाचे मंदिर आहे. तुमच्या आत्म्यात, तुम्ही देवाच्या उपस्थितीला भेटता आणि त्याच्याशी एकरूप होता. म्हणून, सैतान तुमच्या प्रार्थना जीवनात गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न करेल. तुमच्या जीवनाचा एक भाग असलेल्या या तीन सर्वात पवित्र स्थानांवर विचार करा. तुमचे कुटुंब, चर्चमधील तुमचा सहभाग आणि प्रार्थनेच्या तुमच्या अंतर्गत जीवनावर विचार करा. तुम्ही असे करत असताना, त्या दुष्टाने तुम्हाला अभिमानाने कसे मोहात पाडले आहे हे ओळखण्याचा प्रयत्न करा. आपल्या प्रभूने त्या दुष्टाला मंदिरात घेऊन जाण्याची, पवित्र शहराकडे पाहण्याची, तुमच्या जीवनातील प्रत्येक पवित्र ठिकाणी येण्याचा मार्ग म्हणून, प्रत्येक प्रलोभनावर मात करण्यासाठी तुम्हाला शक्ती देण्यासाठी परवानगी दिली. त्या पवित्र ठिकाणी नम्रता शोधा जेणेकरून तुमचे डोळे आपल्या प्रभूवर आणि इतरांच्या प्रेमावर केंद्रित होतील, स्वतः वर किंवा कोणत्याही प्रकारच्या व्यर्थतेवर नाही. असे केल्याने तुम्ही आपल्या प्रभूप्रमाणेच या दुसऱ्या प्रलोभनावर मात करू शकाल.



**– रेव्ह. फा. प्रकाश भालेराव**
(प्रमुख धर्मगुरु लोयोला सदन चर्च, श्रीरामपूर),
९४२३०२९४०६

# चिन्मय भक्ती साधना पुस्तकाचे प्रकाशन

**अहिल्यानगर** – अहिल्यानगर येथील चिन्मय मिशन च्या वतीने नगरकरांसाठी भागवत कथा ज्ञानयज्ञ आयोजित करण्यात आले असून सावेडी येथील माऊली सभागृहात दीप प्रज्वलनाने भागवत कथेस प्रारंभ करण्यात आला. यावेळी दीप प्रज्वलनास जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज मंडळाचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे, मनपा चे माजी नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, सुनील त्र्यंबके, मिशनचे अध्यक्ष ॲड. डी.डी. घोरपडे, सचिव डी.डी. मोरे, खजिनदार उत्तमराव साळुंखे, शिवाजीराव ढोले, आर.एस.निमसे, विजय दळवी, मंगला अष्टेकर, सुशीला वाघ, मनीषा पाठक, पद्मावती ढोले, मंदाकिनी मोरे, शकुंतला साळुंखे, आदी उपस्थित होते.भागवत कथाकार स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांनी प्रास्ताविकात कथेचे महत्व विशद केले ते म्हणाले भागवत कथा श्रवणाने मानवाचे खूप मोठे कल्याण होते, जीवनातील अंध:कार दूर होतो, पापांमधून मुक्ती तर मिळते पण मोक्ष सुद्धा मिळतो.

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 23/12/2024 to 28/12/2024 | 578 02 589 | 699 40 235 | 199 92 345 | 116 85 780 | 569 00 136 | 800 88 260 |
| 30/12/2024 to 04/01/2025 | 580 39 144 | 379 94 257 | 229 33 599 | 447 58 125 | 344 11 478 | 178 63 337 |
| 06/01/2025 to 11/01/2025 | 388 91 108 | 178 69 135 | 358 60 127 | 449 71 128 | 350 85 267 | 390 20 370 |
| 13/01/2025 to 18/01/2025 | 180 95 357 | 138 28 279 | 236 11 588 | 679 29 270 | 390 28 350 | 470 18 189 |
| 17/02/2025 to 22/02/2025 | 255 21 137 | 470 19 900 | 247 33 788 | 399 17 179 | 269 76 556 | 224 84 455 |
| 24/02/2025 to 01/03/2025 | 447 57 269 | 367 65 267 | 136 06 457 | 180 97 179 | 270 93 337 | 690 53 120 |
| 02/03/2025 to 08/03/2025 | 778 21 588 | 460 01 669 | 558 80 677 | 300 39 289 | 129 20 460 | 370 01 128 |
| 10/03/2025 to 15/03/2025 | 789 49 568 | 125 89 469 | 369 83 157 | 156 29 180 | *** ** *** | 130 44 789 |
| 16/03/2025 to 22/03/2025 | 588 82 778 | 244 01 290 | 579 14 347 | 120 33 788 | 160 70 677 | 588 13 670 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द • ख • ल

## जन्म, मृत्यू प्रमाणपत्र विभागातील कर्मचाऱ्यांचा बेफिकीरपणा खा. लंकेंचे पत्र

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या जन्म व मृत्यू प्रमाणपत्र कार्यालयातील नागरिकांना प्रचंड त्रास हा अत्यंत गंभीर आणि असहाय्य झाला असून, या कार्यालयातील दिरंगाई, बेफिकीरपणा आणि कर्मचाऱ्यांच्या उध्दट वर्तनात त्वरीत सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात यावेतअशा मागणीचे पत्र खा. नीलेश लंके यांनी महापालिकेच्या आयुक्तांना दिले आहे. या पत्रामध्ये खा. लंके यांनी नमूद केले आहे की, नगर शहरात मोठया प्रमाणावर जन्म, मृत्यूची नोंद असल्याने शहरासोबतच ग्रामीण भाग आणि इतर तालुक्यांतूनही हजारो नागरिक प्रमाणपत्रासाठी या कार्यालयात येत असतात. मात्र, त्यांना वेळेवर सेवा मिळत नाही. कर्मचाऱ्यांकडून उध्दट वर्तन केले जाते. नागरिकांना अनेकदा फेऱ्या माराव्या लागतात. या कार्यालयातील ही परिस्थिती अतिशय गंभीर असून, प्रशासनाने तातडीने सुधारणा करणे आवश्यक असल्याचे खा. लंके यांनी या पत्रात नमूद आहे.

**प्रमाणपत्र तातडीने द्यावे**

जन्म व मृत्यू प्रमाणपत्र तातडीने देण्यात यावे. अर्जदारांना ठराविक कालमर्यादेत प्रमाणपत्र मिळेल याची हमी घेण्यात यावी. अनावश्यक दिरंगाई केल्यास सबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. कर्मचाऱ्यांचे वर्तन सुधारावे. कर्मचारी जनतेशी नम्रपणे आणि सहानुभूतीने वागतील, याची जबाबदारी आयुक्तांची आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याने उध्दट वर्तन केल्यास त्याच्यावर निलंबनासह कठोर करण्यात यावी, असे खा. लंके यांनी या पत्रात म्हटले आहे.

**आरोग्य अधिकारी जबाबदारी टाळतात**

आरोग्य अधिकाऱ्यांशी संपर्क करण्यात आला असता ते जबाबदारी घेण्याऐवजी टाळताना दिसून येतात. माहिती सुविधा केंद्र दुपारी चार वाजता बंद करतात. त्याची वेळ चारऐवजी सायंकाळी पाच अशी करण्यात यावी. जेणेकरून नागरिकांना मागे जावे लागणार नाही, अशी खा. लंके यांनी केली आहे.

## पाणी न मिळाल्याने शेतकऱ्यांचा संताप ; चौकशी करून अधिकाऱ्यांवर कारवाई करा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी =** गेले साडेतीन महिने वांबोरी चारीच्या पाण्याची प्रतीक्षा केली पाणी २४ तास सुद्धा आले नाही. त्यामुळे आमचे हक्काचे पाणी का आले नाही असा संतप्त सवाल करत संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांचेवर कारवाई करावी अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत सविस्तर असे की राहुरी नगर पाथर्डी तालुक्यात येथील दुष्काळग्रस्त भागासाठी मुळा धरणातून वांबोरी



चारीसाठी शंभर दिवसाचे आवर्तन जाते. हे आवर्तन सोडताना ६८० एमसीएफटी पाणी १०० दिवसात उचलले जाते.त्याद्वरे १०२ पाझर तलाव व नालाबंध भरले जातात. हे पाणी उचलताना या योजनेचा फुटबॉल उघडा पडल्यानंतर हे पाणी उचलता येत नाही. त्यामुळे लवकरात लवकर हे पाणी उचलावे लागते. यावर्षी हे पाणी लवकरच डिसेंबरमध्येच सोडण्यात आले होते. मात्र असे होऊनही पाथर्डी बहुतांश तलावात पाणी आलेच नाही. सुमारे साडेतीन महिने शेतकऱ्यांनी याबाबत मोठी प्रतिक्षा केली व पाणी सोडण्याची मागणीही केली होती मात्र पाणी आले नाही. पाटबंधारे विभागाला पाणी कधी येणार असे विचारल्यानंतर पाणी मिरी लाईनला चालू आहे , पाणी सातवड लाईनला चालू आहे असे चुकीचे उत्तरे येत होती. मात्र प्रत्यक्षात पाणी येत नव्हते त्यामुळे हे पाणी नेमके गेले कुठे ? तसेच पाणी का आले नाही याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी चौकशी करावी व हलगर्जी करणारा विरोधात कारवाई करावी अशी मागणी भोसे गावचे माजी सरपंच विलास टेमकर, भरत शिंदे, अँड. शिवाजी टेमकर. विजय शिंदे. अशोक टेमकर, उत्तमराव टेमकर या शेतकऱ्यांनी केली आहे.

**तिसरी कायम नादुरुस्त**

वांबोरी चारीचे पाणी शेवटच्या टोकाला पोहोचण्यासाठी तिसऱ्या विद्युत पंपाची गरज असते तरच दाबाने पाणी पुढे सरकते. तरच शेवटचे टोक घाटशिरस, सातवड ,करंजी, भोसे मध्ये पाणी पडते मात्र वर्षभरापासून तिसरी मोटर दुरुस्त करण्यात येत आहे. त्यानंतर लगेच पाणी येईल असे अधिकारी कायम सांगायचे मात्र तिसरी मोटर दुरुस्तीच्या आवर्तनाची शंभर दिवस पूर्ण झाले तरीही पाणी आणलेच नाही त्यामुळे तिसऱ्या विद्युत पंप दुरुस्तीच्या नावाखाली या पाथर्डीच्या भागातील शेतकऱ्यांना नागवले जात असल्याची टीका भरत शिंदे या शेतकऱ्यांनी यावेळी केली.

**विकतचे पाणी घेण्याची वेळ**

अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे काही गावांनी टँकरचे प्रस्तावही पाठवले आहेत शेतीला हक्काचे पाणी मिळाले नाही. वांबोरी चारीचे पाणी आले असते तर पिण्याच्या पाण्यासह शेतीचा पाण्याचा प्रश्न सुटला असता आता मात्र फळबागांना विकतचे पाणी देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

**अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा** वांबोरी चारीचे पाणी पाथर्डी तालुक्यातील कोणत्याच तलावात आले नाही.आता पाणी पाणी करण्याची वेळ आली आहे पाणी का आले नाही याची चौकशी होऊन संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# जामखेडला लोकअदालतीत ८१६० प्रकरणे निकाली :न्या. जोशी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** - राष्ट्रीय लोकअदालतच्या माध्यमातून जामखेड न्यायालयातील ८१६० पेक्षा जास्त प्रकरणे निकाली, पंचायत समितीची विक्रमी ३४ लाख ९६ हजार पेक्षा जास्त रुपयांची कर वसुली- झाली असल्याची न्यायाधीश वैभव जोशी यांनी दिली. दि. २२ मार्च रोजी झालेल्या राष्ट्रीय लोक अदालतीचा लाभ घेऊन जास्तीत जास्त आपसी समझौत्याने मिटणारी प्रकरणे निकाली काढण्यात आली व त्यात जामखेड न्यायालयाचा तालुक्यामधून प्रथम क्रमांक पटकवला, अशी माहिती जामखेड न्यायालयाचे दिवाणी व प्रथम वर्ग न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समिती जामखेड चे अध्यक्ष जोशी यांनी दिली आहे. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये व मार्गदर्शनाखाली केवळ वंचित व दुर्बल घटकांनाच नव्हे तर प्रत्येक नागरिकाला समान व जलद न्याय मिळावा यासाठी विधि सेवा प्राधिकरणाने राष्ट्र, राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावर विविध संस्था निर्माण केल्या आहेत. या संस्था आपआपल्या स्तरावर लोक अदालतीचे आयोजन करतात. तालुका विधी सेवा अंतर्गत राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन जामखेड न्यायालयात करण्यात आले होते. लोक अदालत म्हणजे कायद्याद्वरे निर्माण केलेला वाद समेटाचा किंवा तडजोडीचा अचूक मंच आहे. दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने, चर्चेने कोणत्याही वाद-विवादाशिवाय पैसा व अमूल्य वेळ खर्च न करता प्रलंबित प्रकरणांमध्ये समेट किंवा तडजोड घडवून आणणे म्हणजे लोक अदालत. ते स्थापित



करण्यात आल्यामुळे या अदालतीद्वरे दिला जाणारा निवाडा अंतिम असतो आणि दिवाणी प्रकरणातील आदेशाप्रमाणे (डिक्री) याची अंमलबजावणी केली जाते. लोकअदालतीमधील न्यायनिर्णयाद्वरे दोन्ही पक्षांचा विजय होतो.

**लोक अदालत ही न्यायालयीन लढाई विनाखर्च व वेळेची बचत करुन संपविण्याचा सहज व सोपा मार्ग आहे. पक्षकारांनी एकदा तरी याचा अनुभव घ्यावा. नाहीच होऊ शकली तर न्यायालये कायद्याप्रमाणे योग्य तो निर्णय देतीलच, पण एकदा लोक अदालतचतीच्या माध्यमातून तडजोडीसाठी प्रयत्न करावे. त्याचप्रमाणे विधिज्ञांनी देखील त्यांच्या पक्षकारांना लोकन्यायालयाबाबत जागरूक व प्रोत्साहित करावे.**

**वैभव जोशी, दिवाणी व प्रथम वर्ग न्यायाधीश, तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती, जामखेड .**

**पंचायत समिती जामखेड व तालुक्यातील इतर मदतीने मागील काही लोक अदालतीमध्ये मोठ्या प्रमाणात दाखलपूर्व प्रकरणांचा निपटारा करण्यात आला होता. दि. २२ मार्च रोजी झालेल्या राष्ट्रीय लोक अदलातीमध्ये देखील अंदाजे ८५०० पेक्षा जास्त दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली असून यापैकी ८१६० प्रकरणे केवळ ग्रामपंचायतमधील कर वसुली संदर्भात आहेत. या माध्यमातून ३४ लाख पेक्षा जास्त कर वसुली झाली**

**शुभम जाधव गटविकास अधिकारी, जामखेड**

## आमदार हेमंत ओगले मित्र मंडळाची श्रीगोंद्यात इफ्तार पार्टी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा ;-** श्रीरामपूर येथील आमदार हेमंत ओगले याचे श्रीगोंद्यातील मित्र मंडळ आणि श्रीगोंदा तालुका युवक कॉग्रेसच्या संयुक्त विद्यमाने श्रीगोंद्यात मोहबत वाली इफ्तार पार्टीचे आयोजन होते यावेळी अनेक मुस्लिम बांधवानी यामध्ये सहभाग नोंदविला होता.रमजान पवित्र महिन्यात मुस्लिम बांधव उपवास करतात. उपवास सोडण्यासाठी रोजा इफ्तारचे आयोजन केले जाते. या महिन्यातील दिवस रात्रभर जागून प्रार्थना केली जाते. याच पार्श्वभूमीवर श्रीरामपूरचे आमदार हेमंत ओगले यांचे श्रीगोंद्यातील मित्र मंडळ व तालुका युवक कॉग्रेसच्या वतीने आज श्रीगोंदा श्री शेख महंमद महाराज पटांगणामध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. इफ्तार पार्टीचे आयोजन शहरात प्रथमच करण्यात आल्याने, अनेक मुस्लिम बांधवांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन अभिनंदन करत हार्दिक शुभेच्छा दिल्या. मंगल प्रसंगी प्रसिद्ध व्याख्याते डॉ. रफिक सय्यद यांनी मार्गदर्शनपर व्याख्यान देऊन उपस्थितांना प्रेरित केले.या कार्यक्रमाला युवक काँग्रेसचे प्रदेशउपाध्यक्ष प्रशांत ओगले, श्रीगोंदा शहर प्रमुख संतोष खेतमाळीस, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रशांत दरेकर, मौलाना आतार, झहीर भाई जकाते, कांतीलाल कोकाटे, डॉ. जमादार, फिरोज भाई मालजपते, फिरोज जकाते, अमीन भाई शेख, राजू भाई शेख, इलाही मालजपते, रिजवान भाई जमादार, मुदस्सर मालजपते, मुजफ्फर मालजपते, सोहेल शेख , जावेद सय्यद , वसीम ताडे तसेच हिंदू-मुस्लिम समाजातील मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी बंधुभाव, सामाजिक एकता आणि सद्भावनेचा संदेश देण्यात आला. विविध धर्म आणि समाजातील लोकांनी एकत्र येऊन साजरा केलेला हा सोहळा प्रेरणादायी ठरला.सचिन गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## दहिगावने येथे नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत आजी-आजोबांची परीक्षा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** शिक्षणाच्या वयाला मर्यादा नसते, हे सिद्ध करत गावातील २० आजी-आजोबांनी नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत आयोजित परीक्षेत सहभाग घेतला. दहिगाव ने येथील परिषद शाळेत हा आगळावेगळा उपक्रम पार पडला. या उपक्रमात विद्यार्थ्यांऐवजी हातात लेखणी घेऊन बसलेले आजी-आजोबा पाहून साऱ्यांनाच कौतुक वाटले. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या या ज्येष्ठ नागरिकांनी साक्षरतेचा धागा पुन्हा पकडला आणि आत्मविश्वासाने परीक्षा दिली. या उपक्रमामुळे त्यांना लिहिण्या-वाचण्याची सवय लागेल आणि दैनंदिन व्यवहार अधिक सुलभ होतील, असे शाळेचे मुख्याध्यापक राजेश यांनी सांगितले. शाळेच्या मुख्याध्यक आणि सात शिक्षकांनी या आजी-आजोबांना योग्य मार्गदर्शन केले. ''शिकण्याची इच्छा असेल तर वय आड येत नाही,''



असे एका आजीबाईंनी सांगितले. तर, ''आयुष्याच्या या टप्प्यावरही शिकण्याची संधी मिळतेय, हे आमच्यासाठी आनंददायक आहे,'' असे एका आजोबांनी सांगितले. गावातील ग्रामस्थ, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनीही या उपक्रमाचे स्वागत केले. भविष्यातही उपक्रम राबवून शिक्षणाचा प्रकाश सर्वांपर्यंत पोहोचवावा, अशी ग्रामस्थांची अपेक्षा आहे.

## उमेदच्या सामाजिक कार्याने उपेक्षितांना जगण्याची नवीन उमेद मिळाली -शिवाजी कपाळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** - उमेदच्या सामाजिक कार्याने उपेक्षितांना जीवन जगण्याची नवीन उमेद मिळाली आहे. दुर्बल आधार देण्याचे संस्थेचे कार्य कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. दिलीप पवार म्हणाले की, सामाजिक जाणीव ठेऊन उमेद फाऊंडेशनचे कार्य सुरु आहे. वंचितांचे आश्रू पुसण्याबरोबर त्यांच्या वेदना दूर करण्यासाठी सुरु असलेले कार्य दिशादर्शक असल्याचे मत साई आदर्श मल्टीस्टेटचे शिवाजी कपाळे यांनी व्यक्त केले. उमेद सोशल फाऊंडेशनच्या वतीने नवनागापूर येथे मोफत शिबिर, स्त्री रोग तपासणी आणि रक्तदान शिबिर घेण्यात आले. तसेच व्यसनमुक्ती व महिला सक्षमीकरणावर मार्गदर्शन करण्यात आले. संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त जिल्हा क्रीडा कार्यालय व नेहरू युवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना कार्य गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात सिनेअभिनेते राजेश मन्चरे यांनी महिलांसाठी होम मिनिस्टरचा कार्यक्रम घेतला. विविध स्पर्धेने होम मिनिस्टरच्या कार्यक्रमात महिलांचा उत्साह संचारला होता. . आरोही संगीत विद्यालयाचे स्वप्नील खराडे व प्रा.आदेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. या कार्यक्रमासाठी



प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर जिल्हा कामगार संघटनेचे संतोष लांडे, माजी उपसभापती डॉ. दिलीप व्हेरासिटी फाऊंडेशनच्या अध्यक्षा ज्योती सोनिग्रा, फाऊंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे, उपाध्यक्ष कुणाल तनपुरे, महिला व बाल अपराध प्रतिबंधक शाखेच्या महिला पोलीस दीपा आठवले, उद्योजक किरण दाभाडे, सिंडिकेट बँक अधिकारी महादेव ढोबळे, स्वाभिमानी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष नाथाभाऊ आल्हाट उपस्थित होते. या कार्यक्रमात उमेद सोशल फाऊंडेशनच्या राहुरी फॅक्टरी शाखेची कार्यकारिणी जाहीर करण्यात शाखा प्रमुख कुणाल तनपुरे, कार्यकरी अधिकारी राजेश मंचरे, प्रमुख सल्लागार रणजित लहारे, जनसंपर्क अधिकारी बाळासाहेब सगळगिळे, संघटक श्रीकांत राऊत यांना नियुक्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य सागर सप्रे, आप्पासाहेब सप्रे, आर्ट ऑफ लिविंगच्या भारती कोळसे, युगन्धर फाऊंडेशनच्या विद्या करपे, दिव्यांकुर फाऊंडेशनचे (पुणे) अध्यक्ष लक्ष्मण म्हस्के, कोच कविता खर्डे, रिपाईच्या महिला शहर जिल्हाध्यक्षा ज्योती पवार, आपचे जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ, रिपाईचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, जिल्हा रुग्णालय नेत्र विभागचे सतीश आहिरे, शब्दगंधचे सुनील गोसावी, राम शिंदे, प्रिया डोळस, मनीषा कदम, शीतल खराडे, श्रुती चव्हाण, अर्जुन वायभासे, राधा साळवी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन उमेद फाऊंडेशनचे सचिव साळवी, सल्लागार अँड. दीपक धिवर, सदस्य विजय लोंढे, रवी सुरेकर, रवी साखरे, योगेश घोलप, प्रकाश भालेराव, अक्षय गाडेकर, शुभांगी सोनवणे, मनीषा साळवे, वैशाली तनपुरे, रेशमा तनपुरे, डॉ. सतीश गिऱ्हे, अश्विनी वाघ यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी नवनागापूरचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी आमसिध्द सोलनकर, क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरांगे, नेहरू युवा केंद्राचे जिल्हा समन्वय अधिकारी संकल्प शुक्ला, रमेश गाडगे, जय असोसिएशनचे अध्यक्ष अँड. महेश शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

## ज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार देशासाठी दिशा दर्शक : आ.संग्राम जगताप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सारसनगर या उपनगराला सावित्रीबाई फुले नगर नामकरण करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले नगर भव्य दिव्य आणि सुंदर कमानीचे काम पूर्णत्वास आल्याने या उपनगराला एक चांगले देखणे स्वरूप प्राप्त झाले आहे. सकल माळी सामाजाचे कार्य कौतुकास्पद आहे. भूमीत होऊन गेलेले थोर राष्ट्रपुरुष यांनी समाजाला दिशादर्शक असे कार्य केले आहे. आज सावित्रीबाई फुले नगर हे नामकरण झाल्याने पुढच्या पिढी पर्यंत त्यांच्या सामाजिक कार्याचा वारसा पुढे जाणार आहे. क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार देशासाठी दिशा दर्शक आहेत. असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले आहे.

सावित्रीबाई फुले कमानीचे काम जगताप परिवाराने स्वखर्चाने पूर्ण केल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांचा सकल माळी सामाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सकल



माळी सामाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, प्रा. माणिकराव विधाते, मा. उप महापौर अनिल बोरूडे, सचिव राजेंद्र पडोळे, विश्वस्त डॉ. रणजीत सत्रे, विनोद पुंड, अर्जुन बोरूडे, ज्ञानेश्वर रासकर, आंबेकर, प्रकाश इवळे, अ‍ॅड. राहूल रासकर, कोअर कमिटी सदस्य अनिल इवळे, अमोल भांबरकर, नारायण इवळे, अशोक कानडे, पंडीतराव खरपुडे, चंद्रकांत पुंड, अमित खामकर, दिपक खेडकर, डॉ. सुदर्शन गोरे, जालिंदर बोरूडे, अशोक आगरकर, बाळासाहेब गायकवाड, संजय कानडे, सुधाकर कानडे, रामदास कानडे, अभिषेक चिपाडे, मच्छिंद्र बनकर, भानुदास बनकर, भाऊसाहेब कोल्हे, संजय गणेश कोल्हे, आनंद पुंड, राजेंद्र एकाडे, संतोष हजारे, वसंत आगरकर, गजानन ससाणे, रमेश चिपाडे, प्रकाश शिंदे, सुदाम बोरूडे, अशोक हिंगे, सुभाष गोंधळे, निळकंठ विधाते, प्रा. दरेकर तात्या, संभाजी चौधरी , लवेश गोंधळे, संतोष गोंधळे, अरूण गाडळकर, गणेश औसरकर, सागर इवळे, अरूण जाधव, सोमनाथ गाडळकर, संजय ताजणे, बाळासाहेब सांगळे, ब्रिजेश चंदू गोरे, शरद दातरंगे, निखिल ताठे, यशवंत गारडे, देविदास खामकर, पत्रकार राजु खरपुडे, प्रसाद शिंदे, गिरीश रासकर, किरण बोरूडे, रामदास फुले, रेणुका पुंड, रेखा विधाते, कल्याणी गाडळकर, अश्विनी दळवी, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष भुषण भुजबळ, उपाध्यक्ष मनोज भुजबळ, सचिव गणेश धाडगे, कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने, रोहिदास हराळे, संदिप दळवी, तालुका अध्यक्ष हजारे अदिसह सकल माळी समाजाचे पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते.

प्रास्ताविकात किशोर डागवाले यांनी केले. प्रा. माणिक विधाते म्हणाले आ. संग्राम जगताप यांच्या संकल्पनेतून माळीवाडा वेस येथे महात्मा ज्योतिबा फुले व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा चे काम लवकरच सुरु होणार आहे. कार्यक्रमाचे प्रसंगी भुजबळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले व म्हणाले आ. संग्राम जगताप यांचा सत्कार प्राथमिक स्वरूपात आज करण्यात आला आहे. सावित्रीबाई फुले नगर कमानीच्या उद्घाटन प्रसंगी सकल माळी सामाजाच्या वतीने मा. आमदार अरुण काका जगताप, आ. संग्राम जगताप व जगताप परिवार यांचा सत्कार समाज बाधवांच्या वतीने करण्यात येणार आहे. या प्रसंगी माळी सामाजाचे पदधिकारी व समाज बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते या कार्यक्रमाच्या वेळी सूत्र संचालन प्रकाश इवळे यांनी केले तर आभार अ‍ॅड. राहूल रासकर यांनी मानले.

## सुवर्णरत्न महिला ग्रामीण पतसंस्थेच्या चेअरमनपदी सुवर्णाताई पाचपुते

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव ;** येथील सुवर्णरत्न महिला ग्रामीण पतसंस्थेच्या चेअरमन पदी सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णाताई पाचपुते यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी भोसले यांच्या उपस्थित बैठक आयोजित करण्यात आली होती, सर्व संचालकांच्या वतीने एकमताने सुवर्णाताई पाचपुते यांची चेअरमन पदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमन अनिता चव्हाण, सहाय्यक निबंधक कार्यालयाचे प्रतिनिधी सतीश औरंगे,संस्थेच्या सचिव वर्षा मोटे, संचालिका प्रतिभा उंडे, योगिता मोरे, प्रीती पाचपुते, पुष्पा गिरमे, उर्मिला जठार, गीता खामकर, कल्याणी रंधवे उपस्थित होत्या. एकूण एक कोटी ५० लाख रुपयांच्या ठेवी असल्याची माहिती संस्थेच्या नवनिर्वाचित चेअरमन सुवर्णाताई पाचपुते यांनी यावेळी बोलताना दिली त्यापुढे म्हणाल्या की ग्रामीण भागातील महिलांना महायुती सरकारच्या महिला धोरणाच्या अनुषंगाने स्वतःच्या



पायावर उभे राहण्यासाठी सुवर्ण रत्न महिला पतसंस्थेच्या माध्यमातून छोट्या छोट्या उद्योगांना व व्यवसायांना तसेच भाजी विक्री करणाऱ्या महिलांना उद्योगात अन्य व्यवसायात ज्यांना सहभाग घ्यावयाचा आहे त्यांना पतसंस्थेच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्यासाठी तात्काळ कर्ज पुरवठा करण्यात येणार आहे. संस्थेचा नाव लौकिक चांगला असून सर्व संचालक मंडळाला बरोबर घेत ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून उद्योग व व्यवसायांना छोट्या स्वरूपात कर्ज स्वरूपात आर्थिक मदत करण्यात येणार आहे. संस्थेच्या ६५७महिला सभासद आहेत संस्थेने आत्तापर्यंत ९० लाख रुपये कर्ज वितरण केलेले आहे. यापुढेही संस्था आणखी जोमाने आर्थिक क्षेत्रात कार्य करणार असून प्रत्येक महिलेला स्वतःच्या पायावर उद्योगधंद्याच्या माध्यमातून उभा करण्यासाठी आर्थिक कर्जपुरवठा करण्याचा संस्थेचा मानस असून लवकरच संस्था दहा कोटी रुपयांच्या ठेवीचे उद्दिष्ट गाठणार असल्याचे सुवर्णाताई पाचपुते यांनी यावेळी बोलताना

# संपत्तीचा विनियोग योग्य कामासाठी करा : दयानंद महाराज कोरेगावकर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** -संपत्ती वाढवण्यापेक्षा संपत्तीचा विनियोग प्रत्येकाने योग्य कामासाठी केला पाहिजे; संपत्ती कितीही वाढवा परंतु सुख मात्र परमार्थातच आहे. असे परखड मत दयानंद महाराज कोरेगावकर यांनी आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले. वांगदरी तालुका श्रीगोंदा येथील ज्येष्ठ व्यक्तिमत्व एकनाथ साहेबराव नागवडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचे करण्यात आले होते. यावेळी आपल्या किर्तन रुपी सेवेत बोलताना दयानंद महाराज म्हणाले की; हा देह नाशिवंत आहे. याचा भरवसा नाही. कोणत्या क्षणी धोका देईल हे देखील सांगता येत नाही. जोपर्यंत जीव आहे. तोपर्यंत सत्कार्य करा; भगवंताचे नामस्मरण प्रसंगी परमार्थिक मार्गाकडे वळा. निश्चितच भगवंत प्राप्ती झाल्याशिवाय राहणार नाही. जो कलेने त्याचा फायदा होतो. ज्याला कलेने बोलता येत नाही तो मागे राहतो. त्यासाठी प्रत्येकाचे नॉलेज देखील असायला हवे. सत्ता संपत्ती ही नशिबाने बघता येईल. असे सांगून दयानंद महाराज आणखी पुढे म्हणाले की; जवळच्या माणसांवर कधीच अति विश्वास ठेवायचा नाही. तितकाच विश्वासाने घात देखील झाल्याशिवाय राहणार नाही. ही वस्तुस्थिती सध्या प्रत्येक अनुभवतो आहे. त्यासाठी प्रत्येकाने जीवन उत्तम तर्हेने जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दयानंद महाराज पुढे आणखी म्हणतात की; जीवनामध्ये कुणाच्या संगतीत आपण राहतो. त्याच्यावर आपली जीवनाची खरी विचारधारा ठरते. नव्हे; नव्हे तर संतांच्या संगती मध्ये एक परमार्थिक आनंद मिळतो. तो देखील प्रत्येकाने घेतला पाहिजे. अविचारी माणसाची संगत करू नये. चांगल्या संगत असावी. यावेळी समारोपप्रसंगी दयानंद महाराज यांनी मुलींना भरपूर शिकवा पौष्टिक आहार द्या आपली मुलगी शारीरिक दृष्ट्या कमजोर व तगड्या बनवा कुणाचीच वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत होणार नाही अशा पद्धतीने शरीरवृष्टी मुलींची बनवा. असे भावनिक उद्गगार देखील दयानंद महाराज यांनी व्यक्त केले. याप्रसंगी जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधाताई नागवडे; नागवडे उपाध्यक्ष बाबासाहेब भोस; प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष आबासाहेब जगताप, विजय नागवडे; काशिनाथ पारखे; नगरसेवक प्रशांत गोरे आदींनी यावेळी श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमास आ. विक्रम पाचपुते; माजी सरपंच विठ्ठलरव नागवडे; नागवडे कारखान्याचे संचालक सुभाषराव शिंदे; श्रीनिवास घाडगे; दादासाहेब नेटके; प्रशांत दरेकर; विठ्ठल जंगले; मारुती पाचपुते; विश्वनाथ गिरमकर प्रवीण सरपंच प्रमोद शिंदे; भाजपाचे तालुका अध्यक्ष संदीप नागवडे; ज्येष्ठ पत्रकार संजय काटे; नंदकुमार कुरुमकर; चेअरमन राजाभाऊ नागवडे; सरपंच संजय नागवडे; रामचंद्र नागवडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन बापूराव कांबळे यांनी केले.

# गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांचा लिलाव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव:** तालुक्यात गौण खनिजांचे अवैध उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तहसील कार्यालयाने कठोर कारवाई केली आहे. या कारवाईत पकडण्यात आलेली काही वाहने तहसील कार्यालयात आणली गेली होती.मात्र, या वाहनांच्या मालकांनी दंड भरून वाहने नेण्यास टाळाटाळ केल्याने, आता ही पाच वाहने जाहीर लिलावाद्वरे विकण्याचा घेण्यात आला आहे. हा लिलाव बुधवार, २६ मार्च २०२५ रोजी शेवगाव तहसील कार्यालयात होणार असल्याची माहिती तहसीलदार प्रशांत सांगडे आणि नायब तहसीलदार दीपक कारखिले यांनी दिली. ही कारवाई अवैध खनिज वाहतुकीला आळा घालण्याच्या उद्देशाने करण्यात आली असून, यातून प्रशासनाची कठोर भूमिका स्पष्ट होते. तहसीलदारांनी दिलेल्या माहितीनुसार, तालुक्यात विविध ठिकाणांहून परवानगी न घेता गौण खनिजांचे उत्खनन करून वाहनांद्वरे वाहतूक करताना अनेक वाहने पकडण्यात आली. तहसीलदारांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली आणि पकडलेली वाहने तहसील कार्यालयात आणून ठेवली. या वाहनांवर शासकीय नियमांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली. काही वाहन मालकांनी दंड भरून आपली वाहने सोडवून नेली, परंतु काहींनी दंड भरण्यास नकार अशा वाहनांचे मालक आता ही वाहने घेण्यास इच्छुक नसल्याचे दिसत असल्याने, प्रशासनाने लिलावाचा मार्ग अवलंबला आहे. हा जाहीर लिलाव नियमानुसार आणि पारदर्शक पद्धतीने होणार आहे. लिलावात सहभागी होणाऱ्या वाहनांची यादी आणि त्यांच्या किमान लिलाव रकमा जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये मसूद खलील काझी (शेवगाव) यांचा डम्पर (क्र. एमएच १२ ११४०) १ लाख ७० हजार रुपये, सिताराम आसाराम चव्हाण (पैठण) यांचा डम्पर (क्र. एमएच १२ ईएफ २२५५) १ लाख ८० हजार रुपये, दिपक मोहन कडू (नेवासा) यांचा डम्पर २ लाख रुपये, रजनीकांत कटारिया (मुंगी) यांची ट्रॉली १० हजार रुपये आणि अभिजित बबन कातकडे (ठाकूर निमगाव) यांचा ट्रॅक्टर (क्र. एमएच सीव्ही १३१८) ३ लाख ४० हजार रुपये अशा पाच वाहनांचा समावेश आहे. या वाहनांची एकूण किंमत ९ लाख रुपये इतकी आहे. ही वाहने विविध प्रकारची असून, त्यांचा लिलाव हा अवैध खनिज वाहतुकीविरुद्धच्या कारवाईचा एक भाग आहे. या लिलावात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी तहसील कार्यालयाने निमंत्रण दिले आहे. तहसीलदार प्रशांत आणि नायब तहसीलदार दीपक कारखिले यांनी नागरिकांना सविस्तर माहितीसाठी तहसील कार्यालयात संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. लिलाव प्रक्रिया पारदर्शक आणि नियमांनुसार पार पाडली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या कारवाईमुळे अवैध खनिज उत्खनन करणाऱ्यांवर जरब बसणार असून, भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे दिसते. लिलावातून मिळणारी रक्कम तिजोरीत जमा होणार असून, ही प्रक्रिया २६ मार्च रोजी सकाळी तहसील कार्यालयात होईल.

द•ख•ल

# अपहृत बालिकेची सुटका, तीन आरोपी अटकेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरुर :** १० वर्षाच्या अपहरण झालेल्या बालिकेची सुटका करत ३ आरोपीना ताब्यात घेतले आहे . यासंदर्भात पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार १३ मार्च २०२५ रोजी सकाळी आठ ते दुपारी १ च्या दरम्यान शिरुर शहरातील जोशीवाडी येथील राहत्या घरा समोरून १० वर्षीय अल्पवयीन बालिकेस अमिष दाखवत फूस लावून पळवून नेल्याची घटना घडली. याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गंभीरता व संवेदनशीलता लक्षात घेता पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना गुन्हयातील अपहरण झालेल्या बालिकेचा व अज्ञात आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस अंमलदार नितेश थोरात, विजय शिंदे, रविंद्र आव्हाड यांनी अपहरण झालेली बालिका व अज्ञात आरोपींचा शोध घेण्याकरीता शिरूर शहरामधील सुमारे १०० अधिक सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले. तपास करीत असताना गुन्हा घडलेल्या ठिकाणापासुन सी .सी .टी .व्ही फुटेज तपासून तांत्रिक विश्लेषन केले असता अपहरण झालेल्या बालिकेचे लताबाई बसीर काळे, आकाश बसीर काळे, सुप्रिया उर्फ रॅम्बो आकाश काळे, सर्व रा .सोने सांगवी, ता. शिरूर जि .पुणे हे यांनी या बालिकेचे अपहरण केल्याचे प्राथमिक निष्पन्न झाल्यावर लताबाई बसीर काळे, आकाश बसीर काळे, सुप्रिया उर्फ रॅम्बो आकाश काळे यांना ताब्यात घेण्यात आले . आरोपीनी बालिकेचे अपहरण करून तीला बेलापूर मुंबई येथे नातेवाईकांकडे ठेवले होते. नातेवाईकांकडे ठेवताना ही मुलगी आमची असुन आम्ही उपचारासाठी दवाखान्यामध्ये जात आहोत. आम्ही परत आल्यावर तीला घेवून जातो असे खोटे सांगितले अपहरण झालेल्या बालिकेस बेलापूर येथून पोलीस पथक शिरुरला घेवून आले व या बालिकेस नातेवाईकांकडे सूपूर्त केले.

# ॲपवरच्या ओळखीतून लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ

**पुणे :** ॲपवरुन झालेल्या ओळखीतून घटनांमध्ये वाढ झाली आहे. पिंपरीतील एका तरुणाला संगम पूल परिसरात बोलावून चौघांनी त्याला बेदम मारहाण केल्याची घटना घडली. त्याच्याकडील रोकड लुटून पसार झालेल्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका तरुणाने बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, शाहरुख टॉप नावाचा आरोपी, तसेच त्याच्याबरोबर असलेल्या तीन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण पिंपरी परिसरात राहायला आहे. आरोपींची त्याची एका 'गे ॲप'वरुन ओळख झाली होती. आरोपींनी १८ मार्च रोजी त्यांना मंगळवार पेठेतील आरटीओ चौकात भेटण्यासाठी बोलाविले. त्यानंतर रेल्वे रुळालगत असलेल्या मोकळ्या जागेत त्याला नेण्यात आले. आरोपींनी तरुणाला धमकावून पैशांची मागणी केली. आरोपींनी मारहाण करुन त्याच्याकडील पैसे काढून घेतले. त्यानंतर त्याच्याकडे आणखी पैशांची मागणी केली. तरुणाचा मोबाइल संचात तांत्रिक फेरफार (फॉरमॅट) करुन आरोपी पसार झाले. या घटनेनंतर घाबरलेल्या तरुणाने नुकतीच बंडगार्डन पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील लोहार तपास करत आहेत. समलैंगिकांमध्ये मैत्रीसंबंध निर्माण करण्यासाठी एका ॲपचा वापर केला जातो. या वापर करुन चोरट्यांनी गेल्या दोन महिन्यात पाच ते सहा जणांन लुटले आहे. धायरी भागात एका व्यावसायिकाला धमकावून चोरट्यांनी लुटले होते, तसेच मगरपट्टा सिट्टी भागात एका संगणक अभियंत्याला धमकावून लूटमार करण्यात आल्याची घटना घडली होती.

# ट्रॅक्टर उलटून शेतकऱ्याचा मृत्यू ; कुटुंबीयांना २० लाखांची नुकसान भरपाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** ट्रॅक्टर उलटून मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना २० लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश देण्यात आले. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगात शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या लोक अदालतीत तडजोडीत शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना दाखल केलेला दावा काढण्यात आला. याबाबत सावित्री सुनील पाटील यांनी गेल्या वर्षी १९ मे रोजी पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगात २० लाख ६५ हजारांची नुकसान भरपाई मिळवण्यासाठी दावा दाखल केला होता. १९ मे रोजी दुपारी शेतातील कांदा पावसापासून सुरक्षित राहावा म्हणून शेतकरी सुनील पाटील हे शेतातील कांदा हलविण्यासाठी ट्रॅक्टर घेऊन निघाले त्या वेळी ट्रॅक्टर खड्ड्यात उलटला. अपघातात सुनील पाटील यांना गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पाटील यांनी वाहनचा वैयक्तिक विमा उतरविला आला होता. पतीचा ट्रॅक्टर उलटून अपघाती मृत्यू झाल्यानंतर विमा कंपनीने नुकसान भरपाई मिळवण्यासाठी त्यांनी त्यांचे वकील ॲड. राहुल अलुरकर यांच्या मार्फत ग्राहक तक्रार निवारण आयोगात दावा दाखल होता. संबंधित दावा प्रलंबित होता. पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष अनिल जवळेकर, सदस्य शुभांगी दुनाखे, सरिता पाटील यांनी दावा सामंजस्याने निकाली काढण्यासाठी प्रयत्न केले. लोक अदालतीत हे प्रकरण ॲड. किरण घोणे, ॲड. अनिल सातपुते यांच्या पॅनेलसमोर तडजोडीसाठी ठेवण्यात आले. विमा कंपनीकडून ॲड. ऋषीकेश गानू, ॲड. आकाश फिरंगे बाजू मांडली. विमा कंपनीच्या अधिकारी भक्ती कुलकर्णी यांनी दावा तडजोडीत काढण्यासाठी प्रयत्न केले. तडजोडीत शेतकऱ्याच्या पत्नीला २० लाख रुपये देण्यात आले. कार्यालयीन कर्मचारी रघतवान, योगेश चवंडके, मनीषा पाटील, चित्रा आपटे, ऋता चाबुकस्वार, परीक्षित धुमाळे, गजानन चव्हाण यांनी सहाय केले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून विकासकामांची पाहणी

## सार्वजनिक विकासकामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार पद्धतीने करण्याचे निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**बारामती :** सेंट्रल पार्क परिसरात नागरिकांना बारामतीचा बदलता इतिहास, ऐतिहासिक प्रसंग आदी बाबी मोठ्या आकाराच्या पडद्यावर दाखविण्याच्यादृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे अजित पवार यांनी दिले पवार यांनी शहरातील तीन हत्ती चौक परिसर सुशोभिकरण, कुस्ती महासंघ शेजारील कामाची आखणी अंतिम करणे, कुस्ती महासंघ ते घारे साठवण तलाव दरम्यान कॅनाल परिसर, घारे साठवण तलाव सुशोभीकरण आणि पदपथाचे काम, सेंट्रल पार्क सुशोभीकरण आणि प्रशासकीय भवनच्या बाहेरील रंगकामाची पाहणी करुन संबंधित अधिकांऱ्याकडून माहिती घेतली. उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, गट विकास अधिकारी अनिल बागल, मुख्याधिकारी पंकज भुसे, बारामती सहकारी बँकेचे चेअरमन सचिन सातव, कार्याध्यक्ष विशाल जाधव आदी उपस्थित तालुक्यात विविध विकास कामे सुरु असून ही सार्वजनिक विकासकामे करताना ती गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे, अशा सूचना पाहणीप्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.सेंट्रल पार्क परिसरातील बैठक व्यवस्था, पायऱ्या, वाहनतळ, जलतरण तलावकरीता ज्येष्ठ नागरिक, लहान बालके यांचा विचार करुन फरश्या बसवाव्यात. कामे पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना वाटले पाहिजे. तीन हत्ती चौक परिसर सुशोभीकरणाची कामे करताना परिसरातील जागेचा पुरेपूर वापर करावा. दीपस्तंभाचे काम करण्यापूर्वी जागेचे सपाटीकरण करुन घ्यावे.

वाहतूक कोंडी होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. कुस्ती संघ ते घारे साठवण तलाव दरम्यान कॅनाल परिसरात पदपथाचे कामे करताना संरक्षक भिंतीतून पाणी गळती होणार नाही, याचा विचार करुन करावीत. नागरिकांकरीता शौचालय उभारण्यात यावे. ज्येष्ठांनाही या पदपथावर फिरताना त्रास होणार नाही, याचाही विचार करावा. परिसरात अधिकाधिक सावली देणाऱ्या विविध प्रजातीच्या वृक्षांची लागवड करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा २०२५-२६ चा अर्थसंकल्प मंजूर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा २०२५-२६ चा अर्थसंकल्प मांडण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहामध्ये दोन दिवस चाललेल्या सिनेट (अधिसभा) मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये कुलगुरूंच्या भाषणापूर्वी स्थगन प्रस्ताव घेण्यात आले. या स्थगन प्रस्तावामध्ये विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त देण्यात आलेल्या जीवनसाधना गौरव पुरस्कारासाठी निवडण्यात आलेल्या व्यक्तींच्या नावावरून वाद झाला. तसेच कार्यक्रम व्यवस्थित पार न पडल्यामुळे विद्यापीठाच्या प्रशासनावर टीका करण्यात आली. त्यात व्यवस्थापन परिषद सदस्यांवर झालेल्या टीकेमुळे सभागृहाचे वातावरण तापले. सर्व व्यवस्थापन सदस्यांवर सरसकट टीका करू असे मत काही सदस्यांनी व्यक्त केले. सभागृहात चर्चा सुरू असताना सभागृहात तापलेले वातावरण पाहून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी आधिसभेचे कामकाज काही कालावधीसाठी स्थगित करण्यात येत असल्याची घोषणा केली व भोजन झाल्यानंतर ४.०० वा.त्यानंतर प्रश्नोत्तराचा तास होऊन व्यवस्थापन परिषद सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांनी अर्थसंकल्प मांडला त्यानंतर त्यावर चर्चा त्यामध्ये सिनेट सदस्य अपूर्व हिरे यांनी चर्चा घडवून आणली स्थगनप्रस्ताव प्रश्न ठराव यावर चर्चा होऊन प्रसंगी घमासान चर्चा होऊन अर्थ संकल्प मंजूर करण्यात आला. या सभेमध्ये सिनेट सदस्य डॉ.सुनील लोखंडे यांनी प्राध्यापकांचे अनेक प्रश्न मांडले. त्यामध्ये प्राध्यापकांच्या प्रमोशनचा प्रश्न, वेगवेगळ्या गठीत केलेल्या समित्या तसेच विद्यापीठाकडून महाविद्यालयासाठी आर्थिक तरतूद याविषयी मांडून अर्थसंकल्पामध्ये कपात सूचना मांडल्या. तसेच या सभेमध्ये सर्वच सभासदांनी भाग घेऊन आपली मते मांडून आपल्या विद्यापीठाचा नावलौकिक कसा वाढवता येईल यासाठी प्रयत्न करीत आहोत असे सांगितले. तेंव्हा मा. कुलगुरू यांनी सुद्धा आपल्या सर्वांच्या सहकार्यानेच आपल्याला पुढे जायचे आहे व विद्यापीठाला पुढे न्यायचे आहे असे सांगितले, व शेवटी दोन चाललेली सभा संपन्न झाली.

# नशामुक्त समाज निर्मितीसाठी लोकसहभाग महत्वाचा : पो. नि. वाघमोडे


प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**रांजणगाव गणपती :** नशामुक्त समाज अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी महत्वाचा असून, नशामुक्त समाज निर्मितीसाठी लोकसहभाग अतिशय महत्वाचा असल्याचे प्रतिपादन रांजणगाव एमआयडीसीचे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी रांजणगाव एमआयडीसी, ता. शिरुर येथील पोलिस ठाण्याच्या वतीने नशामुक्ती अभियान आयोजित करण्यात आले होते. यावेळी पोलिस पाटील, शाळांचे मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, तंटामुक्ती समिती अध्यक्ष, विविध गावचे सरपंच यांसह विविध शाळांचे मुख्याद्यापक, शिक्षक यावेळी उपस्थित होते. पोलिस निरीक्षक वाघमोडे म्हणाले की, नशामुक्त अभियानात लोकसहभागासाठी प्रत्येक नागरिकाने सैनिक म्हणून बजवावी. अमंली पदार्थाचा शरीरावर मोठा परिणाम होतो, व्यसनाधिनता वाढते. अंमली पदार्थामुळे अर्थव्यवस्था व युवक पोखरले जात आहे. युवक व्यसनाचा आहारी गेल्यावर संबधिताचा रोजगार, व्यवसाय व कुटुंबावर परिणाम होत असतो. नशामुक्त समाज निर्माण करण्याचा संकल्प सर्वानी मिळून करावा असे ही ते म्हणाले. अपेक्षांचे ओझे व त्यातुन अपेक्षा भंग झाल्यास येणारे कुतूहल व संगत यातून व्यसनाकडे युवक जातात. अफू गांजा ,भांग , ब्राउन शुगर ,एम. डी. चरस , एल . एस . डी या सारखे अंमली पदार्थ आहेत . आपल्या परिसरात असे पदार्थ अथवा त्याचे सेवन करणारे आढळल्यास पोलीस स्टेशनकडे संपर्क करावा. एखाद्या टपरीवर विशिष्ट वेळी मोठी गर्दी होत असतील त्याची ही माहिती द्यावी. अंमली पदार्थ व्यसन करताना कोणी आढळले, शेतात कोणी गांजा लावलेल्या असेल तर त्याची ही माहिती पोलीसांना कळवावी असे आवाहन पोलिस निरीक्षक वाघमोडे यांनी केले. युवा पिढी व्यसनापासून आपण वाचविली पाहिजे. प्रत्येकाने नशामुक्त अभियानात सैनिक म्हणून काम करावे. व्यसनाच्या या विळख्यात आपला मित्र, कुटुंबातील सदस्य कोणीही शकतो. व्यसनाधिन लोकांना व्यसनापासून बाहेर काढून त्यांना जीवदान द्यावे. व्यसानाधिन व्यक्तीना आधार देत त्यांच्यावर उपचार करून त्यांना समाजाचा मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे .आपली मानव संसाधन चांगली राहण्यासाठी ती नशामुक्त असली पाहीजे. व्यसानाधिन व्यक्तीना आधार देत त्यांच्यावर उपचार करुन त्यांना समाजाचा मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे .शाळा महविद्यालय यांची अभियानातील सहभाग कसा असावा याबाबत ही पोलिस निरीक्षक वाघमोडे यांनी मार्गदर्शन केले.



# अरशान शाहनवाज पठाणचा पहीला रोजा पुर्ण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**गंगापूर :** शहरातील सहा वर्षीय अरशान पठाण याने जिवनातील पहिला रोजा पुर्ण केला असून अरशान शाहनवाज पठाण या चिमुकल्याने आपल्या जीवनातील पहिला रोजा उपवास पूर्ण केल्याबद्दल, वडील शाहनवाज अली खान पठान, अजोबा अली खान पठान, अजोबा हमीद खान पठान, मामा अफ्रीद चुलते अमजद अली खान पठान, महेमूद पठान, भाऊ हुजैफ, रेहान, सफवान, अल्फैज, आदीसह नातेवाईक मित्र परिवाराने कौतुक करून अभिनंदन केले आहे.

# शासकीय योजना मिळवून देण्याच्या नावाखाली जनतेची फसवणूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** विविध शासकीय योजना मिळवून देतो असे सांगून गरीब घटकातील सर्वसामान्य लोकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या महाभाग भामट्यावर ओतूर पोलिसात दाखल झाल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे. याबाबत सुशीला धोंडीभाऊ जाधव, (वय ५०), रा. कातकरी वस्ती, ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी ओतूर पोलिस स्टेशनला फिर्याद दिली असून जनतेची फसवणूक करणाऱ्या राजेश रघुनाथ मुकणे, रा. खालचा माळीवाडा, ता. जुन्नर, जि. पुणे असे या भामट्याचे नाव आहे त्याच्या विरुद्ध फसवणूकीचा दाखल झाला आहे. सदर गुन्ह्यातील फिर्यादी या कातकरी आदिवासी समाजातील गरीब महिला असून त्यांना मुकणे याने शासकीय कार्यालयाकडून शासकीय जमीन नावावर करून देतो, असे खोटे सांगून १५ हजार रुपये घेतले आहेत. तसेच आरोपीने अजून इतर देखील कातकरी समाजातील गरीब महिला व पुरुष यांच्याकडून त्यांना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे येथून विविध योजना मिळवून देतो, माझी तेथे ओळख आहे, असे सांगून त्यांच्याकडून काही रोख व ऑनलाईन स्वरूपात रक्कम घेऊन त्यांची देखील फसवणूक केली आहे. अशा प्रकारच्या दिलेल्या फिर्यादीवरून ओतूर पोलीस स्टेशन येथे सदरचा गुन्हा दाखल झाला असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास ओतूर पोलिस स्टेशनचे सहाय्यक निरीक्षक लहू थाट यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भरत सूर्यवंशी हे करीत आहेत.

# भरत कुंकुलोळ यांची चेअरमनपदी फेरनिवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** हिंद सेवा मंडळ अहमदनगर संचलित शा. ज.पाटणी विद्यालयाच्या चेअरमनपदी भरत बुधमल कुंकुलोळ यांची सर्वानुमते फेरनिवड करण्यात आली आहे.भरत कुंकुलोळ अनेक वर्षापासून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करत आहेत. नगरपरिषदेचे नगरसेवक, भाग्योदय पतसंस्था संचालक, राजाराम तरुण मंडळ, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, बुद्धिबळ असोसिएशन आदी विविध ठिकाणी पदाधिकारी म्हणून ते कार्य करत आहेत.त्यांची निवड त्यांच्या कार्याची पावतीच आहे. श्रीरामपूर शहर जडणघडणीत त्यांचे परिवाराचा मोठा वाटा आहे. त्याचे निवडीचे हिंद सेवा मंडळाचे मांनद सचिव संजय जोशी, सोमय्या हायस्कूल चेअरमन संजय छलारे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# हरवलेले १७ मोबाईल तक्रारदारांना पोलिसांनी केले परत

**सोमेश्वरनगर -** बारामती तालुक्यातील सुपा पोलीस स्टेशन हददीतील तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल गहाळ झालेबाबत सुपा पोलीस स्टेशन येथे तकारी दाखल केल्या होत्या. सदर तक्रारींची दखल घेवुन गहाळ मोबाईलचा शोध घेवुन ते हस्तगत करणेबाबतचे आदेश सहा. पोलीस निरीक्षक मनोजकुमार नवसरे यांनी सुपा गुन्हे शोधपथकाचे अंमलदार किसन ताडगे, महादेव साळुंके यांना दिले होते. त्यावरून गहाळ मोबाईलची तांत्रीक दृष्टया तपास त्याचे विश्लेषण करून एकुण १७ विविध कंपनीचे मोबाईल फोन किंमत अंदाजे एकुण ३,१५००० रू. विविध भागातुन तसेच परराज्यातुन हस्तगत केले आहेत. सदरचे हस्तगत केलेले मोबाईल मनोजकुमार नवसरे सो, प्रभारी अधिकारी सुपा पोलीस स्टेशन यांचे हस्ते तक्रारदार यांना सुपुर्द केलेले आहेत. त्याबाबत तक्रारदार यांनी सुपा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी मनोजकुमार व गुन्हेशोध पथकाचे अभार मानले आहेत. सदरची कामगीरी पंकज देशमुख सो पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण, गणेश बिरादार सो, अप्पर पोलीस अधिक्षक बारामती, सुदर्शन राठोड सो उपविभागीय पोलीस अधिकारी बारामती यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहा. पोलीस निरीक्षक मनोजकुमार नवसरे सुपा पोलीस स्टेशन, गुन्हे शोधपथकाचे पो.हवा. रूपेश साळुंके, पो. हवा. विशाल गजरे, ताडगे, महादेव साळुंके सुरज साळुंके, तुषार जैनक यांचे पथकाने केली आहे.



# रांजणगाव जमिन गैरव्यवहार प्रकरणी तत्कालीन महसूल मंत्र्याचा आदेश कायम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**रांजणगाव गणपती :** रांजणगाव गणपती, ता. शिरुर गावठाणातील सुमारे ७२ गुंठे जमीन बळकावण्याचा प्रयत्न झाला असून, याबाबतचे अपील उच्च न्यायालयाने नुकतेच फेटाळले असून, यामुळे तत्कालीन महसूल मंत्र्याचा आदेश कायम राहणार आहे. ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या सतर्कतेने तो प्रकार यापूर्वी उघडकीस आला आहे.याप्रकरणी महसूल विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला असता गावठाणातील मिळकतीस सरकारचे नाव दाखल करण्याचे आदेश तत्कालीन महसूल मंत्र्यांनी होते. सदर आदेशाविरोधात येथील आनंदराव दिनकर पाचुंदकर यांनी दाखल केलेले अपील उच्च न्यायालयाने नुकतेच फेटाळले असल्याची माहिती लोकनियुक्त सरपंच सुवर्णा वायदंडे व उपसरपंच श्रीकांत पाचुंदकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.येथील ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेला ग्रामपंचायत सदस्य अनिल दुंडे,अशोक शेळके, नेताजी फंड, निलेश लांडे,भानुदास शेळके उपस्थित होते. याबाबत वायदंडे व उपसरपंच पाचुंदकर यांनी सांगितले की, सन २००८-०९ गावात ग्रामपंचायतीत सत्तांतर झाल्यानंतर याच काळात ग्रामपंचायतीतील सन १९६० -६१ च्या जुन्या ग्रामपंचायत नमुना ८ अभिजल्याचा गैरफायदा घेऊन संबंधित अधिकारी व पदाधिकारी यांना हाताशी धरुन राजमुद्रा पतसंस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पाचुंदकर यांनी त्यात खाडाखोड करून त्या ठिकाणी त्यांचे वडील आनंदराव पाचुंदकर नावाची नोंद केली. याप्रकरणी ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी तत्कालीन महसूल मंत्र्यांसमोर सुनावणी होऊन आनंदराव पाचुंदकर यांचे नाव वगळून सदर मिळकतीस सरकारचे नांव दाखल करण्याचे आदेश ऑक्टोबर २०२३ मध्ये तत्कालीन महसूल मंत्र्यांनी दिले होते.या आदेशाविरोधात आनंदराव दिनकर पाचुंदकर यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली होती.मात्र त्यांचे अपील बुधवारी, दि.१९ उच्च न्यायालयाने फेटाळले असल्याची पत्रकार परिषदेत देण्यात आली.या जमीन बळकावण्याच्या प्रकरणात मदत करणारे संबंधित अधिकारी आणि तत्कालीन सरपंच,ग्रामसेवक यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही सरपंच वायदंडे व उपसरपंच पाचुंदकर यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

या बाबत राजमुद्रा पतसंस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पाचुंदकर म्हणाले कि, आमचे अपील उच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर आनंद व्यक्त करणाऱ्यांनी कदाचित उच्च न्यायालयाचा व्यवस्थित वाचलेला दिसत नाही.जरी उच्च न्यायालयाने आमचे अपील फेटाळले असले तरी या संदर्भात आम्हाला योग्य तो न्याय मिळण्यासाठी आमच्याकडे ४ ते ५ पर्याय उपलब्ध असून, त्यासंदर्भात आम्ही आमच्या कायदे सल्लागारांशी बोलून पुढील वाटचाल करू.

# जलसंपदाची जबाबदारी लोकनेते बाळासाहेब विखेंच्या स्वप्न पूर्तीसाठीच : ना. विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार -** मंत्रिमंडळात मला जलसंपदा खात्याची जबाबदारी मिळाली ही माझ्या दृष्टीने जीवनातील आनंदाची बाब आहे हे खाते मिळाल्यामुळे लोकनेते बाळासाहेब विखे पाटील यांनी दुष्काळमुक्त महाराष्ट्राची केलेली व लोकनेते बाळासाहेब विखे पाटील यांनी पाहिलेल्या स्वप्नांची पूर्ती करण्याची जबाबदारी मला माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या स्वप्नपूर्तीच्या दृष्टीने माझे काम सुरू असून ६२ टेएमसी पाणी उल्हास खोऱ्यातून गोदावरी खोऱ्यात आणण्याचे मोठे कामाचे दायित्व मी स्वीकारले आहे भंडारदरा व निळवंडे हे धरण एकच आहे गोदावरी खोऱ्यात पाणी प्रकल्पाला ४० हजार कोटी खर्च अपेक्षित आहे त्यापैकी नाबार्डने तीस हजार कोटी देण्यास तयार आहे त्यामुळे या प्रकल्पाचे काम वेगाने सुरू होणार आहे पुढील पाच वर्षात गोदावरी खोऱ्यात पाणी येईल व भंडारा धरण्यात पाण्याची आवक वाढेल असे प्रतिपादन माननीय जलसंपदा मंत्री माननीय नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले माननीय विखे पाटील यांची मंत्री मंडळात जलसंधारण मंत्री व अहिल्या नगरचे पालकमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल कोल्हार भगवतीपुर येथील ग्रामस्थांच्या वतीने नामदार विखे यांचा भव्य नागरिक शेतकऱ्याचे आयोजन येथील ग्रामदैवत भगवती मातेच्या भव्य प्रांगणात करण्यात आले होते त्याप्रसंगी आमदार विखे बोलत होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील हे होते.

पुढे बोलताना नामदार विखे म्हणाले की कौशल्य विकासाचा मंत्र हा भविष्यात रोजगाराची संधी मिळवून देणार आहे त्यामुळे कौशल्य विकासाचे केंद्र लोणी येथील महाविद्यालय सुरू केले आहे प्रत्येक मुलाच्या पालकांनी त्यासाठी मुलांना प्रोत्साहित केले पाहिजे कालबाह्य शिक्षणाच्या व्यवस्थेतून पालकांनी आता बाहेर पडावे अशी अपेक्षा व्यक्त करीत उद्योग धंदे सुरू झाल्यावर लोकांपेक्षा भूमिपुत्रांना काम मिळावे हीच या माध्यमातून आहे जनता जनार्दनासाठी अविरोध काम केल्यामुळेच आपला विधानसभा निवडणुकीत विजय झाल्याचे सांगत ज्या विश्वासाने मला जनतेने निवडून दिले त्या विश्वासाला मी व महायुतीचे सरकार तडा जाऊ देणार नसल्याचे यावेळी नामदार विखे यांनी सांगून मतदारांचे आभार केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के व्यासपीठावर पांडुरंग गणपत खर्डे पाटील श्री अशोक शेठ असावा कृषी भूषण राजेंद्रजी कुंकूलोळ कोल्हार भगवती पूर देवालय ट्रस्टचे अध्यक्ष भाऊसाहेब रघुनाथ खर्डे पाटील चंद्रभान खर्डे पाटील संभाजीराजे देवकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के म्हणाले की महायुती सरकारने सुरू केलेल्या विविध योजनांचा लाभ आज जनतेला मिळत माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस माननीय उपमुख्यमंत्री अजित पवार व माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ कारभार अतिशय उत्तम प्रकारे करीत असल्याचे म्हस्के यांनी सांगितले. कार्यक्रमाचा प्रारंभ दीप प्रज्वलन व पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील व लोकनेते बाळासाहेब विखे पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी ऋषी चौकापासून मान्य नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीत मिलेट्री बँड पथकाने मिरवणुकीची रंगत वाढवली. माननीय नामदार विखे पाटील यांनी व्यासपीठावर येण्यापूर्वी भगवती मातेचे दर्शन घेऊन व्यासपीठावर आगमन केले. नामदार विखे पाटील यांचा कोल्हार भगवतीपुर येथील युवा नेते डॉक्टर सुजय दादा विखे पाटील मित्र वतीने तसेच विविध संस्था संघटना यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी करण्यात आलेल्या व्यक्तिगत सत्काराचा ही नामदार विखे यांनी स्वीकार केला.



# बारामतीत एन्व्हॉयर्मेंटल फोरमच्यावतीने पाणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** वनविभागातील प्राण्यांचे पाण्याअभावी हाल होऊ नये या उद्देशाने येथील एन्व्हॉयर्मेंटल फोरम ऑफ इंडियाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शुक्रवारपासून (दि:२१) पाणवठ्यामध्ये टँकरद्वरे पाणी सोडण्यास प्रारंभ झाला. जागतिक वनीकरण दिन, जागतिक जलदिन व जागतिक हवामानदिनाचे औचित्य साधून हा उपक्रम फोरमच्या वतीने राबविण्यात आला. उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने आता वन्यजीवांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. यावर मात करण्याच्या उद्देशाने दरवर्षीप्रमाणेच बारामतीतील एन्व्हॉयर्मेंटल फोरम ऑफ इंडियाच्या अध्यक्षा सौ.सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वन्यजीवांसाठी टँकरद्वरे पाणवठ्यात पाणी सोडण्यास प्रारंभ केला आहे, या उपक्रमांतर्गत शुक्रवारी तांदुळवाडी नजिकच्या दोन पाणवठयात टँकरद्वरे पाणी सोडले गेले. बारामती तालुक्याच्या वनविभागात पारवडी, शिर्सुफळ, नारोळी, वढाणे, मोढवे, मुढाळे, आदी ठिकाणी जवळपास १९ पाणवठे आहेत. दरवर्षी उन्हाळ्यात फोरमच्या वतीने या पाणवठ्यात टँकरने पाणी सोडले जाते. यंदाही आवश्यकतेनुसार वनविभागाच्या सूचनांनुसार यात उन्हाळ्यात पाणी सोडले जाणार आहे. दरम्यान युवा नेते पार्थ पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तांदुळवाडी येथील ज्येष्ठ नागरिक निवासामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते केक कापण्यात आला, तसेच ज्येष्ठ नागरिकांना वाटप केले गेले.



**तांदुळवाडी (ता. बारामती)- येथील वनक्षेत्रातील पाणवठ्यात पाणी सोडताना एन्व्हॉयर्मेंटल फोरम ऑफ इंडियाचे सदस्य.**

द•ख•ल

## बचत गटात लाखो रुपयांच्या अपहार

### गोरगरिबांचे आर्थिक नुकसान

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** ;- तालुक्यातील उमेद माध्यमातून बचत गटात लाखो रुपयांच्या अपहार झाल्याची घटना उघडकीस आल्यावर श्रीगोंद्यातील बचत गट नव्हे तर गोरगरिबांचे संसार उधळून लावण्याचा कट असल्याचे महिला वर्गातून खुलेआम बोलले जात

### घोटाळ्यात सोमनाथाची कृपा ?

बचत गटाच्या माध्यमातून लाखो रुपयांचा घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी सोमनाथाची निवड झाली चौकशी झाली मात्र अहवाल जिल्हा परिषदेला अजूनही मिळाला नसल्याने अहवाल आहे तरी कुठे? असा प्रश्न उपस्थित केला जात असून तरीही चौकशीनंतर १४ लाखाची वसुली झाल्याने काहीतरी गडबड असून घोटाळ्यात सोमनाथाची कृपा असल्याची जोरावर चर्चा ऐकण्यास मिळत आहे.

### अहवालाची लपवलीय कोणासाठी ?

पहिल्या चौकशीचा अहवाल जिल्हा परिषदेला मिळाला नाही दुसऱ्या चौकशीचा अहवाल जिल्हा परिषदेला मिळाला असून अहवालाच्या बाबतील पंचायत समिती आणि जिल्हा परिषद मोठ्या प्रमाणात गोपनीयता पाळत असून कोणाला वाचविण्यासाठी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद अहवाल विषयी माहिती देण्यात टाळाटाळ करत आहेत हा प्रश्न अनुउत्तरीतच आहे.

आहे ‘‘बचतगट‘‘ म्हणजे मराठीत ‘‘सेव्हिंग ग्रुप‘‘ किंवा ‘‘स्वयं-सहाय्यता गट‘‘ असा अर्थ होतो. हा गट ठराविक कालावधीसाठी बचत जमा करण्यासाठी एकत्र येणाऱ्या महिलांचा समूह बचत गट हा एक सामाजिक-आर्थिक उपक्रम आहे. ही प्रक्रिया संघटितपणे एकमेकांना समजून घेत होत असल्याने या रचनेला स्वयंसाहाय्य गट असेही संबोधले जाते.बचत गट म्हणजे ठराविक काळाने बचत जमा करण्याच्या निमित्ताने एकत्र येणारा गट होय. हा नाबार्डचा सूक्ष्म वित्त पुरवठ्याचा जगातील सर्वात मोठा कार्यक्रम आहे .यासाठी सरकारकडून प्रोत्साहत्मक ठराविक रक्कम बचत गटाला दिली जाते त्याच रकमेतून श्रीगोंद्यात लाखो रुपयांचा घोटाळा उघडकीस आला असून याची चौकशी पूर्ण झाली असून त्याचा अहवाल जिल्हा परिषदेला जमा करण्यात आला असून दोषींवर कारवाई करण्यासाठी जिल्हा परिषद मुहूर्त शोधत आहे कि काय असा प्रश्न सर्व सामान्य जनतेला पडला आहे. कारण ६ दिवसापासून दोषीला नोटीस काढण्याचे चालू आहे मुख्याधिकारी यांची सही होणे बाकी आहे अशी अनेक करणे सांगितली जातात त्यामुळे या घोटाळ्यातील कारवाई ला सामोरे जाण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणात मानसिकता नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. पहिल्या चौकशी नंतर पुन्हा घोटाळा करण्याची धमक महिलांमध्ये आलीच कोठून याचाही शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे घोटाळ्यात अडकणाऱ्या महिला या अतिशय कमकुवत आणि गोरगरीब कुटुंबातील असून आता दुसऱ्याने केलेल्या चोरीचा आळ त्याचेवर येणार असून त्यांनाच कारवाईला सामोरे जावे लागणार आहे .त्यामुळे बचत गटाच्या माध्यमातून महिला सबलीकरण होण्याच्या ऐवजी महिलांना अडचणीत आणण्याचा कट होता कि काय असा प्रश्न सर्वसामान्य महिलांना पडला आहे.

## बस चालकाच्या प्रसंगावधानाने ४० प्रवाशांचे वाचले प्राण

### कामरगावातील पुलाजवळील घटना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर:**सायंकाळची वेळ...रस्त्याच्या उतारावर बस मागील चाकांचा तुटलेल्या हाऊसिंग एक्सल... बसने घेतलेले हेलकावे, प्रवाशांचा टांगणीला लागलेला जीव, चालकाने दाखविलेले चातुर्य, रस्त्यालगत डगरीकडे घेतलेले वाहन आणि सुदैवाने बसमधील सुमारे ४० प्रवाशांचा जीव वाचला.हा थरार अहिल्यानगर-पुणे कामरगाव वालुंबा नदीवरील पुलाजवळ शुक्रवारी (ता. २१) सायंकाळी घडला.अहिल्यानगर- पुणे महामार्गावरील अहिल्यानगर तालुक्यातील कामरगावच्या वालुंबा नदीवरील पुलाच्या पाठीमागे २०० फुटांवर तीव्र गोलाकार उतार आहे. शुक्रवारी सायंकाळी पावणे सातच्या सुमारास जिंतूर-पुणे एसटी बस धावत होती. अचानक गाडीने हेलकावे घ्यायला सुरुवात केली. त्यामुळे बसमधील प्रवासी घाबरले. गाडीच्या मागील चाकांचा हाऊसिंग तुटल्याचे बसचालक रावसाहेब सांगळे यांच्या लक्षात आले. समोर मोठी नदी असल्याने मोठा अनर्थ होऊ नये म्हणून त्यांनी प्रसंगावधान ठेवून गाडीचा वेग कमी करून रस्त्यालगत डगरीकडे गाडी वळवली. ब्रेक न दाबता गिअरवर त्यांनी गाडीवर नियंत्रण मिळवत रस्त्याच्या डाव्या बाजूला नेली; अन्यथा बस सुमारे साठ फुटांवरून खाली कोसळून मोठा अनर्थ घडला किरकोळ अपघातानंतर गावातील सामाजिक कार्यकर्ते तुकाराम कातोरे, विकास ठोकळ, राजेंद्र पोटे यांनी अपघातस्थळी धाव घेऊन प्रवाशांना धीर दिला. बसमधील प्रवाशांना पुण्याकडे जाणाऱ्या बसमधून जाण्याची व्यवस्था केली. काही वेळानंतर अहिल्यानगर तालुका पोलिस ठाण्याचे कर्मचारी व एसटी महामंडळाचे नियंत्रक व त्यांची टीम अपघातस्थळी दाखल झाले. यावेळी घटनास्थळी गर्दी झाली होती. दरम्यानच्या रस्त्याच्या तीव्र उतारावरती आणखी वाहतूक खोळंबून अपघात होऊ नये म्हणून तुकाराम कातोरे, विकास ठोकळ, राजेंद्र पोटे यांनी वाहतुकीचे नियमन केले. संकटमोचक झालेले बसचालक सांगळे यांचे प्रवासी व ग्रामस्थांनी कौतुक केले.अहिल्यानगरहून पुण्याच्या दिशेने जाताना कामरगावच्या अलीकडे तीव्र उतारावर वळण असलेल्या या अपघाती स्थळावर आजवर अनेकदा छोटे मोठे अपघात झाले सुदैवाने अद्यापपर्यंत जीवितहानी झाली नाही. बांधकाम विभागाने या भागाची पाहणी करून तीव्र उतार कमी करून वळण काढावे, अशी मागणी तुकाराम कातोरे यांनी केली आहे.

# मुख्यमंत्री साहेब कधीतरी भटक्यांच्या पालापर्यंत लक्ष द्या

## या महिलांना तुमची लाडकी बहीण संधी मिळू द्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** - मुख्यमंत्री साहेब कधीतरी भटक्यांच्या पालापर्यंत आपले लक्ष जाऊ द्या आज महाराष्ट्रातील कितीतरी महिला तुमच्या लाडक्या बहिणी आहेत परंतु तुमची लाडकी बहीण होण्याची भटक्याच्या पालातील महिलांना संधी मिळू द्या नागरिकत्वाचे पुरावे नसल्यामुळे लाडक्या भावा वाचून पालातील लाडकी भटक्याची बहीण अजूनही वंचित राहिलेले आहे. गाव कोसाच्या तीन दगडाची भटक्याची चूल भटक्या समाजामध्ये एकूण ४२ जाती आहेत त्यापैकी नाथपंथी डवरी गोसावी ही जात सतत कोकण पश्चिम महाराष्ट्र विदर्भ मराठवाडा या भागामध्ये बहुरूपी पोलीस इन्स्पेक्टर ,डॉक्टर ,वकील, तंट्या भिल्ल असे वेगवेगळी सोंग घेवून कला सादर करून कुटुंबाची उपजीविका करत असतात आज पर्यंत या भटक्याच्या पालावरती स्वातंत्र्याची पहाट नाही. राहण्यासाठी स्वतःची जागा नाही तिरंगा झेंडा लावण्यासाठी घर नाही कसून खाण्यासाठी जमीन नाही व्यवसाय करण्यासाठी शासन व बँका कर्ज देत नाही नागरिकत्वाचे पुरावे आधार कार्ड मतदान कार्ड जॉब कार्ड जातीचा दाखला नसल्यामुळे शासनाची कुठलीच कल्याणकारी योजना मिळत नाही.पोटासाठी सतत भटकंती करावी लागते त्यामुळे सरकार दरबारी नोंद नाही.या जन्म घेऊन आमचा काय गुन्हा ? आजही गावाच्या बाहेर पाल ठोकले तर पोलीस स्टेशन पोलीस पाटील यांना मुला बाळासह प्राण्यासह मशापुरी द्यावी लागते या भारत देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी भटके विमुक्त समाज रक्ताच्या थारोळ्यात होता. आजही या समाजाचा काय विचार केला जातो पिढी न पिढी बरबादी झाली पण अजून या आझादी मिळाली नाही.. भिक्षा मागून आणलेले शिळे भाकरीचे तुकडे भाजी चटणी धान्य फाटके तुटके कपडे उघड्यावर राहणे बाराही महिने वेगवेगळ्या गावातले पाणी पिणे आजारी पडले तर अंगावर आजार काढणे खरंच या भटक्याच्या वेदनेला बघून जगावे की मरावे असे मनाला वाटू लागले उन्हाळ्याच्या झळा पेक्षा मनाला लागलेली गरिबीची झळ विस्तावासारखी आजारी पडले तर महात्मा फुले आरोग्य योजना लाभ नागरिकत्वाचे पुरावे नसल्यामुळे मिळू शकत नाही पोटासाठी गोदडी काच भंगार प्लास्टिक गोळा करण्यासाठी गेल्यावर अत्याचार होतात भेदभाव केला जातो साक्री जिल्हा धुळे राईनपाडा येथे पोट भरण्यासाठी भिक्षा मागताना पोरं चोरून घेऊन जाणाऱ्या टोळी संशयात भटके विमुक्त समाजाची पाच जण अमानुषपणे मारून दौंड यवत जिल्हा पुणे येथे शितल शेगर भंगार वेचताना परप्रांतीयांनी अत्याचार करून तिचे डोळे काढून तिला ठार मारण्यात आले इंदापूर शिरसवडी जिल्हा पुणे येथे तरुण युवक पोलीस अकॅडमी प्रशिक्षण देत असताना जुन्या वादावरून गावातील गावगुंडांनी गोळ्या घालून ठार मारले राजगुरुनगर जिल्हा पुणे येथे भटके विमुक्त गोसावी समाजातील सुनील मकवाने दोन लहान दुर्गा नव वर्ष कार्तिक आठ वर्षे यांच्यावर परप्रांतीयांनी अत्याचार करून मारून टाकले या भटके मुक्त वंचित समूहाला वाली नसल्यासारखे झाले निसर्ग साथ देत नाही सरकार डोळे उघडून बघत नाही सोशल मीडियावर समाजाच्या वेदना दुखणे मांडण्यासाठी पुढारी तयार होत नाही सगळीकडून भेदभाव होतो असे वाटते पण सर्वांना मतदानाच्या भटके विमुक्त पालातील गोरगरीब वंचित अत्याचार ग्रस्त दिसतात असे का ? भेदभाव म्हणावा की स्वार्थ



## पाण्याची उपलब्धता आणि उत्पादकता वाढविण्याची गरज : सुखदेव फुलारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा:** सध्या अस्तित्वात असलेले पाण्याचे स्रोत व प्रकल्पातील पाणीसाठा याला काही मर्यादा असल्याने जल स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रत्येक गावातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतात छोटी-मोठी जलसंधारणाची कामे करून पाण्याची उपलब्धता वाढविणे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून पाण्याची उत्पादकता वाढविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जलमित्र सुखदेव फुलारी यांनी केले. नेवासा तालुक्यातील पाथरवाला माध्यमिक विद्यालयात शनिवार दि.२२ मार्च रोजी जागतिक जल दिनामित्त महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाचे मुळा पाटबंधारे उपविभाग चिलेखनवाडी यांचे वतीने कार्यकारी अभियंता सायली पाटील यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित जलजागृती सप्ताह सांगता कार्यक्रमात जलसाक्षरता, पाण्याची बचत व संवर्धन काळाची गरज याविषयावर मार्गदर्शन करताना श्री.फुलारी बोलत होते. उपविभागीय अभियंता संदीप पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. माजी सरपंच दत्तात्रय खाटिक, मुख्याध्यापक रमेश खाटीक, सरपंच हरिभाऊ थोरे, शिवनाथ थोरे, राम खाटीक, देविदास खाटीक, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदिप झिरपे,पांडुरंग खाटीक, लहू खाटीक, बाबुराव म्हस्के, अध्यापक सुनिल चंद्रकांत गुंड, ईस्माइल शेख, चंद्रकांत कचरे, संदिप लिपणे,बाळासाहेब म्हसरूप, शाखा अभियंता जितेंद्र कावले,बिरबल दरवडे,अतुल गायकवाड आदि व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, पाटबंधारे विभागाचे अधिकारी-कर्मचारी,शेतकरी व ग्रामस्थांनी पाणी आडवा-पाणी जिरवा, पाण्याची बचत-काळाची गरज, 'जल है तो कल है या घोषणा देत गावामधून जलजागृती फेरी काढली. श्री.फुलारी पुढे म्हणाले की,उपलब्ध साठा किती आहे आणि पिक,मानुस, पशु-पक्षी यातील कोणत्या घटकासाठी नेमके किती पाणी लागते याची आपल्याला माहिती असेल तर पाण्याचे योग्य नियोजन करणे सोपे होते. पारंपारिक प्रवाही सिंचन पद्धतीत बदल करुन सूक्ष्मसिंचनाचा अवलंब केल्यास ४० टक्के पाण्याची बचत होते. प्रकल्पातील पाणी शेतीला देणे आणि त्याचे सिंचन व्यवस्थापन करणेसाठी महाराष्ट्र सिंचन शेतकरी व्यवस्थापन कायदा २००५ अस्तित्वात येऊन पाणी वापर संस्था स्थापन झाल्या. सिंचन व्यवस्थापनात शेतकऱ्यांचा सहभाग वाढवणे,पाणी व्यवस्थापनात सुधारणा करणे,सिंचन योजना प्रभावीपणे राबवणे,पाणी वापराची कार्यक्षमता वाढवणे हा यामागील उद्देश आहे.या कायद्यामुळे, सिंचन व्यवस्थापनात शेतकऱ्यांची भूमिका अधिक महत्त्वाची झाली आहे.पाणी व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी शेतकऱ्यांकडून थेट सहभाग मिळतो. सिंचन योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी होते.

## २१ वर्षांपासून गोशाळा अनुदानापासून वंचित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी:** प्दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचे पशुधन वाचावे म्हणुन शासनाने जनावरांच्या छावण्या काढुन छावण्यांना अनुदान दिले होते.परंतु नेहमीच शेतकऱ्यांचे पशुधन वाचावे यासाठी प्रयत्न करणाऱ्या गोशाळांना मात्र शासकीय अनुदान दिले जात नाही.मागील २१ वर्षापासुन मिरी येथे गुरु आनंद गोशाळा विनाअनुदानावर चालु आहे. २०१५ पासून गोवंश हत्या प्रतिबंध कायदा आहे. या कायद्यानुसार शेतीकामासाठी वा ओझी वाहण्यासाठी वा पैदाशीसाठी उपयुक्त नसलेली गोवंशीय बैल व वळू यांच्या कत्तलीवर बंदी घालण्यात आलेली आहे.त्यामुळे भाकड जनावरांची संख्या वाढत आहे.त्यांचं संगोपन करणं पशूपालकांना परवडत नाही.त्यामुळे मोकाट वा गोशाळेत जनावरे पाठवली जातात.याचा आर्थिक भार गोशाळा चालकांना सहन करावा लागत आहे.पाथर्डी तालुक्याचा पश्चिम भाग कायमचा दुष्काळी भाग म्हणुन ओळखला जातो.त्यातच मिरी परिसरात यावर्षी पावसाचे प्रमाण अतिशय कमी होते.भर उन्हाळ्यात या भागात पाणी टंचाई जाणवु लागल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही भेडसावीत असताना शेतकरी आपले पशुधन वाचावे म्हणुन मिरी येथील गुरु आनंद गोशाळेत जनावरे आणुन घालतात.पाच एकर जागेत अति सुसज्ज असलेली गुरु आनंद गोशाळा आहे.पाण्यापासुन ते चाऱ्यापर्यत जनावरांची देखभाल केली जाते.मात्र ही गोशाळा शासनाच्या अनुदानापासुन वंचीत आहे. देणगीदारांच्या देणग्यावर चालणाऱ्या या गोशाळेत आजही दिडशे ते दोनशे जनावरे आहेत. शेतकऱ्यांचे पशुधन वाचावे या उद्देशाने ही गोशाळा चालविण्यात येत असली तरी आज गगनाला भिडलेले चाऱ्याचे व खुराकांच्या भावामुळे गोशाळेसमोर अनेक अडचणी उभ्या राहिल्या आहेत.मागील दोन वर्षापुर्वी या गोशाळेने चालविली होती.दानशुर व्यक्ती या गोशाळेला मदत करीत असल्या तरी आज ही मदत अपुरी पडत आहे. २००३ सालापासुन सुरु असलेल्या पाथर्डी तालुक्यातील मिरी येथील गुरु आनंद गोशाळेस शासनाने मदत करुन त्वरीत अनुदान उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी गुरु आनंद गोशाळेचे अध्यक्ष सचिन नहार तसेच सदस्य ललित मुनोत,सतिष मेहेर,राहुल मेहेर,विनोद मेहेर,प्रमोद संतोष गुंदेचा,अशोकलाल कटारिया,अशोकलाल भंडारी,आनंदकुमार चोरडिया,दिलीप मुनोतसह अनेक मान्यवरांनी केली.

## कुपोषणातून देश विश्वगुरू कसा बनेल: डॉ राजेश कुमार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिपणगाव :**आज देशामध्ये शारीरिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक या सर्व स्तरावरील वैचारिक कुपोषण चालू आहे आणि अशा स्थितीमध्ये देश विश्वगुरू कसा बनू शकेल असा खडा सवाल इंडियन मेडिकल प्रोफेशनल असोसिएशनचे (इम्पा ) राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजेश कुमार यांनी उपस्थित केला. अहिल्यानगर इंडियन मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशन या राष्ट्रीय स्तरावरील संघटनेच्या श्रीगोंदा शाखेच्या वतीने संविधानाच्या ७५ वर्षानंतर भारतीय आरोग्य क्षेत्रात झालेल्या विविध बदलांचा मागोवा घेण्यासाठी एका विशेष अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ राजेश कुमार यांनी या देशातील आरोग्य सेवेचा आढावा घेतला, तसेच इम्पाच्या वतीने देशभरातील डॉक्टरांमध्ये करून प्रशिक्षण देण्याची भूमिका स्पष्ट केली. समाजामध्ये वैद्यकीय क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून येत आहेत आणि अशावेळी या बदलांना सामोरे जायचे असेल तर वैद्यकीय व्यावसायिकांनी स्वतःला अपडेट केले पाहिजे. तसेच राष्ट्रीय



स्तरावर सर्व पॅथींचे आणि वैद्यकीय व्यावसायिकांचे इम्पा हे एकमेव राष्ट्रीय संघटन आहे या संघटनाच्या माध्यमातून या क्षेत्रामध्ये होणाऱ्या वाचा फोडण्याचे काम केले जात आहे. या संघटनेकडे राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षित वकिलांची मोठी फौज आहे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन सामाजिक विचारवंत डॉ. रफिक सय्यद यांनी केले. वैद्यकीय व्यावसायिकांनी वैद्यकीय सेवेचे संस्कार व मूल्यांचे जतन केले पाहिजे असे विचार व्यक्त केले. डॉ. अनिल कोकाटे यांना इम्पाचे अहिल्यानगर समन्वयक म्हणून देण्यात आली यावेळी बोलताना ते म्हणाले की , येणाऱ्या काळामध्ये इम्पाचे काम प्रचंड वेगाने वाढवण्याची जबाबदारी पूर्ण करून एक आदर्श युनिट उभा करू. सांगली येथील डॉ राजेंद्र कवठेकर यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील हे युनिट महाराष्ट्रासाठी आदर्श युनिट असल्याची प्रतिपादन केले. इम्पाच्या विद्यार्थी विंगचे डॉ. विक्रम सिंग यांनी राष्ट्रीय स्तरावर मेडिकल प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संदर्भामध्ये इम्पाचे कार्य स्पष्ट करून सांगितले. यावेळी दिल्ली इम्पाशी संलग्नता प्रमाणपत्रांचे वितरण राष्ट्रीय अध्यक्ष डॉ राजेश कुमार यांच्या हस्ते करण्यात आले. इम्पा ची श्रीगोंदा तालुका कार्यकारिणी जाहीर करून त्यांना अधिकृत नियुक्तीपत्र देण्यात आले.त्यानुसार डॉ राजेश पाखरे अध्यक्ष, डॉ नवनाथ कोल्हटकर व डॉ भानुदास रासकर उपाध्यक्ष, डॉ तिवटणे व डॉ निलेश कपिल सचिव तर डॉ देविदास थोरात व डॉ भानुदास रासकर यांची खजिनदार म्हणून नियुक्ती करण्यात आली. यावेळी मंचावर डॉ तपन पाटील, डॉ. उत्तम वडवकर , डॉ विक्रम भोसले, डॉ आसिफ इनामदार,डॉ रोहन बोराटे, डॉ संतोष चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इम्पाचे तालुकाध्यक्ष डॉ. पाखरे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. प्रमोद गायकवाड व डॉ बाळासाहेब पवार तर आभारप्रदर्शन डॉ. संजय टकले यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. अभिजीत तिवाटणे, डॉ. भानुदास रासकर. डॉ निलेश कपिल, डॉ. देविदास थोरात, डॉ सागर ठवाळ, डॉ हंबीर म्हस्के, डॉ संतोष शिंदे, डॉ संजय कोकाटे,यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास डॉ यशवंतराव चव्हाण, डॉ चेतन साळवे, डॉ राजेंद्र कदम, डॉ राजेन्द्र सिदनकर, डॉ राज सय्यद, डॉ इम्रान जमादार, डॉ बी एन चव्हाण, डॉ धनंजय आनंदकर , डॉ निलेश मखरे,डॉ नाज इनामदार, डॉ सुनीता वडवकर , डॉ पवार मॅडम, डॉ टकले मॅडम, डॉ म्हस्के मॅडम यांची विशेष उपस्थिती होती.

## श्रीमती हंडोरे यांनी घेतले साईदर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** सामाजिक न्याय मंत्री व राज्य सभेचे खासदार चंद्रकांत हांडोरे यांच्या पत्नी मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेविका सौ.संगीता हांडोरे व त्यांच्या कन्या मुंबई काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रज्योतीताई हांडोरे यांनी श्री साईबाबांचे दर्शन घेतले यावेळी श्री. साईबाबा संस्थान जनसंपर्क विभाग यांच्याकडून त्यांचा सत्कार करण्यात आला

यावेळी त्यांच्यासोबत भीमशक्ती सामाजिक संघटनेचे महाराष्ट्र संघटक शिमोन जगताप, राज्य उपाध्यक्ष भाऊसाहेब साठे, उपजिल्हाध्यक्ष अनिल गायकवाड, पत्रकार सरोदे, शिर्डी परिसरातील युवा उद्योजक दशरथ गुजर, दीपक गायकवाड आदी मान्यवर होते.



# परिस्थितीने गांजले कुटुंबाने उपेक्षिले, मुलांसह निलीमाला स्नेहालयाने स्वीकारले !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर:** समाजकार्याचे पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या नीलिमाला ( बदललेले नाव ) विवाहनंतर असंख्य संकटांना एकाच वेळी तोंड द्यावे लागले. आर्थिक - सामाजिक तसेच मानसिक आणि शारीरिक आरोग्याच्या गुंतागुंतीच्या समस्या समोर उभ्या त्यामुळे नाईलाजाने स्वतःच्या उपाशी मुलांना साखळीने बांधून ठेवून त्यांच्यासाठी भाकरीचे तुकडे शोधणाऱ्या मातेला आणि तिच्या २ मुलांना स्नेहालय परिवारात हक्काचे घर आणि सुरक्षित निवारा मिळाला. माध्यमात यासंबंधी वाचल्यावर स्नेहालय संस्थेच्या मानसग्राम या मानसिक आरोग्यावरील प्रकल्पाची स्नेह मनोयात्री टीम राहुरी तालुक्यातील उंबरे गावात २० मार्च रोजी धडकली. ही आई तेव्हा चंद्र शोधायला भटकत होती. तिच्या चंद्रमोळी घरात तिची २ मुलं तहान भुकेने कासावीस होऊन निपचित पडली होती. घराची अवस्था मोडकळीस आलेली. अंगावर भिंत पडून जीवावर बेतण्याची शक्यता होती.सामान अस्ताव्यस्त रचून ठेवल्याने चुकून आग लागली तर जीव वाचवण्यासाठी बाहेर पळणे देखील शक्य नव्हते. मनोयात्री टीमला त्यांच्या घरात शिरताना भीती वाटली.

धोकादायक ‘‘ एवढ्या छोट्याश्या घरात हे प्रचंड निरुपयोगी सामान कशाला ठेवले,‘‘ असे टीमने या ताईला विचारले. नीलिमा ने सांगितले की ‘‘हे सामान कामाचे आहे. मी दारोदारी, गल्लोगल्ली जाऊन चरितार्थासाठी गोळा केलेले हे भंगार आहे. यामध्ये असंख्य जुने कपडे, चप्पल, बाटल्या, डबे इ .भंगार हाच माझा जगण्याचा आधार आहे...‘‘ नीलिमा म्हणाली. मनोयात्री टीमने विचारले की. ‘‘असे असूनही तुझी मुले कुपोषित आणि आजारी का दिसत आहेत ?‘‘ यावर निशब्द झालेल्या नीलिमाने अश्रूपात करून आपली हतबलता व्यक्त केली. गावात चौकशी केल्यावर समजले की, नीलिमाचे कुटुंब सुसंस्कृत , राजकारणात वजनदार होते. तिच्या वडिलांनी, आणि आजोबांनी उंबरे गावाच्या विकासात समर्पित योगदान दिले. आई-वडिलांची एकुलती नीलिमा उच्चविद्याविभूषित आहे. वर्ष २०११ मध्ये तिने अहिल्यानगर येथील 'सीएसआरडी' (सेंटर फॉर स्टडीज ऑफ रूरल डेव्हलपमेन्ट) या संस्थेतून 'मास्टर ऑफ सोशल वर्क' अर्थात 'एमएसडब्ल्यू' ही पदवी प्राप्त केली



आहे. परंतु नंतर कौटुंबिक , आर्थिक. आणि आरोग्य समस्यांनी तिला ग्रासले. आई, वडिलांचा मृत्यू झाला. भावा बहिणीने नाते तोडले. पतीनेही दोन जबाबदारी नीलिमालाच देऊन घटस्फोट दिला. समाजकार्याची पदवी असल्याने अनेक चांगल्या संस्थांमध्ये नोकरीची संधी नीलिमाला आली होती. पण ती नोकरीला गेल्यावर तिच्या दोन्ही लेकरांना कोण सांभाळणार हा प्रश्न होता. अखेरीस मुलांना जगवण्यासाठी दिली माने भंगार गोळा करण्याचे काम सुरू केले. परंतु पुरुषाचा आधार नसलेल्या बाईला समाज नीट जगू देत नाही. दारोदार फिरण्याचा हा व्यवसायही नीलिमाला बंद करावा लागला . शिर्डी सोडून आपल्या वडिलांच्या उंबरे गावातील पडक्या घरात तिने मुलांचं आश्रय घेतला. डोक्यावर सडलेले पत्रे. पडक्या भिंती, तुटके दार. घरात वीज नाही. वापरायला आणि प्यायला पाणी नाही. अशा परिस्थितीत ती जगण्याचा आणि मुलांना जगविण्याचा संघर्ष करत होती. तीन आठवड्यांपूर्वी शिर्डी परिसरात एका मातेने आपल्या दोन मुलांना साखळी कुलपात बांधून ठेवल्याची एक बातमी माध्यमांमध्ये झळकली . स्नेहालयच्या स्नेह मनोयात्री टीमने या महिलेचा शोध सुरू केला. तेव्हा त्या महिलेला शिर्डीतून हुसकून दिल्याचे समजले.ती राहुरी तालुक्यातील उंबरे येथील वडिलांच्या घराकडे गेल्याचे आणि तेथे भंगाराचे संकलन करीत असल्याचे समजले.

स्नेह मनोयात्री टीम उंबरे गेल्यावर गावकऱ्यांनी आत्मीयतेने स्वागत करून नीलिमाची व्यथा सांगितली. कोणाचाही आधार नसल्याने तसेच मानसिक आणि शारीरिक आरोग्याच्या समस्यांमुळे तिचे आणि तिच्या बालकांचे होणारे हाल गावाला बघवत नव्हते.गावातील जाणत्या नागरिकांनी सांगितले की,नीलिमा मुलांना एकटे सोडते आणि सकाळपासून रात्रीपर्यंत पंचक्रोशीत फिरून भंगार जमा करते. ते धोकादायक स्थितीत घरातच ठेवते. मुलांची उपासमार झाली की, लोकांना काम , पैसे किंवा जेवण मागते. कोणी समजून सांगायला गेले तर तिची प्रतिक्रिया अत्यंत तीव्र असते. अखंड बोलणे, दगड मारणे अशा निलीमाच्या प्रतिक्रिया असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले. पहिल्या दिवशी स्नेह मनोयात्री टीमने नीलिमाशी दीर्घ संवाद करून तिला काही काळासाठी मानसग्राम मध्ये चालण्याचा आग्रह केला. स्नेह मनोयात्री पुनर्वसन सुविधा आणि उपचारांची माहिती आणि छायाचित्र दाखविले. परंतु नीलिमाने दाद दिली नाही. काल , २१ मार्च रोजी स्नेह मनोयात्री टीम पुन्हा गावात गेली आणि नीलिमाशी संवाद करून तिला पुनर्वसन प्रकल्पात मिळण्यासाठी राजी केले. दोन मुलांसह संस्थेत आलेल्या नीलिमाचे सर्वांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. मुलांना स्नेहालयाच्या दर्जेदार इंग्रजी माध्यम शाळेत मिळणार आहे. कालपासूनच त्यांच्या आरोग्यावर तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू झाले.

सी एस आर डी या समाजकार्य महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांनी स्नेह मनोयात्री टीमचे विशेष अभिनंदन केले. नीलिमाला स्नेह मनोयात्री केंद्रात दाखल करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार गोरक्ष शेजुळ यांनी विशेष मदत केली. याशिवाय पोलीस नाईक सुनील राहुरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक संजय ठेंगे, उंबरे येथील सरपंच सुरेश साबळे , डॉ. बाबुराव दादा तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष डॉ. नामदेवराव ढोकणे, सुनील भाऊ अडसुरे ,(पंचायत समिती माजी सदस्य), विलास ढोकणे ,शिवसेना नेते दीपक वसंत पंडित, पोलीस पाटील श्री देवारे आदींनी या अभियानात सहयोग दिला .मानस ग्राम मानसोपचार तज्ञ डॉक्टर नीरज करंदीकर, क्लीनिकल सायकॉलॉजिस्ट दीप्ती करंदीकर, प्रकल्पाचे समन्वयक रमाकांत दोड्डी, संचालक प्रवीण मुत्याल, परिचारिका सोनाली साळवे,सोशल वर्कर प्रेमलता खंदारे, सोशल वर्कर सोनु शहा, वाहनचालक गणेश धारेकर यांनी नीलिमाला संस्थेत दाखल करण्यासाठी परिश्रम घेतले.

दैनिक राष्ट्र सह्याद्री



# ‘खासगी’चे आव्हान पेलण्यासाठी काळानुरूप बदल करावे लागतील : आ. काळे

## कर्मवीर काळे सहकारी साखर कारखान्याच्या ७० व्या गळीत हंगामाची सांगता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : महाराष्ट्रात सन २००० साली १२८ सहकारी साखर कारखाने व ९ खासगी साखर कारखाने होते. २५ वर्षात खासगी साखर कारखान्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून आजमितीला जेवढी सहकारी साखर कारखान्याची संख्या आहे तेवढीच खासगी साखर कारखान्यांची संख्या झाली आहे. त्यामुळे सहकारी साखर कारखानदारीपुढे खासगी साखर कारखानदारीचे मोठे आव्हान असून सहकारी साखर कारखानदारीला बदलत्या काळाची पावले ओळखून काळानुरूप बदल करावे लागतील, असे प्रतिपादन आ.आशुतोष काळे यांनी केले.

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या २०२४/२५ च्या ७० व्या गळीत हंगामाची सांगता कारखान्याचे मार्गदर्शक व ज्येष्ठ संचालक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली कारखान्याचे संचालक ॲड. राहुल रोहमारे व त्यांच्या पत्नी सोनाली यांच्या हस्ते श्री सत्यनारायण महापूजा करून करण्यात आली. याप्रसंगी आ.काळे बोलत होते.

आमदार काळे म्हणाले की, कर्मवीर शंकरराव काळे यांच्या ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांचे सर्वांगीण हित जोपासण्याच्या आदर्श विचारांवर व कारखान्याचे ज्येष्ठ संचालक व उद्योग समुहाचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना अविरतपणे प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. १२१ दिवस चाललेल्या २०२४-२५ च्या गळीत हंगामात ६ लाख ५८ हजार ५०० मेट्रिक टन उसाचे गाळप होऊन ७ लाख ३४ हजार ४५० क्विंटल साखर पोती उत्पादन झाले असून सरासरी साखर उतारा ११.१९ टक्के मिळाला असला तरी गाळप हंगाम नुकताच हंगाम बंद झाल्यामुळे पुढील प्रोसेसिंग सुरु असून अंतिम साखर उताऱ्याची आकडेवारी अंतिम होणे बाकी आहे. असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.



कोळपेवाडी :कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या ७० व्या गळीत हंगामाच्या सांगता समारंभप्रसंगी बोलताना कारखान्याचे अध्यक्ष आ.आशुतोष काळे, समवेत माजी आमदार अशोकराव काळे, उपाध्यक्ष शंकरराव चव्हाण, संचालक ॲड. राहुल रोहमारे, सोनाली रोहमारे, संचालक मंडळ व पदाधिकारी.

ज्याप्रमाणे खासगी क्षेत्रामध्ये व्यावसायिक व व्यापारी बदल करण्याबाबत त्वरित निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली जाते त्याप्रमाणे सहकारी साखर कारखान्याला ऊस उत्पादक शेतकरी, कर्मचारी व कारखान्याच्या निगडीत घटकांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेऊन निर्णय घ्यावे लागतात. नवीन साखर कारखान्याच्या उभारणीस परवानगी देताना कारखान्याच्या भागातील ऊस उपलब्धतेची परिस्थिती पाहून उभारणीस मान्यता दिली पाहिजे असे मत व्यक्त करून सहकारी साखर कारखान्यांमुळे ग्रामीण भागात आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक सुधारणांचा पाया घातला जातो याचा विचार होणे गरजेचे असल्याचे आ. काळे यांनी सांगितले.

किमान १६० दिवसांचा गाळप हंगाम होणे अपेक्षित असतांना गळीत हंगाम आता ९० ते १२० दिवसांचा होत आहे. त्यामुळे साखर कारखान्यांचे आर्थिक गणित बिघडत चालले आहे. दैनंदिन स्थीर खर्च कमी होण्यासाठी जास्तीत जास्त ऊस गाळप होणे आवश्यक असून त्यासाठी उसाची उपलब्धता असणे अत्यंत गरजेचे आहे. त्याकरिता ऊस विकासावर भर देऊन कारखान्याच्या कार्यक्षेत्रात जास्तीत जास्त ऊस उपलब्धता करणेसाठी विशेष प्रयत्न करावे लागणार असल्याचे आ. काळे यांनी सांगितले.

याप्रसंगी माजी संचालक पद्माकांत कुदळे, कारभारी आगावण, एम. टी. रोहमारे, नारायणराव मांजरे, ज्ञानदेव मांजरे, सिकंदर पटेल, बाबासाहेब कोते, कारखान्याचे उपाध्यक्ष शंकरराव चव्हाण, संचालक दिलीपराव बोरनारे, सुधाकर रोहोम, राजेंद्र घुमरे, सचिन चांदगुडे, सूर्यभान कोळपे, शीराम राजेभोसले, प्रवीण शिंदे, अनिल कदम, अशोक मवाळ, सुनील मांजरे, मनोज जगझाप, वसंतराव आभाळे, डॉ.मच्छिंद्र बर्डे, वत्सलाबाई जाधव, इंदुबाई शिंदे, दिनार कुदळे, प्रशांत घुले, गंगाधर औताडे, शावण आसने, गोरक्षनाथ जामदार, देवेन रोहमारे, अर्जुनराव काळे, बाजार समितीचे उपसभापती गोवर्धन परजणे आदींसह पदाधिकारी, ऊस उत्पादक सभासद, कर्मचारी उपस्थित होते. प्रास्तविक प्रभारी कार्यकारी संचालक सुनिल कोल्हे यांनी केले. सूत्रसंचालन संदीप शिरसाठ यांनी केले. आभार सूर्यभान कोळपे यांनी मानले

# इशान किशनच्या शतकाने हैदराबादची विजयी सलामी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**हैदराबाद** : पहिल्या पॉवरप्लेतील सहा षटकांचा फायदा उठवून धडाकेबाज सुरूवात करण्याचा मागील आयपीएलमधील फंडा सनराजयझर्स हैदराबादने आयपीएलच्या या हंगामातही कायम ठेवला. पॉवरल्पेलच्या पहिल्या सहा षटकात सलामीवीर ट्रॅव्हस हेड व अभिषेक शर्मा यांनी चौकार, षटकारांचा पाऊस पडत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. त्यावर हैदराबादच्या ताफ्यात सामील झालेल्या इशान किशनने त्यावर कळस चढवत ४७ चेंडूत ११ चौकार आणि सहा षटकांच्या मदतीने झंजावती नाबाद अर्धशतक झळकावले. हैदराबादच्या सर्वच फलंदाजांनी दोनशेच्यावर स्ट्राईकरेटने फलंदाजी केल्याने निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून २८६ धावांचा डोंगर उभा केला. आणि या मोठ्या धावसंख्येच्या ओझ्याखाली राजस्थान रॉयल्सचा संघ चेपला गेला व त्यांना ४४ धावांनी पराभव पत्करावा लागला.

राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान परागने नाणेफेक जिंकून हैदराबादला पहिल्यांदा फलंदाजी देण्याचा निर्णय साफ चुकला. कारण सनरायझर्स हैदराबादची फलंदाजी अतिशय मजबूत आहे. मागच्या आयपीएलच्या हंगामात त्यांनी मोठ्या धावसंख्या उभारण्याचे रेकॉर्ड आपल्या नावावर केले होते. त्याचा विसर पराग पडला आणि हैदराबादच्या फलंदाजांनी त्याचा फायदा उठवला. अभिषेक शर्मा आणि ट्रेव्हिस हेडने आक्रमक सुरुवात करून दिली. अभिषेक शर्मा बाद झाल्यानंतर इशान किशन नावाचे वादळ घोंगावले. त्याने ४७ चेंडूत ११ चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने नाबाद १०६ धावा केल्या. तर ट्रेव्हिस हेडने ३१ चेंडूत ९ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ६७ धावा केल्या. या दोघांच्या आक्रमक खेळीमुळे सनरायझर्स हैदराबादने २० षटकांत ६ गडी गमावून २८६ धावा केल्याजिंकण्यासाठी २८७ धावांचे मोठे ओझे घेऊन उतरलेल्या राजस्थान रॉयलची सुरूवात अतिशय खराब झाली. आक्रमक फलंदाज यशस्वी जयस्वाल स्वस्तात परतला. त्यानंतर इम्पॅक्ट प्लेयर म्हणून संघात आलेल्या संजू सॅमसनने एका बाजूने हैदराबादच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. मात्र दुसऱ्या बाजूने त्याला तोलामोलाची साथ मिळत नव्हती. कर्णधार रियान परागही चमक दाखवू शकला नाही. नितीशी राणाही आला तसा परत गेला. ध्रुव जुरेलने सॅमसनला चांगली साथ देत किल्ला लढवला. त्याने व सॅमसनने आक्रमक फलंदाजी करत सामन्यात रंगत निर्माण केली. दरम्यान दोघांनीही अर्धशतक पूर्ण केले. संजू सॅमसनने २६ चेंडूत अर्धशतक झळकावले. त्यात त्याने ६ चौकार आणि तीन षटकार मारले. संजू सॅमसननंतर ध्रुव जुरेलने अर्धशतकी खेळी केली. पण दोघे बाद झाल्यानंतर राजस्थानचा पराभव निश्चित झाला. शेवटच्या काही षटकात हेटमायर व शुभम दुबे यांनी चौकार-षटकारांची आतषबाजी केल्याने रॉजस्थान रॉयल मोठ्या पराभवापासून वाचले.

# खऱ्या भक्तीत परमेश्वरही आपलासा होतो : साध्वी सोनाली कर्पे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : शबरी आदिवासी भिल्ल समाजाची होती. पण तिची सेवा मनापासून होती. रामाची ती आवडती भक्त होती. तेव्हा आपली भक्ती ही खरी असावी. त्यात परमेश्वरदेखील आपलासा होतो, असे प्रतिपादन साध्वी सोनाली कर्पे यांनी केले.

माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या तिसऱ्या पुण्यतिथीनिमीत्त प्रभू श्रीरामकथेचे अखेरचे सातवे पुष्प गुंफतांना त्या बोलत होत्या. महंत नारायणगिरी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेचे पूजन करण्यत आले. माजी आमदार स्नेहलता कोल्हे व संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे, सिंधुताई कोल्हे यांच्या हस्ते रामायणग्रंथाचे व गुजरात येथील लड्डू गोपाल गोशाळेचे संस्थापक महंत हरिजीवनदास शास्त्री तसेच डॉ. यशराज महानुभाव, ब्रह्मकुमारी



**कोपरगाव** : येथे सुरू असलेल्या प्रभू श्रीरामकथेत विविध संत-महंतांचे पूजन झाल्यानंतर माजी आमदार स्नेहलता कोल्हे, बिपीन कोल्हे व उपस्थित भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली.

सरलादिदी, सुभाष महाराज जगताप, संगीता चव्हाण, लता महानुभाव, दत्तराज महानुभाव, सोमनाथ भगत (कसारा मुंबई) श्री. शेळके (संभाजीनगर), अण्णा शास्त्री (गुजरात) आदी विविध संत-महंतांचे पूजन झाले.

साध्वी कर्पे म्हणाल्या की, तरुणवय भरकटत असते. वय वर्ष बारापर्यंत आई-वडील यांनी पाल्य जेथे चुकेल तेथे त्याला शिक्षा केलीच पाहिजे. तरुण मुला-मुलींनी आपल्या आई-वडिलांचे संस्कार जपावे,. वय वर्षे बारा ते अठरा आई वडिलांनी त्यांचे मित्र व्हायला पाहिजे. मुला-मुलींशी प्रेमाने वागावे. चुकेल तेथे समजून सांगावे. सध्या हवेतील प्रदूषणाबरोबरच वैचारिक प्रदूषण वाढले आहे. रामायण कथा-श्रवणाने विचार जपा आणि त्यातून समाजाला संस्कृती शिकवा. कलीयुगात रामनाम तुमच्या आशा, अपेक्षा, आकांक्षा, सत्ता, संपत्ती, संतती, सुख, ऐश्वर्य, स्नेह, भाव, भक्ती, वाढविणारं माध्यम आहे. माजीमंत्री सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे विचारधारा ट्रस्ट यांनी स्व. शंकरराव कोल्हे यांच्या पुण्यतिथी ते जयंतीनिमीत्त वैचारिक ज्ञानदानाचे कार्य चालू ठेवले आहे ही लाखमोलाची गोष्ट आहे. त्यांची संस्काराची विचारधारा अशीच तेवत राहो. स्व. शंकरराव कोल्हे यांची कार्य प्रेरणा या भागात प्रेरणदिन म्हणून साजरी होत आहे ही बाब देशात नाव लौकिकास्पद आहे. जग जोडायला प्रेमाचे दोन शब्द लागतात. नाती स्वार्थाने तोडू नका. कुणांशी वाईट वागू नका. आपल्यातील स्नेहभाव वाढवण्यासाठी कमीपणा घ्या. पण त्यातून तुम्ही स्वतः ला सावरा म्हणजे सभोवतालचा परिसर आपोआप सावरेल, असा सल्ला त्यांनी दिला. सुदर्शन महाराजांनी व्यासपिठावर रामराज्याभिषेकाची सादर केलेली झाकी भाविकांना विशेष आवडली. भाविकांनी गुलाबी वस्त्र परीधान केल्यामुळे व्यासपीठ खुलून दिसत होते. प्रत्येकाच्या हातात पेटत्या मेणबत्तीमुळे धरतीवर साक्षात स्वर्ग अवतरल्याचा आभास जाणवत होता. रामराज्याभिषेकाच्या प्रसंगाने रामायण कथेची सांगता झाली. भाविकांना संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या सेवकांनी बुंदीच्या लाडवांचा प्रसाद वाटला. बिपिन कोल्हे यांनी आभार मानले.

# खासगी क्लासेसपेक्षा ऑनलाईनकडे विद्यार्थ्यांचा कल

प्रदीप आहेर पाटील

**श्रीरामपूर** :सध्या सर्वत्र ऑनलाईन चा जमाना आहे, यामध्ये शिक्षण क्षेत्रही मागे राहिलेले नाही शाळा महाविद्यालयांमध्ये फक्त प्रवेश घ्यायचा आणि खाजगी क्लासेसला हजेरी लावायची अशी एक शैक्षणिक पद्धत काही दिवसांपासून सुरू आहे. यामध्ये खाजगी क्लासेस वाल्यांची फी बाबतीत झालेली मनमानी यावर पर्याय म्हणून आता विद्यार्थ्यांचा कल ऑनलाइन क्लासेस कडे वाढताना दिसत आहे.

राज्यातील शैक्षणिक धोरणामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होत आहेत ,महायुती सरकारने जिल्हा परिषद शाळेपासूनच सीबीएसई पॅटर्न ची सुरुवात करण्याचे आदेशच काढले त्यामुळे आता सर्व शाळांकडून सीबीएसई पॅटर्न राबविला जाईल. काही दिवसांपूर्वी अनेक शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी फक्त शाळेचा पट दाखविण्यासाठी ठेवतात मात्र अध्ययनासाठी खाजगी क्लासेसचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

> नुकत्याच झालेल्या दहावी-बारावीच्या परीक्षांमध्ये खाजगी क्लासेस वाल्यांच्या संस्थेतील विद्यार्थी परीक्षेला बसले होते इतर संस्थांमधील विद्यार्थ्यांना गणवेश होते मात्र खाजगी क्लासेस वाल्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांना गणवेश नसल्याने हे विद्यार्थी आहेत काय असा प्रश्न त्यावेळी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना व बंदोबस्तातील पोलिसांना पडला होता.

आता तर या खाजगी क्लासेस वाल्यांनी स्वतःच्या शैक्षणिक संस्था थाटल्याने विद्यार्थ्यांनी त्या संस्थेमध्ये फक्त प्रवेश घ्यायचा आणि इकडे क्लासेस ला हजेरी लावायची अशी एक नवीन शैक्षणिक पद्धत सध्या जोमात सुरू आहे .मात्र हे करत असताना खाजगी क्लासेस वाले मोठ्या प्रमाणावर वार्षिक पॅकेज विद्यार्थ्यांकडून घेताना दिसत आहेत शाळा महाविद्यालयात जाण्याऐवजी विद्यार्थी या खाजगी क्लासेसला जाताना दिसतात. शाळा महाविद्यालयात विद्यार्थी गेल्यानंतर त्यांना शिस्त, गणवेश ,शाळेची वेळ या गोष्टी पाळाव्या लागतात. मात्र इकडे कसल्याही प्रकारची शिस्त गणवेश या बाबी नसतात शाळा महाविद्यालयात गेल्यानंतर शालेय वातावरण तेथील परिसर शिस्त यामुळे विद्यार्थ्यांचा सामाजिक विकास होतो खाजगी क्लासेस मध्ये अवाच्या सव्वा फी आकारली जाते मात्र शालेय शिष्टाचार व शैक्षणिक वातावरण त्या ठिकाणी नसल्यामुळे विद्यार्थ्यांसाठी सामाजिक दृष्ट्या हे धोक्याचे आहे. या क्लासेसला जाणारा एक ठराविक वर्ग आहे ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे असेच विद्यार्थी येथे प्रवेश घेऊ शकतात याला पर्याय म्हणून आता नव्याने ऑनलाईन क्लासेस ही संकल्पना सध्या बाजारामध्ये आली आहे कुठल्यातरी एका ऑनलाईन क्लासेसची प अगदी चार-पाच हजार रुपयांना मिळते त्यावर अनेक विद्यार्थी अभ्यास करू शकतात त्यामुळे सध्या ऑनलाईन क्लासेस कडे विद्यार्थ्यांचा कल वाढताना दिसत आहे.

# विजयाच्या श्रीगणेशामुळे आरसीबी फॅन्सच्या आशा उंचावल्या

आयपीएलच्या १८ व्या हंगामाला काल (शनिवार)पासून सुरूवात झाली आहे. २५ मेपर्यंत चालणाऱ्या या हंगामात १० संघात तब्बल ७४ सामने होणार आहेत. त्यामुळे क्रिकेटप्रेमींनी तब्बल दोन महिने जगभरातील आपल्या आवडत्या खेळाडूचा खेळ पाहता येणार आहे. काल झालेल्या पहिल्याच सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरुने गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्सचा पराभव करून स्पर्धेत दमदार सुरूवात केली आहे. आरसीबीच्या संघात रनमशीन विराट कोहलीसारखा सर्वात अनुभवी फलंदाज आहे. विराटने आतापर्यंत भारतीय संघाकडून खेळताना संघाला विजय मिळवून देताना अनेक ट्रॉफीज पटकावल्या आहेत. मात्र अजूनही त्याच्या संघाला आयपीएलची ट्रॉफी जिंकता आलेली नाही. यावेळी विराट कोहलीच्या आरसीबी संघाने ट्रॉफी जिंकावी अशी विराटच्या फॅनची आशा आहे. आरसीबीचे हात आयपीएल ट्रॉफीपर्यंत पोहचतात की नाही, हे येत्या दीड-दोन महिन्यात कळेल. मात्र यावेळी आरसीबीचा संघ अतिशय समतोल आहे. नव्या दमाच्या रजत पाटीदारकडे आरसीबी संघाचे नेतृत्व आहे. संघाचे नेतृत्व करताना त्याला विराट कोहलीचे सतत मार्गदर्शन मिळणार आहे. पहिल्याच सामन्यात त्याने आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखवत संघाला पहिला विजय मिळवून दिला आहे. सुरूवात चांगली झाली असल्याने आरसीबीचे आणि विराट कोहलीचे फॅन खुश झाले आहेत. कारण आरसीबीच्या संघाला यावेळी आयपीएल ट्रॉफी जिंकण्याचे प्रबळ दावेदार मानले जात आहे.






शनिवारी केकेआर व आरसीबीत झालेल्या सामन्यात आरसीबीने आरामात विजय मिळवला. फिरकीपटू कृणाल पांड्यासह आरसीबीच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी केल्याने केकेआरच्या बलाढ्य फलंदाजीला दोनशेच्या आत रोखण्यात त्यांना यश आले. नवव्या षटकात १० षटकात १०६ धावा केकआरच्या फलंदाजांनी फटकावल्या होत्या. त्यावेळी केकेआरचा संघ दोनशेच्या पुढे धावसंख्या उभारेल असे वाटत होते. केकेआरचा नवा कर्णधार मराठमोळा अजिंक्य रहाणे व मारझोड करण्यासाठी सलामीला येणाऱ्या सुनील नारायणने चौकार-षटकारांची आतषबाजी केली. विशेषतः रहाणेने आरसीबीच्या गोलंदाजांवर तुफान हल्ला चढवला मात्र हे दोघे बाद झाल्यानंतर केकआरची मधली फळी कृणाल पांड्याच्या फिरकीपुढे ढासळली. त्याला ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जोश हेजलवूडची चांगली साथ मिळाली. यश दयालने शेवटच्या षटकात नियंत्रित मारा केल्याने केकेआरच्या फलंदाजांना शेवटच्या चार-पाच षटकात चौकार-षटकार मारण्याची संधी मिळाली नाही. व्यंकटेश अय्यर, रिंकूसिंग, आंद्रे रसेल व रमणदीप सिंग फलंदाजीत अपयशी ठरल्याने केकेआरला निर्धारित २० षटकात अवघ्या १७४ धावा करता आल्या.

केकेआरकडे सुनील नारायण व सध्या चांगला सूर गवसलेला वरुण चक्रवर्ती हे दोन फिरकीपटू असल्याने १७४ धावांचा संघ बचाव करेल असे वाटत होते. मात्र इंग्लंडचा फिल सॉल्ट आणि रनमशीन कोहली यांनी त्या आशा फोळ ठरवल्या. सलामीला आलेल्या या दोघांनी केकेआरच्या गोलंदाजांवर पहिल्या षटकापासून हल्ला केला. विशेषतः सॉल्टने आक्रमक फलंदाजी करत अधर्शतक फटकावले. या दोघांनी पहिल्या गड्यासाठी ९५ धावांची धमाकेदार सलामी दिली. तो बाद झाला तरी त्याने विजय दृष्टीपथात आणून ठेवला होता. त्यानंतर धावांच्या पाठलाग करण्यात पटाईत असलेल्या विराट कोहलीने कर्णधार रजत पाटीदारच्या साथीने विजयावर शिक्कामोर्तब केले.लाल चेंडूवर यशस्वी कप्तानी करणारा अजिंक्य रहाणे कालच्या सामन्यात नेतृत्व करताना गोंधळलेला दिसला. विकेट घेण्याची क्षमता असलेल्या सुनील नारायणला त्याने उशिरा गोलंदाजीला आणले. तो जेव्हा गोलंदाजीला तेव्हा आरसीबीच्या निम्म्यापेक्षा जास्त झावा झाल्या होत्या व धागवतीही उत्तम होती. धावगती वाढवण्याचे ओझे नसल्याने नारायणला धोका पत्करून फटके मारण्याची गरज आरसीबीच्या फलंदाजांना पडली नाही. त्यामुळे विकेट शाबूत राखत त्यांनी विजयी पल्ला गाठला.

# विघ्नहर्ता पतसंस्थेच्या टाकळीहाजी शाखेचा शुभारंभ उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर** : तालुक्यातील विघ्नहर्ता ग्रामीण बिगरशेती पतसंस्था मर्यादित निघोज या पतसंस्थेच्या टाकळीहाजी शाखेचा शुभारंभ रविवार दि.२३ मार्च रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या उत्साहात झाला.श्रीसंत तुकाराम महाराजांचे वंशज पुंडलिकमहाराज मोरे देहू व वारकरी भूषण तुळशिराम महाराज सरकटे ओतूर यांच्या शुभहस्ते उध्दाटन समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी माजी. जि.प.सदस्या सुनिताताई गावडे या होत्या.

याप्रसंगी बोलताना पुंडलिकमहाराज मोरे म्हणाले,संस्थेचा कारभार अतिशय पारदर्शी आहे.फार कमी वेळे मधे साठेसाहेबांच्या नेतृत्वामधे आणि संचालक मंडळाच्या स्वच्छ कारभारामुळे संस्थेची प्रगती झाली आहे. तुळशिराममहाराज सरकटे म्हणाले,विघ्नहर्ता पतसंस्था अल्पावधीत लोकांच्या विश्वासास पात्र ठरलेली संस्था आहे.माझे व संस्थेचे चेअरमन सुभाषराव साठे यांचे एक अतुट विश्वासाचे नाते आहे. त्यामुळेच आपण माझ्या सांगण्यावरून या संस्थेत बिनधास्त गुंतवणुक करा असे महाराज म्हणाले.



विघ्नहर्ता ग्रामिण बिगरशेती पतसंस्थेच्या टाकळीहाजी शाखेचे उद्धाटन करताना पुंडलिकमहाराज मोरे, तुळशिराम महाराज सरकटे,चेअरमन सुभाषराव साठे,सरपंच अरुणा घोडे आदी मान्यवरांसह सभासद उपस्थित होते. (छाया : दत्ता गाडगे)

प्रास्ताविकमधे बोलताना संस्थेचे संस्थापक चेअरमन सुभाषराव साठे म्हणाले,संस्थेची सध्या ५० कोटींच्या ठेवींकडे वाटचाल सुरु आहे. अल्पावधीमधे संस्थेची प्रगती वेगाने होत आहे.दि.२२ ऑगस्ट २०२० रोजी निघोज येथे संस्थेची स्थापना झाली.साडेचार वर्षात संस्थेने गरीडझेप घेत जनसामान्यांचा विश्वास संपादन करत ३४ कोटींचा ठेविंचा टप्पा पार केला.सध्या संस्थेच्या ५ शाखा आहेत.सहकार क्षेत्रातील २२ वर्षाच्या माझ्या अनुभवाचा वापर आपण संस्थेसाठी करत आहोत.मेहनत,विश्वास,निस्वार्थी पणावर संस्था चालते.अनुभवी प्रशिक्षित कर्मचारी वर्ग,विश्वासु संचालक मंडळ,सभासदांच्या विश्वासालापात्र ठरत संस्थेची यशस्वी घोडदौड वेगाने चालु असल्याचे चेअरन साठे म्हणाले.तसेच संस्थेचे भागभांडवल १ कोटी १८ लक्ष ,ठेवी ३४ कोटी १५ लक्ष ,कर्जवाटप २४ कोटी १० लक्ष ,असुन,संस्थेला ३० लक्ष २० हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे.संस्थेचे मुख्य कार्यालय शिरुर येथे असुन, निघोज,जवळा, शिक्रापूर,टाकळीहाजी या शाखांमधुन संस्थेचा स्वच्छ कारभार सुरु आहे.यावेळी अध्यक्ष स्थानावरुन बोलताना, सुनिताताई गावडे म्हणाल्या,विघ्नहर्ता पतसंस्थेची शाखा आमच्या टाकळीमधे सुरु झाल्यामुळे त्याचा फायदा गावालाच होणार आहे.संस्थेचे संस्थापक चेअरमन साठेसाहेब यांना बँकींग क्षेत्राचा २२/२३ वर्षाचा प्रदिर्घ अनुभव असल्याने अवघ्या ५ वर्षामधे संस्थेच्या ५ शाखा सुरु झाल्यात.आणि संस्थेची यशस्वी घोडदौड सुरु आहे.याप्रसंगी सरपंच अरुणा घोडे, बन्सी घोडे,सोपानराव भाकरे, सखाराम खामकर,हभप निवृत्तीमहाराज तनपूरे, सचिनपाटील वराळ,सलिम हवालदार, विठ्ठल पवार,उज्जन खामकर,मारुती कळसकरआदींसह मान्यवर व सभासद मोठ्या संखेने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संचालक, संतोष कळसकर यांनी केले. तर आभार प्रशासन प्रमुख रोहण मुळे यांनी मानले.